# एकनाथांचीं भजनें

[ प्रस्तावना-खंडासह ]

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १८३५
१९८६२

' जन नोहे अवघा हा जनार्दन '

—एकनाथ

REFBK-0012730
REFBK-0012730

विनोबा

# एकनाथांचीं भजनें

[ प्रस्तावना-खंडासह ]

REFBK-0012730

REFBK-0012730

‘ जन नोहे अवघा हा जनार्दन ’

—एकनाथ

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.

अनुक्रम .................. विः ..................

क्रमांक .................. नोंः दिः ..................

परंधाम प्रकाशन, पवनार

प्रकाशक :
भाऊ पानसे,
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन
पो. पवनार, जि. वर्धा.

●

आवृत्ति चौथी
ता. १२ फेब्रुवारी १९६२
प्रति : १०००
मूल्य : १.००

●

मुद्रक :
भाऊ पानसे
परंधाम मुद्रणालय
पो. पवनार, जि. वर्धा.

# एकनाथांचीं भजनें

[ प्रस्तावना-खंडासह ]

# अनुक्रमणिका

**प्रस्तावनाखंड** पृष्ठें

१ भागवत .... ... १
२ भारूड ... ... ४
३ भजनें ... ... ८
४ स्थूल चरित्र ... ... १२
५ भाव-चरित्र ... ... १४
६ जन ते चि जनार्दन ... .... २२
७ कीर्तन-भक्ति ... ... ३३
८ नाथपूर्वकालीन विचार-विकास ... ३६
९ नाथांचे ऋणानुबंध ... ... ४३
१० उपासनेचें अमृत .... ... ५४

**एकनाथांचीं भजनें**

**प्रकरण** **अध्याय** **पृष्ठें**

१ **कर्मयोग आणि चित्तशुद्धि** १–१० ६३ ते ८१

१ मनुष्यदेहाचें सार्थक
२ स्वधर्माचरणाचें अगत्य
३ निष्काम कर्मयोग
४ मिथ्या-साधनांच्या मागें लागूं नका
५ सार-ग्राही श्रवण पाहिजे
६ अहिंसा-सत्यादि व्रतें निष्ठेनें पाळावीं
७ टाकायच्या गोष्टी : अविश्वास, अभिमान, ममत्व
८ जगांत वागतांना घ्यायची काळजी
९ मनो-जय
१० गुणविकास : अनुताप, शांति, तन्मयता

| प्रकरण | अध्याय | पृष्ठें |
|---|---|---|
| **२ नामस्मरण आणि कीर्तन** | **११–१८** | **८२ ते ९५** |
| ११ नाम-माधुर्य | | |
| १२ नाम-सौलभ्य | | |
| १३ नाम-सामर्थ्य | | |
| १४ नामावर विश्वास | | |
| १५ नामस्मरणाचें पथ्य | | |
| १६ एकनाथांचा हरिपाठ | | |
| १७ कीर्तन देवास प्रिय; कीर्तनानें सामाजिक चित्तशुद्धि | | |
| १८ कीर्तन-भक्तीचा आदर्श | | |
| **३ सत्संगति आणि गुरुभक्ति** | **१९–२५** | **९५ ते १०९** |
| १९ संत देवाहून विशेष | | |
| २० संतांचें अवतार-कार्य | | |
| २१ संतांचीं लक्षणें | | |
| २२ संतांची सेवा हें सर्वोत्तम साधन | | |
| २३ संतसेवेविषयीं एकनाथांची तळमळ | | |
| २४ संतसंगतीचा एकनाथांस आलेला अनुभव | | |
| २५ गुरुभक्ति | | |
| **४ भक्तियोग** | **२६–३२** | **१०९ ते १२९** |
| २६ परमेश्वर-स्तवन | | |
| २७ साधकाची तळमळ | | |
| २८ भक्ताचा संकल्प | | |
| २९ सगुण-साक्षात्कार | | |
| ३० भक्तीचें स्वरूप आणि गौरव | | |
| ३१ देवा-भक्तांचें प्रेम (नाथांच्या मुखानें) | | |
| ३२ देवा-भक्तांचें प्रेम (भगवंताच्या मुखानें) | | |

| प्रकरण | अध्याय | पृष्ठें |
| --- | --- | --- |
| ५ **आत्म-दर्शन** | ३३-४० | १२९ ते १४४ |
| ३३ भाव-दशा | | |
| ३४ ब्रह्मनिष्ठाचीं लक्षणें | | |
| ३५ गुरुकृपेचा चमत्कार | | |
| ३६ आत्म-साक्षात्कार | | |
| ३७ सर्वत्र देवदर्शन | | |
| ३८ ज्ञानोत्तर उपासना | | |
| ३९ ज्ञानोत्तर जीवन | | |
| ४० जनार्दनाची आरती | | |
| **भजनांची सूचि** | | १४५ ते १५० |

: १ :

# भागवत

92630

त्या वेळीं मी जेमतेम पंधरा वर्षांचा असेन. निर्णयसागरनें छापलेलें एकनाथांच्या भागवताचें सुंदर पुस्तक नुकतें च निघालें होतें. तें माझ्या हातीं लागलें. मराठी भाषेचा ज्ञानेश्वरीच्या तोलाचा म्हणून गाजलेला तो ग्रंथ वाचल्याशिवाय मला सुटका च नव्हती. पण पुस्तकाचा आकार पाहून मी दचकलों तर खरा. कारण ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या तोलाचा च नव्हे, पण तिप्पट तोलाचा होता. ओवीसंख्या दुप्पट, आणि दरेक ओवीची लांबी दीडपट. तरी पण चंग बांधून, समजलें न समजलें पर्वा न करतां, एकनाथी भागवत एकदांचें वाचून तर काढलें. रोज एक अध्याय वाचायचा क्रम ठेवला. कोणता इंग्रजी महिना होता तें आठवत नाहीं; पण एकतीस दिवसांचा महिना होता, आणि महिन्याभरांत पुस्तक संपलें, इतकें आठवतें. अकराव्या अध्यायानें मात्र चांगली च रग जिरवली. सरासरीच्या मानानें दुप्पट मोठा अध्याय. एकादश स्कंधांतील 'एकादशोध्याय' म्हणून नाथांनीं त्यावर गौरवाचा शिक्का ठोकलेला. लिहिणारानें कंबर मोडून लिहिला तर वाचणारानें कां हार खावी, अशा वीर-वृत्तीनें वाचून काढला. एवढा मोठा ग्रंथ पहिल्या वाचण्यांत, आणि त्या वयांत, काय समजणार होता ? पण नाथांची पुण्याई आणि त्यांचें पुनरुक्तीचें बळ इतकें दांडगें कीं कांहीं ठसा उमटल्याशिवाय राहणें अशक्य होतें. "भक्ति म्हणजे सर्वां भूतीं भगवद्भाव. भक्तीमधें जातगोत नाहीं. उंचनिच नाहीं." एवढें माझ्या लक्षांत राहून गेलें. आणि मला वाटतें, एवढ्यांत मला नाथांनीं पास केलें असेल.

एवढा ग्रंथसागर पार उतरल्याचें आश्चर्य, आणि कर्तव्य केल्याचें समाधान, पदरांत बांधून ग्रंथ मिटून ठेवला तो कितीक वर्षांत उघडला नाहीं. पुढें गीतेशीं तुलना करण्यासाठीं भागवताचा एकादश स्कंध पाहण्याची गरज वाटली. आणि मग 'गाड्याबरोबर नळ्याला यात्रा' या न्यायानें एकनाथी भागवताचें दुसऱ्यांदा वाचन केलें. जरी नळा गाड्याच्या दसपट लांब आहे हें माहीत होतें, तरी धैर्यानें वाचत गेलों आणि या वेळीं पूर्ण मोबदला पावलों. अपार आनंद झाला. समजायला हि ग्रंथ सोपा वाटला. भाषा ओघवती. पातळ पण पाणचट नाहीं. पाना-पानांत अनुभव भरलेला. नाथ म्हणतात, 'मी श्रीधरांना अनुसरलों.' श्रीधर म्हणाले असते, 'नाथांमुळें मी अमर झालों.' एकादश स्कंधावर तेवढ्या योग्यतेचें विवरण हिंदुस्थानच्या दुसऱ्या भाषेंत नाहीं, हें मागाहून मला अवगत झालें.

दरम्यान नाथांचें चरित्र मीं वाचलेलें होतें त्यानें माझ्या चित्ताला घेरून टाकलें होतें. विशेषत: मी होतों क्रोधी आणि नाथ त्याच्या नेमके उलट शांति-जलधि. त्यामुळें तें चरित्र मला कल्याणकारी भेषज च झालें. तथापि भागवत वाचण्याची मात्र प्रेरणा होत नव्हती. याचें कारण दुसरें तिसरें कांहीं नाहीं—भागवताचा आकार. ती गीतेच्या निमित्तानें झाली आणि लक्षांत आलें कीं नाथांच्या त्या ग्रंथाची सारवत्ता त्याच्या भारवत्तेला कमी पडणारी नाहीं. त्यानंतर भागवत माझ्या संवईप्रमाणें इकडून तिकडून अनेक वेळां चाळलें.

भागवताच्या परिशीलनानें नाथांच्या चरित्राचें रहस्य मला अधिक उमगलें. जसजसें मी चिंतूं लागलों, तसतसें तें चरित्र माझ्या दृष्टीला अधिकाधिक उंचावत गेलें. पुढें माझ्या चित्तात अशी

प्रतीति ठसली कीं नाथांचें भागवत जरी निःसंशय महान्, तरी नाथांचें चरित्र त्याहून हि महान् आहे. सामान्यतः माणसाचें असें नसतें. माणसाचा शब्द त्याच्या जीवनाहून नेहमीं उंच असतो. पण नाथांची स्थिति याच्या उलट दिसली. 'नाथांच्या घरची उलटी च खूण' असें लोक म्हणतात! मला वाटतें, आधुनिक काळांत महात्मा गांधींचें या बाबतींत आणि इतर हि पुष्कळ बाबतींत नाथांशीं साम्य आहे. 'वाचा सत्यत्वें सोवळी, येर कविता ओवळी' (भजन ४५), असा उभयतांचा आदर्श होता, त्याचा हा परिणाम आहे.

नाथांचे दुसरे हि प्रबंध-ग्रंथ पाहण्यांत आले. ते सगळे च सद्भावनेनें भरलेले आहेत. पण भागवताची जादू त्यांत नाहीं. यांत नवल नाहीं. माणसाचें हृदय दहा वस्तूंत उतरलें जाऊं शकत नाहीं. बोलण्याचा चाळा म्हणून तो बोलत राहतो. लिहिण्याचा चाळा म्हणून तो लिहीत राहतो. भावनेनें भारलेल्या माणसाला आपलें सगळें च एकरस वाटतें. एकरस तें असतें हि, पण सरस नसतें. हें तो अनुभवूं शकत नाहीं; दुसरा अनुभवतो. वर्ड्स्वर्थला वाटे, माझी प्रत्येक कविता लेखणीनें नव्हे, हृदयानें लिहिलेली आहे. पण वर्ड्स्वर्थचा परम भक्त जो मॅथ्यू आरनोल्ड त्यानें वर्ड्स्वर्थच्या कवितेची निवड केली आहे तें पुस्तक वर्ड्स्वर्थच्या समग्र कवितेचा दशांश हि भरणार नाहीं. पण नाथ इतके भ्रमांत राहिले असतील असें वाटत नाहीं. नाथांनीं जी समरसता भागवतांत अनुभवली ती च त्यांच्या इतर प्रबंधांत हि अनुभवली असेल असें म्हणणें धाडसाचें होईल.

---

: २ :

# भारूड

भागवतांत नाथांनीं आपलें हृदयसर्वस्व ओतलें असलें तरी तो एक व्यवस्थित रचलेला प्रबंध आहे. प्रबंध-ग्रंथांत लेखकाला साहजिक च कांहीं मर्यादा असतात. त्या मर्यादा सांभाळायच्या तर लेखकाला आपले स्वैर अनुभव त्यांत मांडणें शक्य नसतें. त्यांतून भागवतांत नाथांना शुकदेवाच्या छंदाला अनुसरायचें होतें. शुकदेवाचा छंद जरी नाथांच्या आवडीचा होता तरी स्वच्छंद-विहार ही एक वेगळी च वस्तु असते. त्यामुळें तुकारामाच्या गाथेंत आपल्याला जें दर्शन होतें तें नाथांच्या भागवतांत होत नाहीं. एवढी उणीव नाथांसारख्या प्रतिभावान् साक्षात्कारी पुरुषाला कशी खपणार ? आपले अनुभव स्वतंत्रपणें नमूद करण्याची गरज त्यांना भासल्याशिवाय कशी राहणार ? नाथांचे ते खाजगी अनुभव शोधून काढण्याच्या अपेक्षेनें मग मी त्यांच्या अभंगांच्या गाथेकडे वळलों.

हें गाथा-साहित्य फार जुनें आहे. गाथा-शब्द ऋग्वेदांत हि अनेकवार आलेला आहे. पण गाथा ऋग्वेदापेक्षां हि प्राचीन आहे, असें ऋग्वेद स्वत:च सांगून राहिला आहे. पवमान-स्तोमाचें स्तवन 'पुराणी गाथेनें' करण्यांत आलें, असा ऋग्वेदांत एके ठिकाणीं उल्लेख आलेला आहे (ऋग्वेद ९.९९.४). गाथा म्हणजे भक्तिपर गीत अशा अर्थानें कांहीं ठिकाणीं गाथेचा प्रयोग असतो. कांहीं ठिकाणीं गाथा म्हणजे अनुभवसाररूप उद्‌गार अशा हि अर्थानें प्रयोग असतो. या दुसऱ्या अर्थानें अनेक गाथा भारत-भागवतादिकांत

येत असतात. "**कामोपभोगें न शमे चि काम**" अशा अर्थाची ययातीची गाथा महाभारतांत आलेली सर्वश्रुत च आहे. ती एक गाथा, म्हणजे त्याच्या जीवनाचें सार. अशा च इतरांच्या हि अनुभव-गाथा एकेक आहेत. अनुभवपर गाथा ह्या पर्यायानें उपदेशपर हि असतात. तुकारामाच्या गाथेंत आपल्याला भक्तिपर, अनुभवपर आणि उपदेशपर असे तीन प्रकारचे सर्वोत्तम नमुने पहावयास सांपडतात. मराठी भाषेचें थोर भाग्य !

पण 'गाथा' शब्द आणि गाथेचे हे दोन्ही-तिन्ही प्रकार आपल्याला पारशांचा धर्मग्रंथ जो झंद अवेस्ता त्यांत हि पहावयास सांपडतात. अवेस्तांतील अत्यंत स्फूर्तिदायक भाग म्हणजे झरतुष्ट्राच्या गाथा होत. झरतुष्ट्राच्या गाथा पारशी समाज तीन हजार वर्षें गात आला आहे.

प्रबंध-ग्रंथ आणि गाथा हीं विचारशैलीचीं आणि भाषाशैलीचीं दोन टोकें आहेत. पूर्वापरसंबंध, एकसूत्रता, विकासक्रम-निदर्शन हा प्रबंधाचा आत्मा आहे. मोकळेपणा, सुटसुटीतपणा, विखुरलेपणा, सहज स्फूर्ति, विशृंखलता, किंबहुना उच्छृंखलता हें गाथेचें स्वरूप आहे. भारतीय साहित्यांत प्रबंध-साहित्य आणि गाथा दोन्ही भरपूर आहेत. संतांच्या वाणींत गाथा-साहित्याची रेलचेल आहे. शिखांचा ग्रंथसाहेब, कबीरादिकांची 'बानी', तमिळ आळवारांची भजनें, इत्यादि सर्व गाथा-साहित्य आहे—जरी गाथा हें नांव त्याला लावलें गेलें नाहीं.

गाथेच्या अपेक्षेनें एकनाथांची गाथा चाळून पाहिली तर तींत पुष्कळसा वेगळा च प्रकार दिसून आला. सर्वोत्तम गाथेचा हि थोडा भाग आढळला, पण बाकी सर्व लिखाण टांचण-टिपणाच्या स्वरूपाचें दिसलें. नाथांनीं जेव्हांपासून लिहायला आरंभ केला तेव्हांपासून

अखेरपर्यंत त्यांनीं जें कांहीं लिहिलें त्या सर्वांचें तें संग्रहालय दिसलें. हायस्कूल-कॉलेजांत शिकत असतांना मीं एक भली मोठी हजार-पानी वही शिवून घेतली होती. एक कॉपिंग पेन्सिल हि मीं त्या वहीला बांधून ठेविली होती. मला जें जें सुचे आणि जें जें रुचे तें सारें मी त्या वहींत टिपून ठेवीत असें. त्या वहीला शेंवटीं मीं एक सूचि जोडली होती. तिनें विस्कळितपणाला व्यवस्था आणली होती. एकनाथी गाथा पाहून त्या वहीची मला आठवण झाली. एकनाथी गाथेंतील पुष्कळशा लिखाणाला अलीकडचे साहित्यिक टीकाकार गाथा न म्हणतां भारूड म्हणतील. आणि गमतीची गोष्ट ही कीं नाथांच्या भक्त-मंडळींत हि हा पुष्कळसा मजकूर एकनाथी भारूड म्हणून च संबोधिला जातो. ते दूषणरूपानें म्हण-तील, यांनीं तो गौरवानें घेतला आहे.

पण भक्त मंडळींनीं ही जी संज्ञा दिली आहे ती सबंध गाथेला उद्देशून नाहीं. गाथेंत जो समाज-शिक्षणाचा रूपकपर आणि कांहींसा गूढ भाग आहे त्याला लावली आहे. म्हणजे हा पारिभाषिक शब्द समजला पाहिजे. या भारूड शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्ति कुळकर्णी यांच्या मराठी व्युत्पत्ति-कोषांत अशी दिली आहे :

भारूड (न.) लांब गुंतागुंतीचें गाणें, कथा; अवघड कूट-काव्य; पंचाईत, संकट, विघ्न (लक्षणा).

(१) सं. बहुरूढम्—भारूड (२) भारत+रूढ (शब्दकोश.)

पहिली व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक. दुसरी व्युत्पत्ति कोश-कारानें च अवमानिली असल्यामुळें ध्यानांत घेण्याची जरूरी नाहीं. पण पहिली व्युत्पत्ति देखील मान्य होण्यासारखी नाहीं. बहुरूढमूचें भारूढ होणें संभवनीय नाहीं. झाल्यास भोरूढ होऊं शकेल, जसें

बहुरूपीचें भोरूपी झालें आहे. अटकळ च करायची तर भार+गूढ=भारूढ अशी करतां येईल. अर्थत: ही अटकळ समर्थनीय ठरेल. अक्षरत: फारशी दुरावणार नाहीं. भारलेलें गूढ अथवा भारवान् गूढ अथवा साध्या मराठींत भारी गूढ असा त्याचा अर्थ होईल. तो कोशांत दिलेल्या अर्थाला जुळना आहे. एकनाथांचीं बरीचशीं भारुडें धर्मठांनीं रूढवलेल्या मिथ्याचारावर कोरडे ओढणारीं असल्यामुळें त्यांना त्यांची मोठी 'पंचाईत' झाली असेल. तीं त्यांना 'संकट' रूप, किंबहुना 'विघ्नरूप' हि भासलीं असतील.त्या दृष्टीनें भारूडचे कोशांत दिलेले ते ते अर्थ चांगले शोभण्यासारखे आहेत. शिवाय सदर भारुडांची भाषा उकलण्याला कठिण असल्यामुळें व्याख्यानकारांना त्यांची 'पंचाईत' झाली असेल. आणि तीं त्यांना 'संकट' रूप आणि कधीं कधीं श्रोत्यांच्या तावडींतून सुटायला 'विघ्नरूप' हि झालीं असतील. त्या हि दृष्टीनें ते ते अर्थ साजरे ठरतात. पण 'लांबलचकपणा,' 'गुंतागुंत', आणि 'कूटशैली' हें भारुडांतलें मुख्य लक्षण आहे. त्या दृष्टीनें गाथ्यांतील हा भारूड भाग व्यवस्थित उकलण्याचा यत्न कुणीं तरी करण्यासारखा आहे. त्यांतून एकनाथकालीन समाजस्थितीवर चांगला प्रकाश पडेल, ऐतिहासिक ज्ञानांत भर पडेल, आणि मराठी भाषेच्या कांहीं लकबांचा हि उलगडा होईल. हें काम उपयोगाचें आणि मनोरंजक असलें तरी वस्तुत: 'गाथे' च्या क्षेत्रांत येत नसल्यामुळें, आणि माझ्या हि गरजेबाहेरचें असल्यामुळें, मीं हा सबंध विभाग सोडून दिला आहे.

# भजनें

पण तो सोडून हि उरलेला मुख्य जो गाथाविभाग म्हणायचा त्यांत हि, भक्तजनांच्या पारिभाषिक अर्थानें नव्हे साहित्यिकांच्या नेहमींच्या अर्थानें,भारूड कमी नाहीं.याचीं दोन-तीन कारणें आहेत. तीं लक्षांत घेतलीं म्हणजे यांत आश्चर्यासारखें नाहीं. एक कारण हें आहे कीं नाथांना पुराण सांगण्याची संवय होती. त्यामुळें त्यांचें लिहिणें पुष्कळ वेळां बरेंच पघळ असतें. भागवतांत हि तसा प्रकार आहे च. पण तेथें तो दोषरूप झाला नसून त्याला विशिष्ट गुणवत्ता आली आहे. वाचकांच्या चित्तावर विवेचनाचा स्पष्ट ठसा उमटावा अशी तेथें अपेक्षा आहे. गाथेंतील प्रत्येक उद्‌गार स्वतंत्र स्वरूपाचा असल्यामुळें ग्रंथासारखी अपेक्षा तेथें नसते. त्या दृष्टीनें पघळपणा पाल्हाळ, अतिरिक्त पुनरुक्ति दूषण ठरूं पाहते. पण पुराणिकाची संवय पुराणिक टाळूं शकत नाहीं. सारग्राही आधुनिकांनीं ती जबाबदारी उचलावयाची आहे. दुसरें कारण, शिक्षक त्या च त्या गोष्टी जवळ जवळ त्या च त्या भाषेत वेगवेगळचा विद्यार्थ्यांना पुन्हां पुन्हां सांगत असतो. त्या सगळचा जर एकत्र टांचून ठेवल्या तर भविष्यकालीन संपादकासाठीं ती एक कामगिरी योजून ठेविली, इतका च अर्थ होतो. तसें येथें झालें आहे. हीं सारीं टांचणें-टिपणें अथवा कथनें कवीला कवनाची संवय म्हणून कवितेंत लिहिलीं असलीं तरी तीं सारीं जशींच्या तशीं प्रकाशिलीं जावीं अशी लेखकाची अपेक्षा नाहीं. मोरोपंतांनीं निरनिराळचा छंदांचा सराव व्हावा म्हणून आपल्या आवडीची राम-कथा शेकडों वेळां गायिली आणि छंद:प्रभुत्व संपादिलें. तो एक कौतुकाचा विषय आहे. पण तें

सारें भरताड आजचे वाचक वाचण्याचें नाकारतील तर मोरोपंतांचा त्यानें विरस होणार नाहीं, उलट सोरस च होईल. नाथांच्या बाबतींत कारण वेगळें असलें तरी फलित तें च आहे. तिसरें कारण असें हि समाजावयास पाहिजे कीं नाथांच्या नांवावर आज छापलेली गाथा त्यांच्या नांवावर असली तरी कर्तृत्व जसेंच्या तसें त्यांनीं उचललें च पाहिजे अशी कांहीं त्यांच्यावर जबावदारी नाहीं. उदाहरणार्थ चित्रशाळेनें जो नाथांचा गाथा छापला आहे त्यांत शेंवटीं 'श्री एकनाथ महाराजकृत गीतासार' म्हणून एक ओवीबद्ध ग्रंथ जोडला आहे. त्याचा गीतेशीं कांहीं संबंध नाहीं, आणि नाथाशीं हि नाहीं, हें त्याच्या भाषेवरून नाथांच्या साहित्याशीं परिचय असलेला कोणी हि सांगूं शकेल. अशा प्रकारें अनेकांचा हातभार लागून आमच्या अनेक चांगल्या चांगल्या ग्रंथांचा चुथडा झालेला आहे; हें नाकारतां येणार नाहीं. अशीं हीं अनेक कारणें आहेत. त्यामुळें गाथेंतील भारुडाचा भार पुष्कळसा आपोआप च हलका होणार आहे.

तसा तो हलका केल्यानंतर उर्वरित भागाचें अवलोकन करतां त्यांत फार मोलाचीं उज्ज्वल रत्नें, अनुभवाच्या कांतीनें चमकणारीं, सूक्ष्म चिंतनानें वेधून समर्पक शब्दांत ओवलेलीं, आढळून येतात. माझ्या तर असें हि लक्षांत आलें कीं नाथांचें आत्म-चरित्र जितकें त्यांच्या कोणत्या हि ग्रंथांत प्रकट झालें नाहीं तितकें तें गाथेंतील कांहीं कांहीं अभंगांत आणि पद्यांत प्रकट झालेलें आहे. कित्येक ठिकाणीं एकनाथी भागवतांतील उत्कृष्ट विवेचनें त्याहून हि अधिक नेमक्या आणि वेचक्या शब्दांत एकेका लहानशा अभंगांत गोवलेलीं आहेत. एक च उदाहरण देतों—

अग्नीस्तव निपजे अन्न । तें वाफ जिरतां परमान्न
पोळी अवशेष तापलेपण । रांधितेंहि जाण चवी नेणे ।।
आंबेया पाडू लागला जाण । तरी अंगीं असे आम्लपण
सेजेसी मुरलीया मघमघोन । न चाखतां घ्राण चवी सांगे ।।
सेजे मुरावयाची गोठी । तेथें नव्हाळी द्वैताची दिठी
येरयेरां जाहलीया भेटी । दोन्ही शेवटीं ठिकाळती ।।

—एकनाथी भागवत, १२ : ५९७–९९

या तीन ओव्यांशीं अभंग ७४ तोलून पहावा. अशीं अनेक उदाहरणें आहेत.

धर्म आणि तत्त्वज्ञान यांचें जें कांहीं वाचन मीं केलें आहे तें सारें माझ्या चिंतनाला मदत म्हणून, केवळ आत्म-समाधानासाठीं केलें आहे. नाथांच्या गाथेंतील अनुभव-रत्नें देखील माझ्या उपयोगासाठीं मी अनेक वर्षें सावकाश निवडीत आलों आहें. त्यांचा ह्या एकत्र संग्रह एकोणीसशें एकेचाळीस सालीं मी जेलमधें असतांना प्रथम प्रकाशित केला गेला. आतां दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं त्यावर मीं पुन्हां बारकाईनें नजर टाकली आहे. कांहीं अभंग बदलून घातले आहेत. जुळणींत हि किंचित् बदल केला आहे. आतां ही निवड आणि जुळणी, दोन्ही माझ्या मनाजोगत्या झाल्या आहेत. सबंध गाथ्यांतून केवळ तीनशें पद्यें घेतलीं आहेत. गणिताच्या भाषेंत बोलायचें म्हणजे अतिसंक्षेपरूप दिलें आहे.

हीं वचनें मुळांत मोकळीं आहेत. आणि येथें जरी प्रकरणांत बांधून त्यांना विशिष्ट आकार दिल्यासारखे केलें आहे, तरी तीं मोकळीं च समजायचीं आहेत. विशिष्ट आकार देण्यांतला हेतु साधकाला पहिल्यापासून अखेरपर्यंत साधनेचा ओघ निरखतां

यावा एवढा च आहे. ती हि निरख त्यानें मोकळेपणानें च करायची आहे. पूर्वापर-संबंधाच्या कैचींत न सांपडतां आणि विस्कळित हि न होतां नुसता अनुबंध पाहून घ्यावा, म्हणजे योजनेचा अपेक्षित लाभ पदरांत पडेल.

निवड करण्यांत कधीं कधीं असा उद्देश असतो कीं वाचकांना गोडी लागून मूळची सबंध कृति पाहण्याची त्यांना प्रेरणा व्हावी. माझा उद्देश नेमका याच्या उलट आहे. ही निवड आत्मसात् केली म्हणजे तेवढ्यानें साधकाचें काम भागावें, त्याला मूळच्या अफाट विस्तारांत संचरण्याची गरज राहूं नये. जी मेहनत आम्हांला करावी लागली ती त्याला करावी लागूं नये, असा यांत उद्देश आहे. म्हणून निवड वेंचक असली तरी सांगोपांग केली आहे. नाथांचें या निवडीनें समाधान होईल याविषयीं मी निःसंशय आहें. हे निवडलेले अभंग माझ्याशीं मी शेकडों वेळां घोळलेले आहेत आणि खात्री झाली आहे कीं

लौकिकापुरता नव्हे हा विभाग, साधलें अव्यंग सुख-सार।
अवीट विटेना ...... (भ. ७८)

# स्थूल चरित्र

या अभंगांत नाथांचा अनुभव कसा प्रकटला आहे, तें पाहण्यापूर्वी नाथांच्या चरित्राचें थोडें चिंतन उपयोगी होईल. स्थूल चरित्र सर्वांना माहीत च आहे. आपणाला मुख्यत: त्यांचें भावचरित्र पहावयाचें आहे. तथापि स्थूल चरित्राचा हि थोडक्यांत आराखडा पाहून जाऊं.

पैठण येथें भक्त भानुदासाच्या कुळांत नाथांचा जन्म, इसवी सन १५३३.

त्यांचे गुरु सुप्रसिद्ध जनार्दनस्वामी. समानशील साध्वी गिरिजाबाईशीं त्यांचा विवाह. अमर कृति भागवत. पहिली पंचाध्यायी पैठणला. पुढील अध्याय काशीला. समाप्ति सन १५७३. वय चाळीस. दोन वर्षांनंतर जनार्दनस्वामींचा मृत्यु, सन १५७५. ज्ञानेश्वरीचें संशोधन, सन १५८४. नाथांचा मृत्यु, सन १५९९, वय सहासष्ट. नाथांच्या परिवारांत त्यांचा अयाचित सेवक श्रीखंड्या, त्यांच्या मुलीचा मुलगा प्रतिभावान् कवि मुक्तेश्वर, त्यांच्या मागून सुमारें दहा वर्षानें जन्मलेले त्यांचे मानसपुत्र तुकाराम महाराज—हीं नांवें महाराष्ट्राला अविस्मरणीय आहेत.

नाथांचे समकालीन गोस्वामी तुलसीदासजी नाथांच्या एक वर्ष आधीं जन्मास आले. नाथांच्या भागवताशीं तुलनीय त्यांची अमर कृति 'रामचरित-मानस' उर्फ तुलसी-रामायण. समाप्तिकाळ सन १५७४. भागवत-समाप्तीनंतर एक वर्षानें. त्यावेळीं त्यांचें वय ४२. नाथांच्या भागवताप्रमाणें च तुलसी-रामायणाचा हि

अधिक भाग काशीला लिहिला गेला आणि समाप्ति हि काशीला झाली. म्हणजे हे दोन महापुरुष एकाच काळीं काशीला जनतेचीं पापें धुऊन टाकणारे गंगाजल-तुल्य असे आपले दिव्य ग्रंथ गंगेच्या कांठीं लिहीत होते.

स्थूल चरित्राचा आराखडा येथें संपतो.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ....................
क्रमांक ........................ नों दिः ....................

## : ५ :

# भाव-चरित्र

आतां भाव-चरित्र पहायचें.

(अ) मनुष्याचें भाव-चरित्र अथवा अंतर्जीवन जरी मुख्यत: त्याच्या स्वत:च्या भावनेचें बनलेलें असतें, तरी ती भावना बनविण्यांत इतरांचा हि पुष्कळ हात असतो नाथांच्या भावनेचा मूळ गाभा त्यांच्या कुळांत पूर्वापर चालत आलेल्या भक्ति-संस्काराचा आहे. त्यांचे पणजे भानुदास यांचें सारें जीवन विठ्ठलाच्या भक्तीनें भावित झालें होतें. त्यांचा मृत्यु (इ. स. १५१३) आणि नाथांचा जन्म यांत फक्त वीस वर्षांचें अंतर होतें. आणि नाथांचे आई-बाप लहानपणीं च वारल्यामुळें त्यांचे आजे चक्रपाणि यांनीं च त्यांचें संगोपन केलें. साहजिक च चक्रपाणि यांच्या मुखांतून भानुदासांची जीवनगाथा नाथांना लहानपणीं अनेकवार ऐकावयास मिळाली असेल. भानुदासांच्या जीवनांतली मुख्य घटना विठ्ठलाची मूर्ति, जी विजयनगरचा धर्मनिष्ठ राजा कृष्णराज यानें बहुधा संरक्षणाच्या उद्देशानें विजयनगरला नेऊन ठेवली होती ती, पुन्हां पंढरपुरास परत आणणें ही आहे. एखाद्या राज्यस्थापनेहून ही घटना कमी महत्त्वाची नाहीं. असंख्य भक्त-जनांची जी अधिदेवता तिच्या मूर्तीचें रक्षण करण्याची शक्ति त्या भक्त-जनांत नसावी आणि तिचें रक्षण करण्याची पाळी राज्यसत्तेवर यावी, यासारखी भक्तीला लांछन लावणारी गोष्ट आणिक कोणती असूं शकेल ? राजा कृष्णराजाला मूर्तीच्या सुरक्षिततेची खातरजमा झाल्याशिवाय ती मूर्ति परत आणणें शक्य च नव्हतें. आपल्या भक्तीच्या बळावर सर्व भक्त-जनांचा प्रतिनिधि बनून जेव्हां तशी खातरी

भानुदास देऊं शकले तेव्हां च तो ठेवा त्यांना परत मिळवतां आला, हें उघड आहे. या त्यांच्या कृतीनें त्यांनीं भक्तजनांची च नव्हे, पण सबंध महाराष्ट्र देशाची लाज राखली. भक्तीच्या क्षेत्रांतील हा त्यांचा महापराक्रम बालपणीं नाथांच्या कानावर किती वेळां पडला असेल,याची आपण कल्पना करूं शकतों. जसा घडा सबंध मातीचा बनलेला असतो, तसें नाथांचें बालमन या घटनेचें बनलेलें आहे. त्यांना ती घटना एका अद्‌भुत चमत्कारासारखी जीवनभर आठवत असेल. देवा-भक्तांचें परस्पर प्रेम वर्णीत असतां

'जरी देव नेऊनि घातला दूरी,
परतोनि पाहे तंव घराभीतरीं ।' (भजन १२८)

असें नाथांनीं जें चमत्कारपूर्ण वर्णन केलें आहे, तें करतांना त्यांच्या डोळ्यांसमोर कुणाचें चित्र असेल ? 'संत आधीं देव मग' (भ. १३०), 'भक्त देवाचा हि बाप' (भ. २२४), इत्यादि उल्लेख त्याच स्फूर्तिस्थानांतून निघालेले आहेत. भानुदासांचें मृत्युसमयीं पासष्ट वर्षांचें वय होतें. नाथांचें तेवढें वय होतां च नाथांना हि देहविसर्जनाची प्रेरणा झाली. इतकें त्यांचें जीवन भानुदासांच्या स्मरणानें भारलेलें होतें.

* * *

(आ) आपण भानुदासासारखें व्हावें अशी तळमळ लहानग्या एकनाथाला लागून राहिली होती. तों च त्यांना मार्गदर्शक हि सांपडला. जवळ च देवगिरीला जनार्दन स्वामी राहत असत. बारा वर्षांच्या वयांत नाथ त्यांच्याकडे पोंचले. आणि त्यांनीं त्यांची अर्धघडी आराम न घेतां, आणि तहानभूक विसरून (भ.१७३),दीर्घकाल सेवा केली.शेंवटीं त्यांना गुरूपासून जी दृष्टि

लाभली ती 'जनीं जनार्दन' या सूत्रवाक्यांत नाथांनीं आपल्या सबंध साहित्यांत असंख्य वेळां उल्लेखिली आहे–

जन ते चि जनार्दन, एका जनार्दनी भजन (भ. ४५)
जनीं जनार्दन प्रत्यक्ष डोळां कां न दिसे यासी (भ. १८६)
एका जनार्दनी जनीं जनार्दन, तयासी नमन (भ. २४५)
साकर दिसे परि गोडी न दिसे, ती काय त्या वेगळी असे,
तैसा जनीं आहे जनार्दन (भ. २७६)
जन नोहे अवघा हा जनार्दन (भ. २८५)
अवलोकितां जन, दिसे जनार्दन (भ. ३००)

इत्यादि स्थळें या च भजन-संग्रहांत पहायला सांपडतात. त्यांच्या इतर साहित्यांत हि तीं अशीं च भरपूर आहेत.

"जनैर् अर्च्यते याच्यते इति जनार्दनः" सर्व लोक ज्याची याचना करतात, ज्याच्यापाशीं मागतात, तो जनार्दन. या व्युत्पत्तीनें जनार्दन शब्द परमेश्वरवाची सर्वश्रुत आहे. आपल्यापुरतें गुरुस्मरण हि नाथांनीं त्यांत साधून घेतलें आहे. 'भजगोविंदम्' मधें शंकराचार्यांनीं सर्व लोकांसाठीं ईश्वरभक्तीचा आदेश देऊन आपल्या गुरुभक्तीचा हि निर्देश गोवून टाकला; कारण 'गोविंद' हें त्यांच्या गुरूंचें हि अभिधान होतें. नाथांनीं हि ती च कल्पना उचलली; कारण त्यांची हि तशी च श्रद्धा होती, (भ. १७२). आपली गुरु-भक्ति इतरांवर लादायची नाहीं, आणि आपली सोडायची नाहीं, अशी ही शिष्टांची रीत आहे.

'जनीं जनार्दन' हें सूत्र आतां सर्व च भाषांत आढळून येतें. त्याचा उगम कुठून झाला हें निश्चित सांगणें कठिण आहे. त्याचा प्रसार गोदेपासून गंगेपर्यंतच्या भागांत तरी मुख्यातः नाथांमुळें

झाला, असें असण्याचा संभव आहे. जनसेवा ही च जनार्दनपूजा आहे, असें वाक्य मला मलयालम भाषेमधें वाचावयास मिळालें होतें. मलबारमधें परमेश्वराचें जनार्दन हें नांव विशेष ख्यात आहे. जनार्दनाचें एक फार मोठें देवस्थान तिकडे आहे. तसें जनार्दन हें नांव विष्णु-सहस्रनामांत संगृहीत असल्यामुळें अखिल-भारतीय च आहे. जसें 'विठ्ठल' आणि 'पांडुरंग' हें महाराष्ट्राचें च दुसरीकडे पसरलें तसें जनार्दनाचें नाहीं. सारांश, 'जनीं जनार्दन' या सूत्राचें एखादें विशिष्ट उगमस्थान नसण्याचा च संभव आहे; आणि तें च योग्य आहे. कारण विशाल कल्पना या उगमरहित च शोभतात, आणि उगमरहित च असूं शकतात. तथापि गुरुकृपेनें लाभलेला हा बोध नाथांनीं आपल्या जीवनांत मुरवला, त्यावर च सारें जीवन रचलें,याबद्दल सबंध महाराष्ट्राची साक्ष आहे. म्हणून मराठी भाषेपुरतें बोलावयाचें तर या मंत्राचे द्रष्टे जनार्दनाचे शिष्य एकनाथ च ठरतात.

जनसेवा हें मानवाला सहज उपलब्ध असलेलें ईश्वरभक्तीचें अत्यंत सुलभ आणि तितकें च समर्थ साधन आहे, या विचाराला वेदापासून वैष्णवसंप्रदायापर्यंतच्या साहित्यांतून आधार दाखवितां आले तरी, कोणत्या हि कारणामुळें असो, येथील साधकांच्या साधनेंत एकंदरीत त्याचा प्रभाव कमी च उमटलेला आहे. येथील साहित्याचा सारा ओघ पाहून याचें कारण माझ्यापुरतें मीं असें ठरविलें आहे कीं जनसेवेचें काम वर्णव्यवस्थेनें परभारें च होऊन जातें, अथवा जावें, अशा कल्पनेनें साधकांनीं अंतरंग साधनेंतून हा विचार वगळला. पण वर्णव्यवस्था गेलीं हजार दोन हजार वर्षे मूळच्या परिशुद्ध स्वरूपांत कुठें च अमलांत नव्हती. उलट तिचें विकृत रूप च सर्वत्र अंमल गाजवीत होतें. त्यामुळें साधकांची

कल्पना कल्पनेंत च राहून गेली. वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्या ज्या थोड्या सूक्ष्म दृष्टीच्या आणि जनसंपर्कांत राहणाऱ्या साधकांनीं ही गोष्ट हेरून घेतली, त्यांत नाथांची ठळकपणें गणना होते. जनार्दनस्वामी स्वतः जनसेवेंत राबणारे च साधक होते. ते त्यावेळचे एक सरकारी नोकर च होते. या बाबतींत त्यांचें न्यायमूर्ति रानडे यांच्याशीं साम्य आहे. उपमा अक्षरशः घ्यायची नाहीं. न्यायमूर्ति रानडे एक तळमळीचे भक्त होते. आणि जनार्दनस्वामी मुक्कामावर पोंचलेले सिद्ध पुरुष होते. पण या फरकामुळें जनार्दनस्वामींनीं जाणून-बुजून विशिष्ट मर्यादा पत्करून केलेली जनसेवा अधिक च खुलून निघते. अशा गुरूपासून दृष्टि लाभलेला एकनाथ जनसेवेच्या विचारानें अंतर्बाह्य भरून गेला, यांत नवल नाहीं.

'संसार ब्रह्मस्फूर्ति सांडोनियां अहंकृति'– (भ. २५४),

'परमार्थें साधे सहज संसार, सहज संसारें घडे परमार्थ' (भ.२०),

'जगाचिये नेत्रीं दिसे तो संसारी, परी तो अंतरीं स्फटिक शुद्ध' (भ.२१ )

इत्यादि आत्मविश्वासाचे उद्‌गार अनुभवाशिवाय कोण काढूं शकणार ? एके ठिकाणीं तर नाथांनीं येथपर्यंत म्हणून टाकलें कीं ईश्वरभावनेनें सर्वभूतसेवा करणें हें बहिरंग साधन च नव्हे तर अंतरंग साधन हि आहे; किंबहुना सर्व च साधन तें आहे. ज्ञान भक्ति विवेक विरक्ति सर्व च त्यांत येऊन जातें (भ. २१४). याहून अधिक निकराची भाषा काय असूं शकणार ?

या ठिकाणीं एका गोष्टीकडे लक्ष वेधणें जरूरीचें आहे. 'जन ते चि जनार्दन' अशी खूणगांठ बांधून हि नाथ सहसा 'जनसेवा'

असा शब्द योजीत नाहींत. जनार्दनाची सेवा, किंवा भगवद्भाव, अशी भाषा बोलतात. यांत एक दृष्टि आहे, आणि ती च मला तरी मानवते आणि अधिक योग्य वाटते. एकदां एका हरिजन-सेवकाला मीं लिहिलें होतें– "हरिजनांची अथवा सामान्य जनांची होईल ती सेवा आपण अवश्य करूं; पण आपण हरिजन-सेवक अथवा जन-सेवक न होतां हरि-सेवक च होऊं या." 'जन ते चि जनार्दन' याचा अर्थ जन-सेवा ही आपोआप च जनार्दन-सेवा होऊन जाते असा करणें अनुभवाला धरून नाहीं. कोणती हि सेवा हरिभावनेनें भावित होईल तेव्हां च ती हरिसेवा ठरेल. एरव्हीं ती अनेक प्रकारच्या रागद्वेषांत, आसक्तींत, पक्षपातांत, लोटूं शकते. केवळ व्यक्तिगत स्वार्थी जीवनापेक्षां जनसेवेच्या जीवनांत चिंतनाची लांबी-रुंदी वाढली तरी खोली वाढते च असें नाहीं. म्हणून हातपाय जनसेवेंत राबवीत असतां चित्ताची हरीशीं गांठ घालणें श्रेयस्कर आहे.

* *

(इ) 'जनीं जनार्दन' एवढी गुरुकृपादृष्टि घऊन नाथांनीं गृहस्थाश्रम सुरू केला. पण त्यांच्या हातून ज्याला ते 'सहज संसार' म्हणतात तो सहजगत्या घडून येण्याला त्यांच्या समानशील सह-धर्मचारिणीकडून अमूप मदत मिळाली. पतीच्या व्रतमय जीवनांत विलीन होणाऱ्या त्या पतिव्रतेच्या ऋणाचा उच्चार तिच्या इच्छे-विरुद्ध नाथ कसे करूं शकणार ? तथापि एका अभंगांत त्यांनीं त्या ऋणाचा अगदीं अभावितपणें बेमालूम उल्लेख करून ठेवला आहे.

"संतांवांचूनियां नाम न ये हातां,
साधनें साधितां कोटि जाणा ।
जैसें कांतेविण करणें संसार,
साधन-विचार व्यर्थ ठेला । —(भ. १५७)

"कनक कांता न ये चित्ता, तो चि परमार्थी पुरता" (भ. ४५), यांतली कांता वेगळी आणि ही कांता वेगळी हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं.

(ई) भानुदास, जनार्दनस्वामी, आणि गिरजाबाई या तिघांशिवाय आणखी एक चौथा होऊन गेला, ज्यानें नाथांची 'जनीं जनार्दन' भावना अत्यंत दृढ केली. नाथांच्या साधुत्वाच्या सुगंधानें अनेक भ्रमर ओढले गेले त्यांत एक पंधरा-सोळा वर्षांचा देहानें आणि मनानें बलवान् असा एक बाल होता. नाथांच्या घरीं सेवेसाठीं आलों आहें असें म्हणून त्यानें आश्रय मागितला. नाथांनीं तूं कोण, कुठला, म्हणून विचारपूस केली असेल. त्याला बटु 'वामना' नें बळीला जशीं उत्तरें दिलीं तशासारखीं त्यानें श्लेषयुक्त उत्तरें दिलीं असतील कीं काय कुणास ठाऊक! अथवा शंकराचार्यांच्या त्या हस्तामलकासारखीं दिलीं असतील! मी त्यावेळीं हजर नव्हतों आणि म्हणून मला तीं कांहीं माहीत नाहींत. त्याला नाथांनीं आपल्या घरीं ठेवून घेतलें आणि चंदन उगाळणें, पाणी वाहून आणणें, इत्यादि देव-सेवेचीं कामें त्याला सोपविलीं. तो तीं एकनिष्ठपणें करूं लागला आणि चोवीस तास आनंदानें राहूं लागला. दहा-बारा वर्षें तो गुरु-दास्यानें कृश आणि गुरु-प्रेमानें पुष्ट झाला. त्याचें तारुण्य लक्षून नाथांनीं गिरजाबाईसमोर लोक-रीतीस अनुसरून त्याच्या विवाहाची गोष्ट काढली. तो मुलगा दुसऱ्या दिवशीं कांहीं च न कळवतां गुपचुप निघून गेला तो कधीं च परत आला नाहीं. अथवा त्याची पुढें कांहीं खबर हि कळली नाहीं. हरिप्रेमानें रंगलेल्या नाथांच्या मनानें घेतलें कीं या रीतीनें परमेश्वरानें च माझ्या घरीं येऊन माझ्याकडून कांहीं च सेवा न घेतां माझी सेवा केली. आणि त्याची कांहीं सेवा

करण्याची मी गोष्ट काढल्याबरोबर तो निष्काम प्रभु माझ्या दृष्टींत ज्ञानांजन घालण्यासाठीं निघून गेला.

"श्रीएकनाथ-सदनीं माधवजी सर्व काम हें करितो." असे भाविक लोक बोलत च आहेत. पण नाथ हि स्वमुखानें तसें च म्हणत आहेत (भ. २३३). हा चौथा नेहमीं च भक्तांच्या जीवनांत कुठें-ना-कुठें हात घालीत असतो. आणि त्याच्या स्पर्शानें त्याचें सबंध जीवन तो भारून टाकीत असतो. भक्त मग त्याच्या-साठीं आपला देह रिकामा करीत असतो आणि तो च त्याच्या देहांत कायमचा नांदत असतो. नाथांची श्रीखंड्याच्या स्पर्शानें अशी दशा झाली. आणि कुणाला हि मानव-रूपांत पहावयाचें नाहीं, हरि-रूपांत च पहावयाचें, असा त्यांनीं कायमचा निश्चय करून टाकला.

# जन ते चि जनार्दन

(अ) जनसेवेच्या आणि हरिजन-सेवेच्या रूपांत हरिसेवा करायची असा ज्यांचा जीवन-निर्णय झाला त्यांच्या जीवनाचें आणि चिंतनाचें आणि आकांक्षेचें स्वरूप आपण कल्पूं शकतों. जसें तें आपक कल्पूं तसें च तें नाथांचें झालें आहे. आपण एक एक कल्पना करूंया आणि नाथांपासून धडा घेऊंया.

'जन ते चि जनार्दन' या मूल सिद्धांतापासून साधना कर्मयोग-मय असावी हा उपसिद्धांत अगदीं युक्लिडच्या पद्धतीनें निष्पन्न होतो. 'कर्म' म्हटलें कीं कर्मठपणा आणि कर्माच्या पाठीमागें धावत सुटणें, हे दोन दोष चिकटूं पाहतात. उलट 'योग' म्हटलें म्हणजे कर्मशून्य काल्पनिक ध्यान-साधनेकडे कल जातो. कर्माग्रही पुरुष आत्म्याची मूळ निष्कर्म भूमिका गमावून बसतो. कर्म सोडून काल्पनिक ध्यानाच्या मागें लागणारा पाय खंडून वाट चालूं पाहतो. कर्मयोगी हे दोन्ही दोष टाळतो. तो ओघानें आलेलें सहज-प्राप्त कर्म आचरून तें च भगवंताला अर्पण करून मोकळा होतो (भ. १८, १९) . तो शुद्धअशुद्धाचा हि फार वाद घालीत नाहीं. कर्म अधिकांत अधिक शुद्ध आचरावें ही त्याची दृष्टि राहते च (भ. १०५), पण शेंवटीं 'सहज-प्राप्त तें कर्म न सोडावें सदोष हि' या गीता-वचनाप्रमाणें त्याची भूमिका असते. नाथांनीं आपल्या सबंध साहित्यांत कर्मयोगाचें समत्व-युक्त समर्थन केलें आहे. आणि त्यांचें स्वतःचें जीवन त्याचें उत्तम उदाहरण झालें आहे.

* * *

(आ) लोकसेवक कर्मयोगी लोकभाषेचा कैवारी असणें स्वाभाविक च आहे (भ. ३५), पण नाथांनीं निरभिमानवृत्ति राखून ज्या तऱ्हेनें लोकभाषेची प्रतिष्ठा सिद्ध केली त्यांत त्यांची विशेषता आहे. नाथांनीं भागवत मराठींत आणलें, हें त्यांचें काम त्या वेळच्या शास्त्रि-पंडितांना, प्रत्यक्ष नाथांच्या विद्वान् मुलाला हि, आक्षेपार्ह वाटलें. त्यावर नाथांनीं काय केलें? नाथांनीं त्या भागवताचे तयार झालेले अध्याय त्या आक्षेपकांच्या च हातीं सोपविले आणि म्हटलें, "जर मुळांतील अर्थाला कांहीं न्यूनता आली असेल, अथवा भावगौरवाची हानि झाली असेल, तर आपण हें लिखाण गंगेंत अर्पण करूं शकतां." या त्यांच्या वागण्यांत त्यांचा आत्मविश्वास, त्यांची नम्रता आणि समोरच्या माणसाचें हृदय जिंकून घेण्याची सत्याग्रही पद्धति दिसून येते. पंडितांनीं काय केलें? एके ठिकाणीं काडी घालून तेवढा भाग वाचून पाहिला. त्यांना त्यांत दूषण देण्यासारखें कांहीं दिसलें नाहीं. दिसलें असतें तर तो ग्रंथ तिथें च टाकाऊ झाला असता. कारण त्यांची परीक्षणाची रीत च अशी होती कीं एक काडींत निघालेला भाग नापास ठरला कीं सबंध ग्रंथ नापास ठरायचा. आणि एक काडींत पास ठरला तर आणखी दहा-पांच ठिकाणीं काड्या घालून बघायचा. नापास करणें अशक्य झालें तर च ग्रंथ पास करायचा. पंडितांनीं ग्रंथ पास केला म्हणजे त्याला काळाची भीति उरली च नाहीं. नाथांचा ग्रंथ त्या गुण-दोष-विचक्षण पंडितांनीं चारी बाजूंनीं कसोटीनें चाळून काल-निर्भय ठरवून आदरपूर्वक लोकगंगेंत सोडून दिला. गुणज्ञ पुरुषाला गुणज्ञान टाळतां येत नाहीं. संस्कृतांतील धर्म-ग्रंथ प्राकृत भाषेंत आणणें अधर्माचें आहे, असा पंडितांचा आक्षेप दिसत नाहीं. तसा आक्षेप त्यांना घेणें हि शक्य

राहिलें नव्हतें. कारण ज्ञानदेवानें आपल्या दिव्य सामर्थ्यानें त्याचें केव्हां च निराकरण करून ठेवलें होतें. पंडितांची शंका मराठी भाषेच्या शक्तीसंबंधानें हि तितकीशी नसावी. कारण ती हि शक्ति ज्ञानदेवानें दाखवून दिली होती. पण त्यांची शंका नाथांच्या योग्यतेविषयीं दिसते. तशी शंका घेण्याचा त्यांचा अधिकार, आणि ती निवारण करण्याचें आपलें कर्तव्य, नाथांनीं मानलें. लोक-भाषा समृद्ध झाल्याशिवाय आणि तिला निर्विवाद मान्यता मिळाल्याशिवाय लोकजीवन उन्नत होणें शक्य नसल्यामुळें नाथांनीं लोकभाषेसाठीं एवढे सायास केले. ज्ञानदेवांनीं जरी हें च कार्य पूर्वीं केलें होतें, तरी त्यांच्या व्यक्तित्वाचें अलौकिक तेज 'बाल-पणीं च सर्वज्ञता वरी तयातें' या त्यांच्या च वर्णनाप्रमाणें बाळ-पणीं च प्रकट झाल्यामुळें तें कार्य त्यांच्या व्यक्तिगत गौरवाचें ठरणारें होतें, मराठी भाषेच्या गौरवाचें तितकेंसें ठरणारें नव्हतें.

लोकभाषेसाठीं नाथांनीं दुसरी महत्त्वाची जी गोष्ट केली ती 'ज्ञानेश्वरीचें संशोधन.' नवीन देऊळ बांधण्यापेक्षां हि प्राचीन देवळाच्या जीर्णोद्धाराचें पुण्य मोठें मानलें जातें, तें अगदीं यथार्थ च आहे. ज्ञानदेव हा मराठी जनतेसाठीं देवानें पाठविलेला निरोप्या होता, हें नाथांनीं ओळखलें होतें. त्यांचा तो निरोप परिशुद्ध स्वरूपांत, कांहीं भेसळ न होतां जसाचा तसा निखळ रूपांत लोकांना मिळत राहील अशी सोय केल्यानें जनतेचें जें कल्याण साधणार होतें, तें कोणता हि नवीन ग्रंथ लिहिण्यानें साधणारें नव्हतें. ज्ञानदेवापासून नाथांच्या काळापर्यंत तीनशें वर्षांचा अवधि लोटला. तेवढ्यांत मूळची ज्ञानेश्वरी ओळखूं न येण्याइतकें विकृत रूप लोकांनीं ज्ञानेश्वरीचें करून ठेवलें होतें. त्याचें शोधन करण्यांत नाथांना भागवत-लेखनापेक्षां हि अधिक

परिश्रम पडला. त्यामुळें त्रासून जाऊन क्षमाशील आणि शांति-जलधि अशा नाथांनीं ज्ञानेश्वरीच्या पाठांत इतउत्तर भेसळ केली जाऊं नये म्हणून अशी भेसळ करूं पाहणारास अहिंसक भाषेंत शाप देऊन ठेवला आहे.

*　　　　*　　　　*

(इ) हरि-भावनेनें जनसेवा करणाऱ्या सेवकाला लोकांच्या जीवनाची घडण चाळवणें सहसा आवडत नाहीं. चालत असतांना वाटेवर एखादा किडा पडला असला तरी अहिंसक पुरुष हळूंच पाऊल मागें फिरवून वळण घेऊन पुढें जातो. कारण, नाहीं तर निजलेल्या त्या स्वामीची झोंप मोडेल, त्याच्या रचलेपणाला धक्का लागेल, अशी त्याला धास्ती वाटते, असें ज्ञानदेवानें वर्णिलें आहे. एखाद्या किड्याच्या विषयीं जर एवढी काळजी, तर मानव-समाजाशीं वागतांना किती काळजी घ्यायला पाहिजे? म्हणून समाज-रचनेंत सहसा हात घालूं नये. व्यक्तींच्या मनो-रचनेंत फरक घडवीत घडवीत समाज-रचनेंत अशा कुशलतेनें फरक घडवून आणावा कीं तो कोणास एकाएकी कळूं हि नये आणि समाज तिकडे पार पालटून जावा, अशी थोर सुधारकांची करणी असते. आज जो उठला तो आपल्या जीवनांत काडीचा हि फरक न करतां सबंध ब्रह्मांड-रचना पालटून टाकण्याची भाषा बोलूं लागला आहे. अशा मनोवृत्तीला थोर सुधारकांच्या या करणीचें आकलन होणार नाहीं. पण सुधारकांच्या जादूची सारी खुबी अनाक्रमणशील आक्रमणांत असते. नाथांच्या जीवनांत आणि साहित्यांत हें पहावयास सांपडतें. एऱ्हवीं अंत्यजाचें पोर कडेवर घेणें, श्राद्धाचें अन्न ब्राह्मणांच्या आधीं महारांना देणें, इत्यादि गोष्टी ज्या त्यांनीं केल्या, त्या त्यांच्या काळाकडे पाहतां

समाजाला असामान्य धक्का देणाऱ्या होत्या. तथापि तसा धक्का देत असतां हि धक्का देत असल्याचा भास त्यांनीं होऊं दिला नाहीं. केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन जें करणें योग्य तें च केलें जात आहे, असा गुणोत्कर्षाचा ठसा उमटविला. यांत च नाथांचें नाथपण आहे. मोरोपंतांप्रमाणें सारे लोक हें च म्हणत राहिले कीं–

बा एकनाथा दयाळूंत तूं थोर, दीना जनांचाचि भारी तुला घोर।
त्वां अंत्यजाचें कडे घेतलें पोर, तारीं जसे कोटि तैसाचि हा मोर ॥

त्या दृष्टीनें स्वतः सबंध जन्मभर मूर्तिपूजा करीत राहून हि मूर्तिपूजेंतील दोषांचा निषेध त्यांनीं कसा आत्मीयतेच्या हक्कानें केला आहे (भ. २४ ते २७), तसें च समाजांतील उच्चनीच-भाव काढून टाकण्याविषयीं त्यांनीं समाजाला कसें विनविलें आहे (भ. ६१ ते ६३), हें पाहण्यासारखें आहे.

* * *

(ई) निरंतर भगवद्-भावनेनें वर्तणारा पुरुष हा एक परिशुद्ध परीस च समाजाला पाहिजे. म्हणजे त्याचा स्पर्श असलेल्या वातावरणांत लोखंडाचा गंध हि उरूं नये, सारें सोनें च होऊन जावें, अशी अपेक्षा राहील. परिसाच्या उपमेऐवजीं चंदनाची आणि वैरागर मण्याची उपमा घेऊन नाथांनीं ही च अपेक्षा व्यक्त केली आहे. तूं चंदन आहेस आणि तुझ्या सर्वांगीं सुवास आहे, तर तो सुवास गप्प कसा राहील ? सभोंवतालचे तरु तुझ्या सहवासानें चंदन कसे होणार नाहींत ? तूं जर वैरागर-मणि आहेस आणि तेजानें परिपूर्ण आहेस तर सभोंवतीचे हरळ (गारगोटे) तुझ्या स्पर्शानें हिरे कसे होणार नाहींत ? अनुभवी गुरूपासून दृष्टि लाभलेला एकनाथ म्हणतो–"तूं जर पूर्ण संसिद्ध झाला आहेस, तर तुझ्या संनिधींत येणारा कोणी हि तुझ्यासारखा कसा होणार नाहीं ?" हा मी १४० व्या भजनाचा अर्थ गद्यांत विवरला

आहे. ही शुद्ध सत्याग्रही निष्ठा आहे. भगवद्-भावनेनें भूतांची सेवा करूं पाहणारा कोणी या निष्ठेचा अस्वीकार करूं शकत नाहीं, याहून वेगळी कल्पना करूं शकत नाहीं. सत्याग्रह-शस्त्राला पराजय माहीत नाहीं, असें गांधीजी म्हणत. तो च आशय १३९ व्या भजनांत आलंकारिक भाषेंत नाथांनीं मांडला आहे. "संत हे फार मोठे घातकी आहेत, त्यांचा घात करूं शकणारा आजवर कोणी भेटला नाहीं. त्यांनीं निज-बोधाचा फास घालून, उभ्या आणि आडव्या गंधाचे दोघे गोसावी, काम आणि क्रोध, मारून टाकले. त्यांनीं सर्वांचा निःपात करण्याचा उद्योग आरंभिला. आपल्या चारी बाजूंचे चारी गांव त्यांनीं भर दिवसां जाळून टाकले." असें नाथांनीं त्यांचें कौतुक केलें आहे. इंद्राच्या पराक्रमाचें वेदामध्यें असें च वर्णन शतशः आलें आहे. शेंवटीं या रूपक-शैलीचें पांघरूण फेकून देऊन एकदां ऋषीनें साध्या भाषेंत सत्य सरळ सांगून टाकलें :

**मायेत् सा ते यानि युद्धानि आहुः**
**नाद्य शत्रुं न नु पुरा विवित्से ।**

"हे इंद्रा, तुझीं युद्धें-युद्धें म्हणून जीं म्हटलीं गेलीं, ती केवळ माया च होती. तुला आज हि कोणी शत्रु नाहीं, आणि मागें हि कोणी नव्हता." सूर्यावर अंधकार हल्ला करतो आणि सूर्य आपल्या सहस्र किरणांनीं अंधकाराचें विदारण करतो—याचा अर्थ इतका च कीं सूर्यापुढें अंधार तोंड दाखवीत नाहीं, सूर्याला अंधार माहीत नाहीं. सूर्य नसणें म्हणजे च अंधार असणें. पूर्ण अहिंसेमधें सहज च वैर-त्याग होतो, वैर उरत नाहीं, असें पतंजलि म्हणतो. परिपूर्ण भगवद्-भावनेसमोर दुर्जनता दर्शन च देत नाहीं, असें नाथ म्हणतात. इंद्राला वैर माहीत च नाहीं, असें वेद म्हणतो.

सत्याग्रह-शस्त्राला पराजय माहीत नाहीं, असें गांधीजी म्हणतात. या सर्वांचा अर्थ एक च आहे.

हरि-भावनेनें भारलेला पूर्णात्मा सारें विश्व आत्मसात् करील, त्याला आपलें च रूप देईल—या सिद्धांतांतून एक प्रतिसिद्धांत असा हि निघतो कीं देहाच्या उपाधींत असतांना कोणी हि पूर्णात्मा होऊं शकत नाहीं. अर्थात् उंचांतले उंच महात्मे हि अपूर्ण असणार, आणि त्यांच्या अपूर्णतेच्या मानानें दुर्जनांची त्यांच्याशीं कमी-अधिक गांठ पडणार. आणि सहाजिक च मग दुर्जनांच्या प्रतिकाराचा हि प्रश्न उठणार. तो सोडवायचा कसा? या च सत्याग्रही निष्ठेचा विनियोग करून तो सोडवायचा. दुर्जनांचा प्रतिकार म्हणजे दुर्जनतेचा प्रतिकार, म्हणजे च बाहेर दिसून पडणाऱ्या दुर्जनतेचा निज-हृदयांत शोध. हें समीकरण-सूत्र पक्कें झालें म्हणजे क्षमाशील वृत्ति, क्लेशसहन, उदार-भाव, निरहंकार वृत्ति, नम्रता, अक्षोभ्य शांति, मोकळें हृदय, यत्न-सातत्य, फलत्याग हा च प्रतिकाराचा मार्ग ठरतो. आणि ईश्वर-भक्ताची नेहमींची जीवन-पद्धति ही च असते. अशा रीतीनें नित्याची जीवन-पद्धति आणि प्रसगिक प्रतिकार-पद्धति, दोन्ही एकरूप च होऊन जातात. असा विचार केला म्हणजे लक्षांत येतें कीं सत्याग्रह ही वस्तुतः एक जीवन-पद्धति च आहे. ओघानें अथवा आपाततः च तिचें प्रतिकार-पद्धतींत रूपांतर झाल्याचा परिस्थितीमुळें आभास होतो. मी हें नीट मांडूं शकलों कीं नाहीं, मला सांगतां येत नाहीं. सत्याग्रह-विचार शेवटीं अद्वैतांत मिसळून इतका सूक्ष्म बनतो कीं तो शब्दानें व्यक्त करणें कठिण च आहे.

सत्याग्रहाचीं ऐतिहासिक काळांतील आदर्श उदाहरणें म्हणून आपण जीं आठवतों त्यांत एकनाथांचें उदाहरण आहे. दुर्जनानें

अंगावर थुंकत जावें आणि नाथांनीं पुन: पुन: स्नान करीत जावें, ही एखादी कल्पित कहाणी नाहीं. नाथ-कालीन सत्ताधीश वर्गाच्या मदांधतेची निदर्शक अशी ती ऐतिहासिक घटना आहे. मला वाटतें, सत्याग्रहाचें याहून चांगलें उदाहरण दाखविणें कठिण आहे. येशू ख्रिस्ताच्या आणि ख्रिस्तपूर्व चिनी तत्त्वज्ञ लाओत्से यांनीं दिलेल्या निर्वैरतेच्या शिकवणुकीचा उल्लेख करून टिळकांनीं गीता-रहस्यांत "आमच्या महाराष्ट्र-साधु-मंडळांत तर एकनाथ महाराजांसारख्यांनीं याप्रमाणें आचरण केल्याच्या कथा हि आहेत," असा नाथांच्या या उदाहरणाचा अभिमान-पूर्वक उल्लेख केला आहे, तो सर्वथा योग्य च आहे.

या बाबतींत ओघानें एका गोष्टीचा खुलासा करणें जरूर आहे. "एका गालावर मारलें असतां दुसरा गाल पुढें कर" ही ख्रिस्ताची शिकवण अथवा नाथांची वरील वागणूक हि, अप्रतिकार-सूचक आहे, गांधीजींची शिकवण अहिंसात्मक पण प्रतिकाराची आहे, असा एक श्लेष मंडळी काढीत असतात. मला हा श्लेष चुकीचा वाटतो. शाब्दिक श्लेष च पहायचा तर ख्रिस्ताच्या वाक्यांत हि प्रतिकार दिसून पडणारा आहे. "तुझ्या गालावर मारलें असतां तिकडे तूं लक्ष देऊं नको" अथवा "तूं स्वस्थ रहा" असें त्याचें वाक्य नाहीं "दुसरा गाल पुढें कर" असें वाक्य आहे. ज्यांना प्रतिकार-शब्दाविषयीं प्रीति जडली असेल त्यांचें यांत समाधान होण्यासारखें आहे. पण माझ्या दृष्टीनें हें समाधान आणि तो श्लेष दोन्ही कुचकामाचीं आहेत. परिपूर्ण निर्भय आणि निर्वैर पुरुषाची सहज वागणूक, मग तिचें स्वरूप सक्रियतेचें असो, निष्क्रियतेचें असो, प्रतिक्रियेचें असो, एकरूप च असतें. दुर्जन अंगावर थुंकला असतां एखादा निर्वैर पुरुष आपण आपल्या

अंगावर थुंकून घेईल, दुसरा निर्वैर पुरुष कांहीं च न करतां हास्य-मुखानें पुढें चालूं लागेल, तिसरा निर्वैर पुरुष नाथांप्रमाणें प्रति-क्रियारूप स्नान करील, चौथा निर्वैर पुरुष प्रसन्न वदनानें आणि आत्मीय भावनेनें समोरच्याचे कान धरणारा कल्पितां येईल. परंतु गांधीजींच्या अहिंसेची अथवा सत्याग्रहाची अशी विशेषता सांगतां येईल कीं गांधीजींनीं त्या कल्पनेचा सामुदायिक प्रयोग केला. नाथादिकांचा तो व्यक्तिगत प्रयोग होता. हा भेद खरा आहे. पण तो हि बराचसा परिस्थितीच्या कारणानें झालेला आहे. त्या त्या काळाची एक आवश्यकता आणि एक शक्यता असते. तदनुकूल च त्या त्या काळच्या महापुरुषांना हि सुचत असतें. शिवाय विश्व-व्यापक विशिष्ट शक्तींचे हि प्रयोग आधीं व्यक्तिगत क्षेत्रांत होऊन तेथून कसोटीस उतरल्यानंतर पुढें सामुदायिक घडायचे अशी च विज्ञान-पद्धति आहे. वैज्ञानिकांचे सारे प्रयोग आधीं लॅबोरेटरींत साधायचे आणि मग जगांत पसरायचे. लॅबोरेटरींतील अनुभवांच्या आधारानें च ते जगांत जाऊं शकायचे. अशा सरणींत अडचण कांहीं च राहत नाहीं; व्यापक विनियोग करतांना व्यावहारिक मर्यादा काय लागू होतील तेवढ्या सांभाळल्या म्हणजे झालें. पृष्ठभूमितींतील बहुतेक सारे सिद्धांत बिंदूऐवजीं रेखा, रेखेऐवजीं पृष्ठ, अशा फरकानें जसे घनभूमितींत सहज लागू होतात, तसें च येथें हि आहे. म्हणून व्यक्तिगत आणि सामूहिक प्रयोगांत तत्त्वत: कांहीं फरक मानण्याची गरज नाहीं. परिस्थिति-भेदामुळें सामुदायिक प्रतिकाराची कल्पना सुचणें नाथांना शक्य नव्हतें. त्यांना तसें कोणीं खोदून च विचारलें असतें तर समाज-संरक्षणासाठीं क्षात्र धर्मास मान्यता देऊन हि ते मोकळे झाले असते, असा हि संभव आहे. किंबहुना एकदां जनार्दनस्वामी ध्यानमग्न

असतांना आलेलें परचक्र नाथांनीं स्वत: घोड्यावर बसून परतवल्याची गोष्ट सांगितली जाते. या गोष्टीला तसें फार महत्त्व देण्याची गरज नाहीं. कारण तें नाथांचें निजचरित्र नसून नाथकालीन कर्तव्यनिष्ठ नागरिकाचें चरित्र आहे. नाथांचें चरित्र त्यांच्या सत्याग्रहांत आहे; तेवढें च लोकांनीं आणि टिळकांसारख्यांनीं हि लक्षांत ठेवलें आहे.

*　　　*　　　*

(उ) सत्याग्रह शब्द नाथांना माहीत नव्हता. पण त्यांच्या सबंध जीवनांत आणि मनोरचनेंत ती वस्तु मुरलेली होती, हें लक्षांत घेतलें म्हणजे—"आपुलीच दारा । जरी टेके व्यभिचारा । क्रोधाचा थारा । अंतरीं न ये" इत्यादि आत्यंतिक शांतीचीं जीं त्यांनीं वर्णनें केलीं आहेत (भ. १४७), त्यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. सगळे च संत शांत असतात. तथापि संत-मंडळांत हि नाथांची शांति कर्णाच्या उदारतेप्रमाणें विख्यात आणि म्हणवजा झाली आहे. ज्ञानदेवांना एकदां राग आला आणि त्याबद्दल 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' म्हणून मुक्ताबाईचा त्यांना मार खावा लागला, हें पाहतां शांतीचा उत्कर्ष साधण्यांत नाथांसारखे नाथ च होते, असें म्हणावें लागतें. या बाबतींत त्यांनीं आपला अनुभव एके ठिकाणीं दोन-चार शब्दांत च अशा मार्मिक रीतीनें मांडला आहे कीं तो कोणा हि साधकाचें लक्ष वेधल्याशिवाय राहणार नाहीं. ते म्हणतात, "देहीं वाढे जों जों शांति, तों तों विरक्ति आंगीं बाणे। ऐसा आहे अनुभव..." वैराग्यशील माणसांत कांहीं एक प्रकारची कटुता असते अशी सार्वत्रिक कल्पना आहे. त्याच्या नेमकें उलट हें नाथांचें कथन आहे. विरक्ति आणि शांति हे त्यांनीं पर्याय च केले आहेत. ही च खरी आणि समग्र दृष्टि आहे. एरव्हीं

लोक-कल्पनेनुसार 'नुसतें वैराग्य हेकाड पिसें' ठरून त्याच्या मद-तीला, म्हणजे त्यांतील दोषांच्या निवारणासाठीं विवेकाची जोड त्याला देऊन विचाराची पूर्णता करावी लागते. ही सारी भानगड नाथांनीं आपल्या अनुभवाच्या बळानें कापून टाकली आहे. ज्या वैराग्यगुणानें साधकाचा कर्मयोग, ध्यानयोग, आणि चिंतन-योग सफल व्हायचा तो स्वतः च लुला-पांगळा आणि बावळा कल्पून घेतला, तर साधकाला आशा च काय राहिली ? म्हणून नाथांनीं अगदीं योग्य मार्गदर्शन केलें आहे. त्याचा आम्हा साधकांना कधीं हि विसर न पडो.

नाथांचें हें असें विविध दर्शन त्यांच्या या निवडक अभंगांत पाहून घेण्यासारखें आहे.

---

: ७ :

# कीर्तन-भक्ति

हरिजन-सेवा, जन-सेवा, आणि यथासंभव सर्वभूत-सेवा हें मानवाचें जीवित-कर्तव्य आणि तो च त्याचा मोठा यज्ञ, या कल्पनेमुळें आम्ही आजचे परमार्थ-साधक उभे आहोंत. पण ही कल्पना ऋग्वेदांत हि स्पष्ट निर्देशिली आणि आदेशिली आहे. एक च मंत्र येथें देतों :

स्वादु-क्षद्मा यो वसतौ स्योनकृत्,
जीव-याजं यजते सोपमा दिव: ।

"घरीं आलेल्या माणसाला जो गोड करून घालतो, आणि त्याच्या राहण्याची जो सुखकर सोय करतो, तो जीवन-यज्ञ यजतो. तो या भूमीवर स्वर्ग च आणतो." असा या मंत्राचा भावार्थ आहे. यज्ञ कल्पना गीतेनें विस्तारिली आणि संशोधिली असें आपण म्हणतों, पण तें सारें संशोधन गीतेचें स्व-कल्पित नाहीं, वेद-मूलक च आहे.

पण मंत्राशिवाय यज्ञ नाहीं. आणि म्हणून प्राणि–सेवारूप जीव-यज्ञ यजूं इच्छिणाऱ्या सेवकांना मूलभूत मंत्राचें निरंतर चिंतन-मनन होत राहिलें पाहिजे. माझ्या हें लक्षांत आलें आहे कीं आमच्या बऱ्याचशा कार्यकर्त्यांना या गोष्टीचा विसर पडतो. ते आपलीं कामें करीत च जातात. अर्थात् हा तर गुण च आहे. पण चिंतनाला वेळ नाहीं म्हणतात. कोणी कोणी तर चिंतनाची गरज हि नाहीं म्हणतात. आणि कोणी म्हणतात, कामामुळें चिंतन सुचत च नाहीं. पहिले कर्म-भारवाही, दुसरे कर्म-वादी, आणि

तिसरे कर्म-जड. तिघे आपण करीत असलेल्या कामाला आपण च छेदून टाकीत असतात, पण त्याचें त्यांना भान हि नसतें. अशांच्या कर्मशक्तीला ज्ञानदेवांनीं आंधळ्या गरुडाच्या पंखांची उपमा दिली आहे. गरुडाच्या पंखांचीं ताकत, त्याची झेप, त्याची भरारी, सारें च अनुपम. पण त्याला निरालंब आकाशांतून मार्ग क्रापायचा असतो. तशा स्थितींत आंधळा गरुड डोळ्यांवांचून बाहेर येतो. पण डोळ्यांवांचून तो काय करूं शकणार ? अफाट कर्म-क्षेत्रांत ज्यांना वापरायचें आहे त्यांचें दृष्टीवांचून कसें चालणार ? म्हणून जीवनाच्या मूलभूत विचारांचें चिंतन कर्म करीत असतांना, करण्यापूर्वीं, आणि केल्यानंतर, तिन्ही काळीं चालू असलें पाहिजे. कर्म करीत असतां आणि कर्म करीत नसतां, दोन्ही अवस्थांत तें होत राहिलें पाहिजे. विचारांचें पाठबळ नसलेलें कर्म म्हणजे पाण्याच्या बाहेर काढलेली होडी च आहे. तिला ओढून फरफटत तरी न्यायची, किंवा पडून तरी ठेवायची. म्हणून तत्त्व-विचाराचा सतत पुरवठा होत राहणें सेवामय जीवनाच्या फार हिताचें आहे.

हें आमच्या भक्तिमार्गी संत मंडळींनीं चांगलें ओळखलें होतें. त्यांतले कांहीं कर्म सोडून बसले होते. त्यांचा विचार आपण सोडून देऊं. पण जे कर्म आचरीत होते ते हि नेहमीं नाम-संकीर्तन आणि विचार-संकीर्तन करीत असत. त्यासाठीं कीर्तन-भक्ति हा एक भक्तीचा प्रकारच त्यांनीं मानला होता. नारदांसारख्यांनीं तो खूप च चालविला. नारदांची तर

‘ विमुक्ति-ब्रहुसाधनें तदितरें गणी ना च तो
सजूनि वर-वल्लकी तव सभांगणीं नाचतो ’

इथपर्यंत मजल होती. ज्ञानदेवांनीं हि हा च विचार असा च फुलवून मांडला आहे (ज्ञानेश्वरी: गीता ९.१४ वरील ओव्या १९७ ते २११. भिडे संपादित, ढवळे प्रकाशित). किंबहुना ज्ञानेश्वरीला च त्यांनीं धर्म-कीर्तन असें नांव दिलें आहे. नामदेव, नाथ आणि तुकोबा तिघे हि तिला, आईला जशीं मुलें तसे, चिकटून राहिले आहेत. ईश्वराचा महिमा गातांना या मंडळींना कंटाळा च येत नाहीं. कीर्तनानें वक्ता आणि श्रोता दोघे पावन होतात (भ.११८). पशु पक्षी पावन होतात (भ.११७). चराचर पावन होतात (भ.१२०). असें हरि-कथेचें गौरव गाइलें गेलें आहे. नाथांनीं तर कीर्तनकारांची एक संस्था च बनविलेली दिसते. कारण, कीर्तनकारासाठीं त्यांनीं नियम घालून दिले आहेत (भ.१२५), आणि विषय हि सुचविले आहेत (भ.१२६). भक्ति-मार्गांतील हा एक कीर्तन-भक्तीचा विशेष, ज्ञानमार्गांत व्याख्यान-प्रवचन-भाष्यादि रूपांत दिसून पडतो. या दोन्ही मार्गांत त्याची जितकी गरज आहे त्याहून लोकसेवेच्या मार्गांत ती कमी नाहीं; उलट जास्त आहे. कारण, ज्ञानाची आणि भक्तीची सारी चर्चा तर कर्म-योगाला लागते च, त्याशिवाय सेवेच्या हि अनेक विषयांचें कीर्तन त्यांत हवें असतें.

कीर्तनकार आणि प्रवचनकार हे दोन्ही पैलू नाथांच्या जीवनांत होते. त्यांची छाया या अभंगांत चांगली उमटली आहे. दोन स्वतंत्र अध्याय च त्यासाठीं येथें आले आहेत. (अ.१७-१८)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ................ नों. दि: ................

# नाथ-पूर्वकालीन विचार-विकास

नाथांची निवडकगाथा, उपदेशपर आणि अनुभवपर दोन्ही, इतकी सुबोध भाषेंत उतरली आहे कीं ती समजण्याला बाहेरच्या मदतीची कांहींच गरज नाहीं. तथापि नाथ-पूर्वकालीन विचार-विकासाचा परिचय असल्यास त्यांचे निजानुभवाचे आणि साक्षात्काराचे जे उद्‌गार आहेत ते अधिक खुलून दिसतात. विशेषत: नाथांच्या चिंतनावर ज्यांचा विशेष परिणाम झाला आहे त्यांचा परिचय असणें, नाथांचें मनोगत नीट उकलण्याला उपयोगाचें आहे.

प्राचीन काळीं वैदिक, श्रमण आणि बौद्ध विचारांच्या लाटा एका मागून एक उत्तर भारतांतून दक्षिण भारतांत वाहत गेल्या. त्यांच्या वेगानें राज्यें मोडकळलीं आणि रचलीं, समाज पालटले, जाती उसळल्या आणि मिसळल्या, नव्या भाषा आणि नवे रीति-रिवाज उदयास आले. त्यानंतर मध्ययुगांत विचारांच्या अशा च लाटा दक्षिणेंतून उत्तरेकडे उलट वाहत गेल्या. या साऱ्या तत्त्व-ज्ञानाच्या आणि उपासनेच्या होत्या. शंकर, रामानुज, मध्व, ज्ञानदेव, वल्लभ असे पांच आचार्य एका मागून एक अनुक्रमें केरळ, तामिळनाड, कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र या भिन्न-भिन्न भाषा बोलणाऱ्या प्रदेशांत अवतरले. पैकीं ज्ञानदेवानें आपलें सर्व साहित्य आपल्या प्रांताच्या लोक-भाषेंत रचलें. इतरांनीं त्या वेळची मानलेली राष्ट्रभाषा जी संस्कृत तिचा आश्रय केला. रामानुजांनीं तामिळमध्यें थोडेंसें लिहिलें आहे, परंतु तें नगण्य

आहे. यांतील शंकर आणि ज्ञानदेव या दोहोंचा ठसा नाथांच्या अंतर्मनावर खोल उमटलेला आहे.

* * *

नाथांची ज्ञानदेवाशीं इतकी एकरूपता आहे कीं ज्ञानदेवाला वगळून त्यांची पृथक् कल्पनाहि करतां येत नाहीं. ज्ञानदेवाचें ज्ञानोत्तर भक्तीचें तत्त्वज्ञान नाथांनीं अक्षरशः उचललें. पण भक्तीचें स्वरूप सोपें करून त्यांनीं सामान्य जनांच्या आटोक्यांत आणून सोडलें. गुरु-भक्ति, समाजांत सद्गुण वाढावे याविषयीं चिंता, दोघांची सारखीच दिसून येते. दोघांनीं कृष्णभक्तीचा आश्रय केला, आणि दोघांनीं मिळून कृष्णानें आपल्या दोन शिष्यांना केलेले प्रबोध जनतेपर्यंत पोंचविले.

ज्ञानदेव कपिलाप्रमाणें जन्मसिद्ध पुरुष होते. नाथ क्रमाक्रमानें विकास पावणारे गृहस्थाश्रमी होते. असा त्यांच्यांत मोठा फरक असला तरी नाथांचें आराध्यदैवत निःसंशय ज्ञानदेवच होते. दोघांच्या बाह्य जीवनाकारांत फरक दिसला तरि आंतरिक चिंतन समान. ज्ञानदेवानें स्वतंत्र प्रतिभेनें विचार मांडावा, नाथांनीं 'पराधीनपणें' तो विवरावा असें त्यांचें नातें होतें. नामदेव हे ज्ञानदेवाचे प्रचारक होते, आणि नाथ विवरणकार. दिसायला त्यांनीं विवरण भागवताचें केलें आहे, पण तें आपोआपच ज्ञानेश्वरीचें विवरण झालें आहे. हा मुद्दा सर्व-मान्य असल्यामुळें अधिक विवरीत नाहीं. नाथांच्या भजनांतील एक-दोन स्थळें पाहून घेऊं, म्हणजे पुरें होईल.

पूज्यता डोळां न देखावी, स्वकीर्ति कानीं नायकावी;
हा अमुका ऐसी नोहावी, से चि लोकां ॥

इत्यादि गीता १३-७ मधील अमानित्वावरील ज्ञानदेवाच्या व्याख्यानाशीं १४५ वा अभंग तोलून पहावा. तसेंच १७० व्या

अभंगांतील—

अनन्य आवडीचें जळ । प्रक्षाळिले चरण-कमळ
वासना समूळ । चंदन लावी ।।

ह्या चरण ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायाच्या प्रस्तावनेंतील

अनन्योदकें धुवट, वासना जे तन्निष्ठ
तें लाविलेंसे बोट, चंदनाचें ।।

या ओवीचें रूपांतर आहे. या अभंगांतील गुरु-पूजेचें सबंध रूपक ज्ञानदेवाच्या रूपकाशीं तुल्य आहे.

तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी
गीतेमाजीं हरी बोलियेलें

ह्या उघडच ज्ञानेश्वरी १७-३६९ चा उल्लेख आहे.

मोक्ष देऊनि उदार । काशी होय कीर ।
परी वेंचणें लागे शरीर । तिये गांवीं ।।

हें ज्ञानदेवानें केलेलें भक्ताच्या शुचित्वाचें गौरव अभंग १३८ मध्यें जसेंच्या तसें उपलब्ध आहे. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील पण त्यांची गरज नाहीं.

* * *

ज्ञानदेवांचा आणि नाथांचा संबंध लोक-विदितच आहे. पण त्यांच्या जीवनावर शंकराचार्यांचा उमटलेला ठसा तितकासा लोक-विदित नाहीं. शंकराचार्यांचा अद्वैत-विचार ज्ञानदेवांनीं मान्य केला आणि तोच ओघानें नाथांच्या पदरांत पडला, तशा अर्थानें म्हणत नाहीं. पण नाथांचा शंकराचार्यांशीं सरळ संबंध दिसतो. त्यांनीं शंकराचार्यांच्या प्रकरणग्रंथावर विवरणें लिहिलीं आहेत त्यावरून तर हें दिसतेंच आहे, पण शंकराचार्यांच्या जीवनांतील एक अत्यंत सार-भूत वस्तु नाथांनीं त्यांच्यापासून घेतली आहे.

आणि तें ऋण त्यांनीं नमूद हि करून ठेवलें आहे. भागवताच्या प्रारंभीं व्यास, वाल्मीकि इत्यादि संस्कृत 'महाकवीं'ना आणि ज्ञानदेव, नामदेव इत्यादि 'कवीश्वरां'ना त्यांनीं रीतसर वंदन केलें आहे. त्याबरोबर भागवत-व्याख्यानकार श्रीधरस्वामी, ज्यांच्या टीकेचा आधार नाथांनीं घेतला आहे, त्यांचें वंदन केलें आहे. तें हि अपेक्षित च आहे. पण भागवताशीं कांहीं च संबंध नसतांना त्यांनीं शंकराचार्यांना हि वंदन केलें आहे. ती ओवी अशी आहे :

वंदूं आचार्य शंकरु । जो का ग्रंथार्थ-विवेक-चतुरु ।
सारून कर्मठतेचा विचारु । प्रबोध-दिनकरू प्रकाशला ॥

याहून अधिक नेमकें आणि अधिक समर्पक वर्णन शंकराचार्यांचें करतां येणार नाहीं. हिंदुधर्माची विवेकशून्य जड कर्मठतेंतून शंकराचार्यांनीं सुटका केली, या एका गोष्टीनें मुख्यतः नाथांच्या-वर त्यांची छाप आहे. नाथांनीं १४२ व्या अभंगांत आपल्या स्वतःच्या अवतारकार्याचें वर्णन केलें आहे. तो अभंग म्हणजे नाथांचें आत्म-चरित्र च आहे. 'आम्हा कां संसारा येणें ?' असा प्रश्न करून त्याचें उत्तर जें नाथांनीं दिलें आहे त्यांत महत्त्वाचें एक कारण असें सांगितलें आहे—

नाना मतें पाखंड । कर्मठता अति बंड ।
तयाचें ठेचणें तोंड । हरि-भजनें ॥

असें शंकराचार्यांचें आणि त्यांचें स्वतःचें एक फार मोठें जीवनकार्य समान दर्शविलें आहे. पण तें कार्य करण्याच्या दोहोंच्या पद्धतींतील फरक हि त्यांत सुचविला आहे. शंकराचार्यांनीं कर्मठतेचें निवारण तत्त्वविचारानें केलें आहे आणि नाथांना तें हरि-भजनानें करावयाचें होतें. हा तत्त्वज्ञानी आणि सत्याग्रही भूमिकेंतील भेद

आहे. बौद्ध विचाराचें निरसन हें शंकराचार्यांचें मुख्य कार्य पाश्चात्य इतिहासकारांनीं ठरवून टाकलें आहे. पण तें अगदींच अनैतिहासिक असून त्यांचें वास्तविक कार्य नाथांनीं जें हेरलें तेंच आहे.

शंकराचार्यांपासून आपलें एक मोठें जीवनकार्यंच नाथांनीं उचललें असल्यामुळें दोघांच्या ग्रंथांतील समान स्थळें बघत बसण्यांत कांहीं मोठेंसें तात्पर्य नाहीं. तथापि अभंगांतील एक स्थळ पाहून घेऊं :

मेघ वर्षे निर्मळ जळ । परी जैसें बीज तैसें फळ
तैसे भक्त अभक्त दोन्ही । वेगळीक वेगळेपणीं
एका जनार्दनी गुण । चंदन वेळू नोहे समान ॥--(भ.९)

हें वाचून शांकरभाष्यांतील 'ईश्वरस्तु पर्जन्यवत् द्रष्टव्य: ।' इत्यादि विवेचन आठवल्याशिवाय रहायचें नाहीं.

शंकराचार्यांनीं भक्ति मान्य केली असली तरी अंतिम अनुभवांत भक्तीची अपेक्षा केलेली नाहीं. किंबहुना भक्तीची स्थूल क्रिया तेथें कुंठित होऊन जाईल अशी अपेक्षा केली आहे. दोनशें-अठ्यांयशीव्या भजनांत नाथांचा एतद्सदृश अनुभव आलेला आहे, तो शंकराचार्यांच्या 'परापूजे' ची आठवण करून देतो. ज्ञानदेवानें त्याच्यापुढें जाऊन

देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु ।
तैसा भक्तीचा व्यवहारु । कां न व्हावा ?

असें अंतिम अवस्थेंत हि भक्तीचें समर्थन केलें आहे. त्याला अनुसरून 'अद्वैत-वृत्ति चालो, अक्षयीं भक्ति-योग' (भ. २२१), अथवा 'अभेद-भजनाचा हरिख' (भ.२३५), इत्यादि भाषा नाथांनीं

योजिली आहे. या हि पुढें नाथांनीं आणखी एक पाऊल टाकलें आहे. 'अभेदावांचूनि न कळे भक्तीचें महिमान' (भ. २१८) असें त्यांचें कथन आहे. यांत अभेदाशीं भक्तीचें जुळूं शकतें एवढेंच नुसतें समर्थन नाहीं, तर अभेदाशिवाय खरी भक्ति होऊंच शकत नाहीं, असा विचार उपस्थित केला आहे.

सारांश :

(१) भक्ति मान्य, पण अद्वैतानुभवांत ती कुंठित होते. (शंकर)

(२) अद्वैतांत हि क्रिया सहन न झाली तरी भक्ति राहूं शकते. (ज्ञानदेव) आणि

(३) अद्वैतानुभवावांचून भक्तीचें खरें स्वारस्य च कळत नाहीं. (नाथ)

असा उत्तरोत्तर विचार-विकास कल्पितां येईल. वस्तुतः तिन्ही मिळून एक पूर्ण अर्थ होत आहे आणि तो तिघांना हि मानवणारा आहे. भावार्थ इतका च आहे कीं उत्कट भक्ति आणि अद्वैत अगदीं भिन्न हि म्हणतां येत नाहींत आणि अभिन्न हि म्हणतां येत नाहींत. तीं दोन्ही परस्परमय आहेत. हें लक्षांत घेऊन त्या दृष्टीनें या पुस्तकांत आलेलें आत्मदर्शनाचें पांचवें प्रकरण अवलोकावयास पाहिजे.

* * *

नाथांच्या भक्तिपर अभंगांत कुठें कुठें भक्तांचें आणि भक्तीचें गाईलेलें गौरव वल्लभाचार्यांच्या 'पुष्ट' भक्तीच्या जवळपास जातें. उदाहरणार्थ देवाच्या तोंडीं घातलेली 'मी देह, भक्त देहातीत' (भ. २३७), इत्यादि भाषा वल्लभाचार्य फार बोलत असतात.

पण तेवढ्यावरून उभयतांचा ऋणानुबंध सिद्ध होईल असें नाहीं. नाथ पैठणचे आणि वल्लभ शेजारच्या च आंध्र प्रांताचे. आणि नाथांच्या जन्माआधीं दोन च वर्षांपूर्वी त्यांचा मृत्यु. दोघे हि भागवताचे प्रेमी. तेव्हां ऋणानुबंध नसला तरी अनुबंध असंभवनीय नाहीं. तसेंच भागवताचे तितकेच उत्कट प्रेमी चैतन्यदेव यांचा मृत्यु आणि नाथांचा जन्म एकाच वर्षातला. आणि ते तीर्थयात्रा-प्रसंगानें पंढरपूरला येऊन गेले होते. त्यांचाहि अनुबंध समानशीलतेनें नाथांशीं असू शकतो. पण वल्लभ आणि चैतन्य यांच्या कृष्णभक्तीहून नाथांची कृष्णभक्ति एका बाबतींत स्पष्टपणें अलग पडते. त्या दोघांची कृष्णभक्ति त्यांच्याच वळणाच्या सूरदासाप्रमाणें मर्यादा न जुमानणाऱ्या मस्तीची, आणि नाथांची कृष्णभक्ति ज्ञानदेवानें घालून दिलेल्या कित्त्याम अनुसरून तुलसीदासांच्या रामभक्तीप्रमाणें मर्यादा सांभाळणारी होती. तुलसीदासांची रामभक्ति तशी होती यांत नवल नाहीं; कारण रामभक्ति तशी च असू शकते. पण कृष्णभक्तीला मर्यादित राखण्याचें काम सोपें नव्हतें. आणि तें नाथांनीं उत्तम पार पाडलें आहे. हा त्यांचा मी विशेष समजतों. कदाचित् नाथ आणि तुलसीदास काशीस असतांना त्यांचा या बाबतींत कांहीं विचारविनिमय झाला असल्यास न कळे. इतर कृष्णभक्त एक तर सबंध भागवतावर लिहितात, अथवा तितकें न जमलें तर कृष्णलीलापर दशमस्कंधावर लिहितात. आणि नाथांना कृष्णचरित्राची पवित्र मधुरता हृदयंगम झालेली असून हि त्यांनीं विचारपर एकादशस्कंध विवरणासाठीं निवडला, यावरून नाथांच्या मनाची ठेवण कळून येते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्षमता.
अनुक्रम ............... वि: ...............
क्रमांक ...............९............... नों: दि: ...............

# नाथांचे ऋणानुबंध

मागचा ऋणानुबंध जसा एका बाजूनें प्रकाश पाडतो तसा पुढचा ऋणानुबंध दुसऱ्या बाजूनें प्रकाश पाडतो. नाथ गेल्यानंतर नऊ वर्षांनीं तुकाराम आणि रामदास हे दोन मोठेच तारे उदयास आले. दोघे हि आपआपल्यापरी नाथांचाच विचार पुढें चालविणारे, त्यांच्या विचारांचे वारस होते. शिवाय ते स्वतंत्र विचारक हि होते. तथापि नाथांच्या साहित्यानें दोघांच्या मनोविकासाला चांगलीच मदत केली होती, असें दिसून येतें.

* * *

पैकीं तुकाराम हे तर नाथांचे मानसपुत्रच म्हटले पाहिजेत. दोघे एकाच उपासनेनें बांधलेले, एकाच संप्रदायाचे पाईक होते. तुकारामांनीं भंडाऱ्यावरील एकांतांत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि कबीर या चौघांचा ध्यास घेतला होता, असें त्यांनीं स्वतःच निवेदिलें आहे. 'या चौघांची तरी धरीं सोई रे' असें ते आपल्या मनाला आणि जनाला शिकवीत. ज्ञानदेवाचें विचार-ऋण सर्वांनाच मान्य आहे. तुकारामावर एकनाथांचें विचारऋण सर्वांत अधिक दिसतें. कवित्वस्फूर्ति तुकारामांना नामदेवापासून झाली, पण विचारस्फूर्ति त्यांना नाथांपासून लाभलेली आहे. ज्ञानेश्वरी-पेक्षां भागवत सोपें म्हणून आरंभीं तुकारामानें भागवताचींच अनेक पारायणें केलीं, ही गोष्ट जगजाहीर आहे.

भक्तीची दोघांची भूमिका अगदीं एकरूप आहे. 'बहु भितों जाणपणा, आड न यो नारायणा ।' असें तुकाराम म्हणतात. तेंच

नाथांचेंहि म्हणणें आहे (भ. २१६). मुक्तीपेक्षांहि भक्तीचा महिमा थोर आहे (भ. २१७), याविषयीं दोघे एकमत आहेत. व्यक्तीच्या आणि समाजाच्या चित्तशुद्धीचें अगत्य दोघांना सारखें च वाटतें. एकशें बेचाळिसाव्या अभंगांत नाथांनीं समाजोद्धाराचें आपलें अवतारकार्य ज्या प्रकारें मांडलें आहे, नेमकें तसेंच 'आम्ही वैकुंठवासी आलों या च कारणासी' या अभंगांत तुकारामानें मांडलें आहे. आचरणावर दोघांचा समान भर आहे. जें जें बोले तैसा चाले (भ. १४३), हें नाथांचें वचन च 'बोले तैसा चाले, त्याचीं वंदीन पाउलें' या तुकारामाच्या उक्तींत उमटलें आहे.

पण इतकी सर्व एकरूपता असून हि त्यांच्या चिंतन-पद्धतींत कांहीं महत्त्वाचे फरक हि आहेत. संसार आणि परमार्थ एकरूप करावा, आणि एकरूप होऊं शकतो, अशी नाथांची भूमिका आपण पाहतों (भ. २०). एक विचार म्हणून जरी ही भूमिका तुकारामांना अमान्य नसली तरी व्यवहारतः दोहोंमध्यें उभा दावा आहे, असें तुकारामाचें हृद्गत आहे. "प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही, एक हि निदानीं नव्हे त्यासी । तुका म्हणे तया दोहींकडे धक्का ।" असें त्यांनीं मोकळेपणानें स्पष्ट सांगून टाकलें आहे. मला हें त्यांचें सांगणें फार आवडलें. नाहींतर जो उठला तो ज काचें आणि एकनाथाचें उदाहरण देऊन मोकळा होतो. आपलें स्वतःचें उदाहरण कुणीच घेत नाहीं. वैराग्याकडे कल असलेल्या मुलाला संसारांत गुंतविण्यासाठीं संसारासक्त आणि पुत्रासक्त बाप जनकाची आणि नाथांची अचूक आठवण काढतात. एरव्ही त्यांना त्यांची आठवण कधीं होत नाहीं. म्हणून तुकारामाच्या निर्भीड उक्तीचें मला फार महत्त्व वाटतें. एकनाथांना हि ही गोष्ट चांगली अवगत आहे (भ. ४३); पण 'सहज संसार' म्हणून त्यांनीं एक

कल्पिला आहे. आणि तो परमार्थाशीं एकरूप होऊं शकतो, असें त्यांचें म्हणणें आहे. विचार एकच असला तरी त्याच्या अनेक बाजू असतात आणि कोणत्या बाजूवर जोर द्यायचा हें ज्याच्या त्याच्या वृत्तीवर राहतें. केवढा हि मोठा मनुष्य असला तरी निजानुभव टाळून तो विचार करूं शकत नाहीं. तुकारामाच्या आणि नाथांच्या भूमिकेंतला हा भेद दोघांना संसाराचा जो अनुभव आला त्यांतून निर्माण झाला आहे.

दोघांच्या भूमिकेंतील हा भेद आणखी हि एका रीतीनें प्रकट झाला आहे. तुकारामाची सबंध साधना तळमळीची आणि संघर्षाची दिसते. नाथांची साधना समत्व-युक्त आणि शांतीनें चाललेली दिसते. 'नाहीं मानसीं तळमळ, सदा शांत गंगाजळ' ही आहे नाथांची साधना. तुकाराम हि पोंहोचले आहेत तेथें च, पण "तळमळी चित्त, दर्शनाची आशा," "तळमळी लाहीचिया परी" अशी त्यांची साधक-दशा दीर्घ कालपर्यंत चालली आहे. त्यांच्या शब्दांत असामान्य उत्कटता आली असून हृदयाला हलवून सोडण्याचें सामर्थ्य त्यांत आहे. या बाबतींत नामदेव आणि तुकाराम हे भाऊ भाऊ आहेत. त्या दोघांची साहित्य-गंगा नेहमीं पावसाळ्यांत पूर आल्यासारखी दुथडी वाहत असते. नाथांची साहित्य गंगा बहुतेक हिवाळ्यांतील नदीसारखी प्रसन्न वाहतांना दिसते. येथें निवडलेल्या तीनशें अभंगांत तळमळीचें दर्शन होत असलेलीं दहा-पांच भजनें च दिसून येतात (अध्याय २७), याचें मुख्य कारण नाथांना अनुभवी गुरु लाभला, आणि तुकारामाला स्वप्नांतल्या गुरूवर समाधान मानावें लागलें, हें आहे. त्यामुळें 'साधनाची आटी न करितां' (भ. २५८), सहजपणें त्यांचें काम झालें. गुरु-भक्तीच्या जिव्हाळ्याचे उद्गार (अध्याय २५ आणि ३५)

जसे एकनाथाच्या साहित्यांत तुडुंब भरलेले दिसतात, तसे तुकारामांत सांपडत नाहींत. तुकाराम दांभिक गुरूची निंदा करूं शकतात आणि स्वप्नांतल्या सद्‌गुरूचें वर्णन करतांना हि त्यांनीं 'माझ्या आवडीचा मंत्र' दिला म्हणून बरें झालें, त्यामुळें 'गुंफा' झाला नाहीं, नाहीं तर गुंफा झाला असता, अडचण पडली असती, असें सुचवतात.

पण गुरुभक्तीच्या आधाराची उणीव तुकारामानें वेगळ्या रीतीनें भरून काढली आहे. 'गुरूशिवाय गति नाहीं' असा आध्यात्मिकांचा अनुभव असला तरी तुकारामांची ती रीत जर साधकांना साधली तर ज्याला त्याला गुरु आपल्या च ठिकाणीं उपलब्ध होईल. तुकारामाच्या स्वप्नगुरूचा अर्थ तोच आहे. नाथांच्या मुलीचे मुलगे महाकवि मुक्तेश्वर यांच्या भाषेंत: 'विवेकासारखा नाहीं गुरु, चित्तासारिखा शिष्य चतुरु ।' ही ती रीत आहे. तुकारामांनीं ती रीत खूपच चालविली. रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग समजून त्यांनीं कठोर आत्म-परीक्षण केलें. चित्ताची अक्षरशः चिरफाड केली. त्याचे एकूणएक पापुद्रे सोलून काढले आणि महाप्रयासानें आत्म-विजय संपादून 'याचि देहीं याचि डोळां' आपलें कार्य साधलें. तुकारामाच्या अभंगांत खोल आणि बारीक आत्मपरीक्षणाचें जें दर्शन होतें तें दुसरीकडे कुठें क्वचित च पहायला सांपडतें. तुकारामाच्या अभंगवाणीची ती मी अद्वितीय विशेषता समजतों.

तुकारामाचा नाथांशीं ऋणानुबंध जरी उघड च आहे, तरी नाथांच्या अभंगांचें अध्ययन त्यांचें होतें काय, हा प्रश्न राहतो च. अभंग फुटकळ आणि वाऱ्यावर वाहत असायचे. त्यामुळें प्रबंध-ग्रंथ हातीं लागायच्या आधीं च ते कोणाच्या हि कामीं पडायचे.

पण त्याच कारणामुळें त्यांचें अध्ययन हि सहसा कमी व्हावयाचें. नाथांच्या आणि तुकारामाच्या अभंगांतील विचारांत किंवा शब्दांत साम्य आढळलें तरी भागवतांत हि तसेच विचार असल्यामुळें तेवढ्यानें अभंगऋण सिद्ध व्हावयाचें नाहीं. परंतु नाथांच्या कांहीं अभंगांचें तरी तुकारामांनीं आपल्या रीतीप्रमाणें 'विश्वासें आदरें' मनन केलें होतें असें मानण्यास जागा आहे. 'ऐसे कैसियानें भेटती ते साधु' असा एक नाथांचा प्रश्नार्थक अभंग प्रसिद्धच आहे (भ. १५१). तो लक्षांत घेऊन "ऐसे ऐसियानें भेटती ते साधु" असा एक उत्तरार्थ अभंग तुकारामानें रचला आहे. तो पाहतां संदेहाचें कारण राहत नाहीं. त्या मधुर अभंगांत तुकारामाच्या शिकवणुकीचें सार आलें असल्यामुळें तो सबंध येथें उतरून घेतों.

ऐसे ऐसियानें भेटती ते साधु । ज्यांच्या दरुशनें तुटे भव-बंधु ।
जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदु । जे कां मोक्ष-सिद्धी तीर्थां वंद्यु रे ।।१

भाव सर्व-कारण मूळ बंदु । सदा सम-बुद्धि नास्तिक्य-भेदु ।
भूत-कृपा मोडीं द्वेष-कंदु । शत्रु मित्र पुत्र सम करीं बंधु रे ।।२

मन बुद्धि काया वाचा शुद्ध करीं । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं ।
लघुत्व सर्वभावें अंगीकारीं । सांडी-मांडी मी-तूं-पण ऐसी थोरी रे ।।३

अर्थ-काम-चाड नाहीं चित्ता । मानामान मोह माया मिथ्या ।
वर्ते समाधानी जाणोनि नेणता । साधु भेट देती तया अवचितां रे ।। ४

मनीं दृढ धरीं विश्वास । नाहीं सांडी-मांडीचा सायास ।
साधु-दर्शन नित्यकाळ त्यास । तुका म्हणे जो विटला जाणिवेस रे ।।५

* * *

तुकारामाचा नाथांशीं संबंध सर्वांनींच मानलेला आहे. तसा तो रामदासांचा मानलेला नाहीं. पण तो आहे आणि चांगला

गाढ आहे. रामदासांचा जन्म हि नाथांच्या निर्वाणाच्या मागोमाग आणि पैठणच्या परिसरांत च झालेला असल्यामुळें हें सहाजिकच आहे.

दिसायला दोघांचे उपासना-संप्रदाय भिन्न दिसतात. आणि या गोष्टीला कित्येकांनीं महत्त्व देऊन ठेवलें आहे. नाथ कृष्णोपासक आणि रामदास रामोपासक असले तरी नाथांच्या कृष्णोपासनेंत रामाचा पूर्ण अधिकार आहे. राम कृष्ण हरि (भ. ८२) हा ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंत सर्वच संतांचा बीज-मंत्र आहे. 'राम कृष्ण वासुदेव' ही नाथांची जपमाळ आहे (भ. १२७). द्रौपदीच्या भावनेशीं एकरूप होऊन जसा नाथांनीं कृष्णाचा धांवा केला आहे (भ. १८८) तशी सीतेशीं समरस होऊन रामाविषयीं त्यांनीं आपली परम-विरहासक्ति प्रकट केली आहे (भ. १८७). या पुस्तकांतील अभंगांत हरि-नामासारखा च राम-नामाचा उल्लेख सरसहा केलेला आढळतो. किंबहुना आत्म्याला रामाशीं जोडून जसें आत्मारामाचें ध्यान लागलेलें दिसतें (भ. २७१, २८५) तसें हरीचें हि जमलेलें दिसत नाहीं. आत्मा-रामाप्रमाणें हरि-राम कांहीं साधला नाहीं. हें अर्थात् गमतीनें म्हणायचें. वस्तुत: भेद नाहीं च आहे. 'गुरु-कृपांजना' चा चमत्कार वर्णन करणाऱ्या भजनांत नाथांनीं रामाचें च नांव घेतलें आहे (भ. २६१). हें सहजगत्या अहेतुकपणें झालें असेल असेंच मानावयास पाहिजे. पण तें सहेतुक असावें अशी अभंग ९३ वरून मला शंका आली आहे. कारण त्या अभंगांत गुरूंनीं मला रामनामाचा मंत्र दिला असें नाथांनीं रहस्य प्रकाशिलें आहे.

जनार्दनें मज सांगितला मंत्र, राम-नाम पवित्र जप करीं
सोडवील राम संसार-सांकडीं, न पडेचि बेडी अरि-वर्गा ॥

रामनाम घेण्याचें कारण हि यांत दर्शविलें आहे. त्यांत रामानें 'देवांचीं बंधनें सोडविलीं' या गोष्टीकडे नजर आहे. तें कसें हि असो. नाथांना राम अणि कृष्ण या दोन भिन्न उपासना नव्हत्या, एवढें निःसंशय च आहे. नाथांनीं भागवताप्रमाणें एक मोठें रामायण हि लिहिलें आहे. त्यांना तें संपवितां आलें नाहीं. त्याचे पहिले चव्वेचाळीस अध्याय च ते लिहूं शकले, ही गोष्ट वेगळी.

रामदास रामाची उपासना करीत, त्यांत हि त्यांची कांहीं भेद-बुद्धि नव्हती. रामाची उपासना विशेष विचारानें रामदासानें निवडली होती, अशी भाषा शिक्षित मंडळींत ऐकूं येते. ती अगदींच चुकीची आहे. उपासना निवडण्याची ही कल्पनाच चमत्कारिक आणि अनुभवशून्य आहे. उपासना मातृ-स्थानीं असते. आईप्रमाणें ती सहज लाभलेली असते. उपासना निवडण्याचा जो उद्धटपणा करील त्याला ती उपासना काय तारील ? तो च तिला तारील अथवा बुडवील ! उपासना माता-पित्यांच्या मुखानें लाभलेली असते. अनुभवी गुरु शिष्याला त्याच्या कुल-परंपरेनें लाभलेल्या उपासनेला च दुजोरा देत असतात. तुकारामाच्या स्वप्नगुरूनें दाखविलेली अक्कल जागृतींतल्या गुरूंना हि असते. जागृतींतले गुरु ही अक्कल न राखतील तर ते गुरु च कसले, आणि त्यांची जागृति ती काय ? सारांश, रामोपासना रामदासांनीं निवडलेली नाहीं. 'आमचे कुळीं रघुनाथ' या त्यांच्या च वचनाप्रमाणें त्यांना ती कुल-धर्मानें लाभली आहे.

कुल-क्रमागत उपासना-भेद वगळल्यास, रामदासांच्या विचारावर दुसऱ्या कोणा हि मराठी संतापेक्षां एकनाथांचा अधिक परिणाम झालेला दिसून येईल. विशेषतः वागणुकींत सर्वत्र मध्यस्थ-वृत्ति राखावी हें रामदासांनीं सांगितलेलें निःस्पृहलक्षण,

आणि संसार आणि परमार्थ यांचा समन्वय साधण्याचें त्यांचें शिक्षण, दोन्ही एकनाथी विचारास अनुकूल आहेत.

पण त्यांतील दुसऱ्या मुद्द्याबाबत जो बारीक भेद आहे तो हि लक्षांत घ्यावयास पाहिजे. संसार आणि परमार्थ यांच्यांत उभा दावा आहे ही तुकारामानें सांगून टाकलेली खरी गोष्ट रामदासांच्या हि अंतर्यामांत भिनलेली आहे. "जयास वाटे सुखचि असावें। तेणें रघुनाथ-भजनीं लागावें। स्वजन सकळ हि त्यागावे। दुःख-मूळ जे ॥" हें आरंभिक साधनेविषयीं त्यांचें कथन, आणि "संसार मिथ्या ऐसा कळला। ज्ञान समजोनि निघोनि गेला। तेणें जन पावन केला। आपणा ऐसा ॥" ही ज्ञानी पुरुषाविषयीं त्यांची कल्पना, दोन्ही त्यांनीं आपल्या जीवनांत आचरलेलीं प्रमेयें पाहतां, संसार-त्याग च रामदासांना इष्ट आहे असा निष्कर्ष निघतो. परंतु सर्वसामान्य जनतेचा विचार करतां प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालण्याची कल्पना त्यांनीं पुरस्कारली आहे. अधिकार-भेद लक्षून घातलेली संसार-परमार्थाची सांगड, आणि एकनाथांप्रमाणें संसार परमार्थ एकरूप करणें, या दोन गोष्टींत अंतर आहे. एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांचीं एतद्विषयक सर्व वचनें विचारांत घेतलीं तर (१) 'संसार आणि परमार्थ यांत विरोध आहे'—हें प्राथमिक सत्य तिघांना हि मान्य आहे आणि (२) संसार आणि परमार्थ एकरूप होऊं शकतो, हें अंतिम सत्य हि कोणास नाकबूल नाहीं. पण,

तुकाराम संसारांत राहत असून हि परमार्थाशीं त्याचा विरोध न विसरणारे;

रामदास संसारापासून अलग राहून अधिकार-भेदानें त्याची परमार्थाशीं सांगड घालणारे; आणि

१२५४३०

एकनाथ संसार आणि परमार्थ यांतील भेद च मिटवून टाकण्याची हौस बाळगणारे;

असा या त्रि-मूर्तींमध्यें वृत्ति-भेद दिसतो.

पण एकनाथ आणि रामदास यांच्यातलें सर्वांत मोठें विचार-साम्य वेगळ्या च गोष्टींत आहे. दोघांनीं ज्ञानानंतर हि उपासना चालू रहावी याविषयीं आग्रह धरला आहे. ज्ञानानंतर हि भक्ति असूं शकते, हें ज्ञानदेवांनीं सप्रमाण सिद्ध केलेलें प्रमेय महाराष्ट्रांतील एकूण सर्व च संत मंडळींनीं, कोणी प्रत्यक्ष प्रमाण म्हणून आणि कोणी गृहीत-कृत्य म्हणून, स्वीकारलें आहे. त्याहून ही वेगळी गोष्ट आहे. ज्ञानोत्तर भक्तीची कल्पना जेव्हां ज्ञानदेव मांडतात तेव्हां 'भक्ति' हा आंतरिक भाव त्यांच्या मनांत असतो. भक्तीची कांहीं क्रिया त्यांनीं कल्पिलेली नाहीं. 'क्रिया किर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे' असें त्यांनीं च म्हटलें आहे. पण नाथांचा आणि रामदासांचा ज्ञानोत्तर उपासनेचा आग्रह हा एका विशेष क्रियेचा आग्रह आहे. उपासना म्हणजे उपासना-पद्धति, स्नान संध्या पूजा आदि विशिष्ट क्रिया, केवळ निरुपचार प्रेम च नव्हे पण विधियुक्त सोपचार उपासना, असें त्यांच्या मनांत आहे.

ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानूं ना
तरी या दोषाच्या पतना । पावों अभक्तपणें ।।

या शब्दांत रामदासांनीं आपला आग्रह मांडला आहे. आणि नाथांचा हि स्नानसंध्या-उपासनेचा प्रयोग अगदीं शेवटपर्यंत चालू राहिलेला दिसतो. या पुस्तकांत सबंध अडतिसावा अध्याय त्या विषयाला वाहिलेला आहे--जरी अद्वैताच्या भावसमाधींत मधें-मधें पूजा अडखळल्याचें हि त्यांना नमूद करावें लागलें आहे

(भ. २८८). पण अडखळो कीं तुटून पडो, करीत रहायचें असा त्यांचा बेत दिसतो. अर्थात यांत साधनेची वाट अखंड चालू रहावी, पुसली जाऊं नये, ही च काळजी दिसते. निर्गुणाचा निःसंदेह अनुभव कोणास कधीं लाभेल तो लाभो, पण बौद्धिक ज्ञानाच्या जोरावर सगुणाला तोडून पाडणें मात्र कोणाला हि साधूं शकतें. एकनाथांनीं हें च असें मांडलें आहे :

काय तें करावें संदेही निर्गुण,
ज्ञानानें सगुण ओस केलें (भ. १०९)

रामदासांनीं नेमका हाच अभिप्राय याच भाषेंत कसा मांडला आहे पहा :

निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्म-ज्ञानें ।
दोहींकडे अभिमानें । ओस केलें ॥

नाथांच्या विचाराचा च नव्हे पण शब्दांचा हि 'मागोवा' रामदासांनीं घेतला आहे.

पण वैधी उपासना चालू राखण्याचा आग्रह जरी दोघांचा समान दिसतो, तरी त्यांत हि थोडा दृष्टि-भेद आहे. नाथांची भूमिका मुख्यतः भक्ताची आहे. रामदासांच्या भूमिकेंत समाज-संघटनेचीहि छटा आहे. त्यामुळें रामदासांच्या उपदेशांत कुठें कुठें विचार-संकोच झालेला दिसतो, तो नाथांच्या साहित्यांत सहसा आढळत नाहीं. संघटनेचा हव्यास धरला कीं चौकट बनूं लागते. ती टाळण्याचा भक्तांचा उपाय संघटनेंत न पडतां चित्त-शुद्धीवर जोर देणें हा असतो. अनासक्त नेत्यांचा उपाय, संघटन करीत हि जाणें आणि मोडीत हि जाणें असा असूं शकतो. त्यांतला दुसरा अंश न साधल्यास धोका उघड च आहे.

* * *

नाथांच्या ऋणानुबंधाचा इतिहास अलीकडच्या काळापर्यंत पहायचा तर न्यायमूर्ति रानडेंचांच्या चरित्रांत, प्रार्थना-समाजांत त्यांनीं दिलेल्या भागवत-धर्मावरील व्याख्यानांत, आणि रानडेचां-च्या एकंदर मनोरचनेंत, पाहतां येतो. पण अभंगांच्या या निवडीशीं तो प्रस्तुत नसल्यामुळें उल्लेखून सोडून देणें च योग्य.

---

: १० :

# उपासनेचें अमृत

मागच्या प्रकरणांत रामदासांशीं तुलना करण्याच्या ओघांत नाथांच्या उपासनेची थोडी चर्चा केली होती. तें च अमृत आपण आतां चाखूंया.

ईश्वराच्या उपासनेचें मुख्य स्वरूप नाम-स्मरण हें च आहे. या अभंगांत ईश्वराला अनेक नामांनीं आळविलें आहे. आपण एक एक नांव घेऊं आणि त्याचें थोडें चिंतन करूं.

**'राम कृष्ण हरि'** हा तर ज्या वारकरी समाजाचे नाथ अध्वर्यु होते त्याचा मूलमंत्र च आहे (भ. ८२). तेव्हां या नांवांचा उच्चार किती वेळां झाला आहे हें पाहण्याची गरज च नाहीं. ज्यांत मन रमून जातें तो राम (भ.२७१). ज्याच्या आकर्षणाचा वेध लागतो तो कृष्ण (भ.२८७). आणि ज्याचें नांव घेतां च चिंता हरपली तो हरि (भ. १०७). अशी या नांवांची व्युत्पत्ति सुचवली गेली आहे. 'राम' म्हणजे सत्, कृष्ण चित् आणि हरि आनंद, अशी हि नाथांनीं भावना केली आहे.

ज्याला गीतेचा नाद आहे तो सर्व-निवासी **'वासुदेवा'** च्या नांवाचा टाहो फोडल्याशिवाय राहणार च नाहीं (भ. २२१). आणि क्षराक्षरातीत **'पुरुषोत्तमा'**ला तरी तो कसा विसरणार? (भ. २०७).

**'विठ्ठल'** आणि **'पांडुरंग'** हीं महाराष्ट्राच्या मालकी हक्काचीं नांवें. जरी तो मालकी हक्क आतां सबंध हिंदुस्थानच्या वांट्यांत

वांटला गेला आहे, तरी मूळ हक्क त्यावर मराठ्यांचा च आहे. विठ्ठल-नाम मुख्यत: नामदेवांनीं सगळीकडे पसरविलें. नरसी मेहता, मीराबाई आणि शीख गुरु सर्वांकडून त्यांनीं तें वदविलें. विठ्ठल-नामावर मुख्य हक्क मराठ्यांचा हें मीं थोडें गाफीलपणानें च म्हटलें. कन्नडभक्त पुरंदरदास आणि कानडी मंडळी या गोष्टीचा इन्कार करतील, आणि "विठ्ठल हा कानडा कर्नाटकु" या ज्ञानदेवाच्या वचनाचा आधार घेऊन आपला च पहिला हक्क सांगतील तर त्यांचा तो दावा आम्ही नाकारूं शकणार नाहीं.

पंढरपुरचा 'पांडुरंग,' श्रीरंगम्‌चा 'श्रीरंग,' तिरुपतीचा 'बालाजी,' अशी यात्रा च करीत चाललों तर **'जगन्नाथ'** च कां वगळावा ? नाथांनीं त्याचें हि आवाहन केलें आहे (भ. २०३). विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाची खूण हृदयांत बाळगून हि नाथांनीं 'विठ्ठल' नाम असें विशिष्ट कल्पिलेलें नाहीं. त्यांचें तें नाम अत्यंत व्यापक आहे. सर्वांना वेष्टून असलेला तो विठ्ठल असा त्यांचा भाव दिसतो (भ. १०६).

पांडुरंगाची प्रसिद्धि उत्तरेकडे जितकी नाहीं तितकी दक्षिणेकडे आहे. पांडुरंगावर कदाचित् महाराष्ट्राची मालकी विठ्ठलापेक्षां हि अधिक चालेल (भ.१८०). पण त्याच रंगांत रंगलेला जो **श्रीरंग** (भ. १२४). तो मात्र तामिळ-तेलगूवाल्यांनीं पटकावला आहे.

**'श्रीपति'** हें हि नांव दाक्षिणात्यांचें लाडकें आहे. श्रीपति आणि श्रीरंग एक च आहे. श्रीपतीचें च रूप तामिळ भाषेंत 'तिरुपति' होतें. हा च तिरुपतीचा बालाजी. याला च 'व्यंकट-रमण' असें हि म्हणतात. आहे तो मद्रासकडे, पण मारवाड्यांना त्याचा लोभ आहे. पुष्कळांची त्यांतल्या 'तिरु' वर नजर असते. थोड्यांना तो पति हवा असतो.

**'केशव'** आणि **'नारायण'** हीं तर संध्येंतलीं आरंभींचीं नामें (भ. २८५), तीं नाथांना कशीं चुकतील ? पण नामदेवाच्या अभंगांत जसा पदोपदीं केशवाचा उच्चार होतो तितका नाथांच्या या अभंगांत दिसत नाहीं. 'केशव तो नामा, नामा तो केशव,' अशी त्या नांवाची गांठ पडलेली दिसत नाहीं. याचें कारण बहुधा जनार्दनाच्या ओढींत शोधावें लागेल. **'एका जनार्दन'** ही एक गांठ पडल्यानंतर (भ. २०१), दुसऱ्या गांठीला वावच काय राहिला ?

'गोपाळ कृष्णा' नें गीतेच्या कृष्णाला हि मागें टाकलें. त्याची बाललीला, त्याचे लहानपणचे पोवाडे, संसार-दुःखाचा छेद करणारें त्याचें हास्य-मुख हा भक्तांच्या निरंतर ध्यानाचा विषय आहे. गोविंद हा त्याचाच भाऊ (भ. १९६). हरवलेल्या गाई शोधून काढल्या म्हणून वेदांत इंद्राचें हें नांव आहे. त्याच कारणासाठीं तें कृष्णाचें हि आहे. गोविंदामुळें गाईंचा 'योग' झाला, गोपाळामुळें गाईंना 'क्षेम' लाभलें.

**'विष्णु'** ही मूळ देवता. स्वधर्माचरण करतांना कांहीं उणें राहून गेलें तर विष्णूचें स्मरण करावें असा नाथांनीं विधि घालून दिला आहे (भ. ८५).

**'आत्माराम'** हें एक आध्यात्मिक नाम आहे (भ. २९०). तें दिसायला संस्कृत दिसतें. पण आत्मा+राम=आत्माराम असा शुद्ध मराठी समास नाथांना अभिप्रेत आहे (भ. २७१).

**चक्रपाणि** हें नाथांच्या वडिलांचें नांव. तें कुठें तरी येणार च (भ. २२७). अशीं साकार-विशेषणरूप नामें, **रुक्मिणी-कांत** (१८८), **वनमाळी** (२२३), **गरुडध्वज** (२०२), **यादवराणा**

(१८८), **मेघश्याम** (१८६) इत्यादि, कवीच्या गरजेनुसार अथवा बिनगरजेनें हि येत असतात. पण तीं सोडून दिलीं तरी गुण-विशेषणरूप हि देवाचीं अनेक नांवें येत असतात. **अच्युत** हें त्यांपैकीं एक आहे. द्रौपदीप्रमाणें साकार विष्णूला हि तें लावतां येतें च. पण वस्तुतः तें निराकार सगुण आहे. 'अच्युत' म्हणजे ज्याच्या ठिकाणीं पतन च संभवत नाहीं. देहधारी सर्व च्युतिशील च असणार. म्हणून त्यांनीं नम्रपणें धर्माची सेवा करावयाची. धर्माचा स्वामी, अच्युत जो परमेश्वर, तो च होऊं शकतो. 'धर्मस्य प्रभुरच्युतः।' 'चुकणें भूषण आम्हां, भूषण करणें क्षमा तुम्हां देवा।' अशा अर्थाची इंग्रजी म्हण या च अच्युताचा महिमा गाणारी आहे.

पण गुण-विशेषणरूप सगळ्या नामांत **'अनंत-कोटि-ब्रह्मांडाधीश'** (भ. १८६), हें नांव माझ्या लक्षांत राहून गेलें आहे. आमच्या आईच्या तोंडून थोड्या फरकानें हें नांव मीं रोज ऐकिलें आहे. देवाची पूजा झाल्यावर ती म्हणायची, "अनंतकोटि-ब्रह्मांड-नायका, माझे अपराध क्षमा कर."

**'अधोक्षज'** हें कठिण नांव संध्येमुळें रूढ झालें आहे (भ. १९५). विष्णु-सहस्रनामांत हि तें आलें असून त्याचे तऱ्हे-तऱ्हेचे अर्थ सुचविले गेले आहेत. चिंतनाला उपयोगी असा अर्थ खालील श्लोकांत संगृहीत आहे.

> अधोभूते हि अक्ष-गणें प्रत्यग्रूप-प्रवाहिते ।
> जायते यस्य वै ज्ञानं स अधोक्ष-ज उच्यते ॥

"इंद्रियें खालीं पडून, म्हणजे जिंकलीं जाऊन, आंत मुरडलीं असतां, देवाचें ज्ञान होत असतें, म्हणून त्याला अधोक्षज म्हणतात."

**'मधु-सूदन'** हें हि ईश्वराची आठवण करून देणारें एक विशेष नांव आहे. मनुष्याला मोहून टाकणारे अनेक विकार——जे माणसाचे हाडवैरी च म्हटले पाहिजेत, पण ज्यांची संगति त्याला गोड वाटते——त्यांचें निर्दलन करणारा भगवंताशिवाय कोण असणार? म्हणून हें नांव साधकासाठीं धांवून येत असतें.

आणि अर्जुनाची शोक-मोहाकुल दशा पाहून त्याला हसत-हसत आत्मबोध देणारा तो **'हृषीकेश'** (गीता २.१८), ज्याला लाडिकपणानें मराठी भाषेंत 'हृषीकेशी' म्हटलें जातें(भ.२४३), तो हर्षित चित्तानें उद्धवाशीं कांहीं गुजगोष्ट बोलत आहे, ती नाथांनीं तुमच्याआमच्यासाठीं जाहीर केली आहे.

परमेश्वराच्या नांवांना अंतच नाहीं. संध्येंत तो 'चोवीस-नामी' आहे. भारतांत तोच 'सहस्त्र-नामी' झाला आहे. खरोखर तो 'अनंत-नामी' आहे मग **'अनंत'** हेंच त्याचें नांव कां घेऊं नये? (भ. १८८). उपनिषदांनीं तसेंच केलें आहे. 'सत्यं ज्ञानं' अशीं ईश्वराचीं दोन स्वरूप-लक्षणें सांगून अधिक वर्णनाच्या भरीस न पडतां 'अनंतम्' असें म्हणून तीं मोकळीं झालीं आहेत.

अनंत-नामी म्हणजे वेगळ्या भाषेंत 'अनामी' च म्हणायचा. म्हणून सगळीं च नांवें बाजूस सारून नाथ पुष्कळ वेळां त्याला केवळ 'देव' म्हणतात (भ.३०). अध्याय १९, ३१, ३७, इत्यादि अनेक अध्यायांत ह्या 'देवा' चें च कीर्तन दिसतें.

मुलाला विचारावें 'तुझ्या बाबांचें नांव काय?' तर तो म्हणतो,–'बाबा.' तसेंच देवाचें नांव काय? तर–'देव'! नाथांच्या या बाल-वृत्तीमुळें आमच्या प्रार्थना-समाजी वगैरे भक्तांची चांगली सोय होण्यासारखी आहे. या लोकांना तुकारामादिकांचे कांहीं-कांहीं

अभंग फार आवडतात. ते घेतल्याशिवाय त्यांच्याच्यानें राहवत नाहीं. पण त्यांत कुठें 'विठोबा' आला तर तेवढा पचत नाहीं. म्हणून त्याऐवजीं 'देवाजी' घालून ते त्या अभंगाचें सेवन करतात. पचन-शक्ति मंदावलेल्या आमच्यासारख्यांचा कळवळा येऊन च कीं काय, दयाळु नाथांनीं पुष्कळ ठिकाणीं 'देवा'ची च योजना केली आहे. आणि एकंदरींत सर्व दृष्टीनें देव हें च नांव बरें वाटतें. एक तर त्याला कांहीं उपाधि चिकटलेली नाहीं. ईश्वरापेक्षां हि तें साधें आहे. ईश्वर म्हणजे मालक असा अर्थ होतो. देव मालकी मिरवत नाहीं. देव साकार हि होऊं शकतो, सगुण तर तो आहे च आहे, निर्गुणाला हि तो बाधणार नाहीं. तो सर्वांना च पोटांत घालणारा आहे. आणि म्हणून मराठी भाषेनें तरी तो च मान्य केला आहे. देवघर, देवपूजा, देवमाणूस, देवालय, देऊळ, देवाज्ञा इत्यादि शब्द हें च सांगतात. भोळा भाव असल्यास देव म्हणजे देणारा असा अर्थ समजावा. ज्ञानाची ओढ असल्यास देव म्हणजे द्युतिमान् प्रकाशमय असा अर्थ घ्यावा. दोन्ही सोई त्या शब्दांत आहेत. म्हणून लहान मुलासारखें होऊन देवाचें नांव देव असें च म्हणूंया.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम .. ................ ... विः ..................
क्रमांक ......................... नों दिः ................

# एकनाथांचीं भजनें

# एकनाथांचीं भजनें

## प्रकरण पहिलें

## कर्म-योग आणि चित्त-शुद्धि

### अध्याय १

१

फूल झडे तंव फळ सोसे । तया पाठीं तें हि नासे
एक मागें एक पुढें । मरण विसरले बापुडे
मरण ऐकतां परता पळे । पळे तो हि मसणीं जळे
एका जनार्दनी शरण । काळ वेळ तेथें न रिघे मरण

२

जें जें दिसे तें तें नासे । अवघें ओस जायाचें
पदार्थ-मात्र जात असे । कांहीं नसे आनु दुजें
एका जनार्दनी सर्व वाव । धरा भाव विठ्ठलीं

३

अशाश्वतासाठीं । कां रे देवासवें तुटी
अंतकाळींचें बंधन । कोण निवारी पतन
तूं म्हणसी हें माझें । खरा ऐसें वाहसी ओझें
याचा न धरीं विश्वास । एका जनार्दनाचा दास

४

देह हा काळाचा जाणार शेंवटीं । याची धरुनी मिठी गोडी काय
प्रपंच काबाड एरंडाचे परी । रस-स्वाद तरी कांहीं नाहीं
नाशवंता साठीं रडतोसी वायां । जनार्दनी शरण रिघें तूं पायां
एका जनार्दनी भेटी होतां संतांची । जन्म मरणाची चिंता नाहीं

५

मार्गे बहुतांसीं सांगितलें संतीं । वायां हे फजिती संसार तो
अंधाचे सांगाती मिळालेसे अंध । सुख आणि बोध काय तेथें
एका जनार्दन जाऊं नको वायां । संसार माया लटकी ते

६

नरदेहीं येऊनी करीं स्वार्थ । मुख्य साधीं परमार्थ
नव्हतां ब्रह्म-ज्ञान । श्वान-सूकरां समान
पशुवत जिणें । वायां जेवीं लाजिरवाणें
एका जनार्दनी पामर । भोगिती अघोर यातना

७

देह सांडावा ना मांडावा । येणें परमार्थ चि साधावा
जेणें देही वाढे भावो । देहीं दिसतसे देवो
ऐसें देहीं भजन घडे । त्रिगुणात्मक स्वयें उडे
त्रिगुणात्मक देहो वावो । एका जनार्दनी धरा भावो

## अध्याय २

८

परमार्थाचे वचना द्यावें अनुमोदन । तेणें नारायण संतोषत
विषयिक वचना देतां अनुमोदन । तेणें नारायण क्रोध पावे
भक्ति प्रेम वचना द्यावें अनुमोदन । तेणें नारायण संतोषत
दुर्बुद्ध वचना देतां अनुमोदन । तेणें नारायण क्रोध पावे
एका जनार्दनाचे वचना द्यावें अनुमोदन । तेणें जनार्दन संतोषत

९

मेघ वर्षे निर्मळ जळ । परी जैसें बीज तैसें फळ
तैसे भक्त अभक्त दोन्ही । वेगळीक वेगळेपणीं
एका जनार्दनी गुण । चंदन वेळू नोहे समान

१०

अधर्मे अदृष्टाचें चिह्न । विपरीत वचन तें ऐका
आंडारीं ठेविला कापूर उडे । समुद्रामाजीं तारूं बुडे
ठक येवोनि एकांतीं । मुलाम्याचें नाणें देती
परचक्र विरोध धाडी । खणित लावुनी तळघरें फोडी
पाणी भरे पेवा आंत । तेणें धान्य नासे समस्त
गोठण शेळचा रोग पडे । निमती गाईम्हशींचे वाडे
भूमि-निक्षेप करूं जाती । ते आपुल्याकडे धुळी ओढिति
ऐशी कर्माची अधर्म-स्थिति । एका जनार्दनी सोशी फजिती

११

जया करणें आत्म-हित । स्वधर्म आचरावा सतत
कर्म नित्य नैमित्तिक । ब्रह्म-प्राप्ती लागीं देख
तीं चि नित्य आचरावीं । चित्त-शुद्धि तेणें व्हावी
एका जनार्दनी कर्म । ईश-भक्तीचें हें वर्म

१२

ज्यासी करणें चित्त-शुद्धि । कर्मे आचरावीं आधीं
तरी च होय मनःशुद्धि । सहज तुटती आधि-व्याधि
चित्ताची स्थिरता । होय उपासनें तत्त्वतां
चित्त झालिया निश्चळ । सहज राहील तळमळ
एका जनार्दनी मन । होय ब्रह्म-रूप जाण

१३

नित्य-नैमित्तिक कर्में आचरावीं । तिहीं ते पावावी चित्त-शुद्धि
चित्त स्थिर व्हाया करी उपासना । भजे नारायणा एका भावें
विवेक-वैराग्य-प्राप्ति तत्प्रसादें । चित्ता लागे वेध सद्‌गुरूचा
सद्‌गुरु-कृपेनें पूर्ण बोध होय । नित्य त्याचे पाय हृदयीं धरीं
एका जनार्दनी ठेवूनिया मन । मनाचें उन्मन पावलासे

१४

परब्रम्ह-प्राप्ति लागीं । कर्में आचरावीं वेगीं
चित्त शुद्ध तेणें होय । भेटी सद्‌गुरूचे पाय
कर्म नित्य नैमित्तिक । प्रायश्चित्त जाण एक
उपासन तें चौथें । आचरावें शुद्ध चित्तें
तेणें होय चित्त स्थिर । ज्ञानालागीं अधिकार
होय भेटी सद्‌गुरूची । ज्ञान-प्राप्ति तें चि साची
प्राप्त झाल्या ब्रह्म-ज्ञान । आपण जग ब्रह्म परिपूर्ण
एका जनार्दनी भेटला । ब्रह्म-स्वरूप स्वयें झाला

## अध्याय ३

१५

आधीं घेई निरपेक्षता । त्याचे चरण वंदीन माथां
निरपेक्षाची आवडी । ब्रह्म-ज्ञान घाली उडी
निरपेक्षावांचून । नाहीं नाहीं रे साधन
एका जनार्दनी शरण । निरपेक्ष पाविजे ज्ञान

१६

आशा-बद्ध करिती वेदांचें पठण। तेणें नारायण तुष्ट नोहे
आशा-बद्ध करिती जप तप हवन । तेणें नारायण तुष्ट नोहे
निराशी करिती देवाचें कीर्तन । एका जनार्दन तुष्ट होय

१७

वेद-युक्त मंत्र जपतां घडे पाप। मी मी म्हणोनि संकल्प उठतसे
यज्ञादिक कर्मे घडतां सांग । मी मी संसर्ग होतां वायां
एका जनार्दनी मीपणा टाकून । करीं कृष्णार्पण सर्व फळ

१८

कर्म करिसी तरी कर्मठ चि होसी। परी निष्कर्म नेणसी कर्मामाजीं
ब्रह्मालागीं कर्म सांडणें हें कुडें। पाय खंडोनि पुढें चालूं पाहसी
एका जनार्दन सर्व कर्म पाहीं । सांडी मांडी नाहीं तये ठायीं

१९

धाऊं नको सैरा कर्मांचिया पाठीं । तेणें होय दृष्टि उफराटी
शुद्ध-अशुद्धाच्या न पडें विवादा । वाचे म्हणें सदा नारायण
एका जनार्दनी ब्रह्मार्पण कर्म । तेणें अवघे धर्म जोडतील

२०

प्र ंच परमार्थ एकरूप होत । आहे ज्याचा हेत रामनामीं
परमार्थे साधे सहज संसार । येथें येरझार नाहीं जना
सहज संसारें घडे परमार्थ । लौकिक विपरीत अपवाद
एका जनार्दनी नाहीं तया भीड । लौकिकाची चाड कोण पुसे

२१

जगाचिये नेत्रीं दिसे तो संसारी। परी तो अंतरीं स्फटिक शुद्ध
वायां चि हांव न धरी कांहीं पोटीं। वाउगी ती गोष्टी न करी जगा
स्त्री-पुत्र-धन नाहीं तेथें मन। इष्ट मित्र कारण नाहीं ज्याचें
एका जनार्दनी प्रपंच परमार्थ। सारिखा चि होत तयालागीं

२२

उत्तम पुरुषाचें उत्तम लक्षण। जेथें भेद शून्य मावळला
भेद शून्य झाला बोध स्थिरावला। विवेक प्रगटला ज्ञानोदय
जिकडे पाहे तिकडे उत्तम दर्शन। दया शांति पूर्ण क्षमा अंगीं
एका जनार्दनी उत्तम हे प्राप्ति। जेथें मावळती द्वैताद्वैत

२३

समुद्र क्षोभे वेळोवेळीं। योगिया क्षोभेना कोणे काळीं
समुद्रा भरतें पर्व-संबंधें। योगी परिपूर्ण परमानंदें
समुद्र सर्वदा तो क्षार। तैसा नव्हे योगीश्वर
योगियाची योग-स्थिति। सदा परमार्थ भक्ति
एका जनार्दनी शरण। योगियांचें जें योगचिह्न

## अध्याय ४

२४

प्रतिमेचा देव केला। काय जाणे ती अबला
नवस करिती देवासी। म्हणती पुत्र देईं वो मजसी
देव खोटा नवस खोटा। एका जनार्दनी रडती पोटा

२५

देव दगडाचा भक्त तो मेणाचा। आइका दोहींचा विचार कैसा
खरेपणा नाहीं देवाचे ते ठायीं। भक्त अभाविक पाहीं दोन्ही एक
एका जनार्दनी ऐसें देवभक्तपण। निलाजरे जाण उभयतां

२६

नीचाचेनि स्पर्शें देवो विटाळला। पाणियें प्रक्षाळुनी सोंवळा केला
देवापरिस जळ सबळ केलें। ज्ञान तें दुर्बळ होऊनि ठेलें
एका जनार्दनी साच नाहीं भाव। संशयें चि देव नाहीं केला

२७

प्रतिमा चि देवो ऐसा ज्याचा भावो। तो न करी निर्वाहो आम्हां लागीं
असतां सर्वत्र बाहेरी भीतरीं। संपुष्टामाझारीं म्हणे देवो
द्वारका पंढरी देव-यात्रा करी। सर्वत्र न धरी तो चि भावो
एका जनार्दनी स्वतःसिद्ध असे। नाथिलें चि पिसें मत-वाद

२८

केले तुंवा काय जाउनीयां तीर्था। सर्वदा विषयार्था भुललासी
मनाचीं तीं पापें नाहीं धोवियेलीं। वृत्ति हे लाविली संसारीं चि
तीर्थ-यात्रा-योगें कीर्ति हि पावली। बुद्धि शुद्ध झाली नाहीं तेणें
एका जनार्दनी सद्गुरु-पाय धरीं। शांतीचे जिव्हारीं पावशील

२९

हृदयस्थ असोनि कां रे फिरसी वायां। दीप आणि छाया जया परी
आत्म-तीर्थीं सुस्नात झालिया मन। आणिक साधन दुजें नाहीं
एका जनार्दनी मनासी आवरीं। मग तूं संसारीं धन्य होसी

३०

देव देव म्हणोनि फिरताती वेडे । चित्त शुद्ध नाहीं तरी देव केंवि जोडे
पाहे तिकडे देव आहे । दिशा व्यापुनी भरला राहे
एका जनार्दनी आर्तभूत । देव उभा असे तिष्ठत

३१

जीवाचें जीवन जनीं जनार्दन । नांदतो संपूर्ण सर्व देहीं
वाउगीं कां वायां शिणती बापुडीं । काय तया जोडी हातीं लागे
एका जनार्दनी वाउगीं तीं तपें । मनाच्या संकल्पें हरि जोडे

३२

आपुली पूजा आपण करावी । ही जंव ठावी राहटी नाहीं
कासया ती पूजा जाणिवेचा शीण । त्याहूनि अज्ञान बरा दिसे
एका जनार्दनी ज्ञानाज्ञानें । पूजावे चरण विठोबाचे

## अध्याय ५

३३

वेदां माजीं ओंकार सार । शास्त्र-सार वेदान्त
मंत्रां माजीं गायत्री सार । तीर्थ-सार गुरु-चरण
दानां माजीं अन्न-दान सार । कीर्तन सार कलियुगीं
जिह्वा-उपस्थ-जय सार । भोग-सार शांति-सुख
एका जनार्दनी एका सार । सर्व-सार आत्म-ज्ञान

३४

पिंपळा वरूनि मार्ग आहे । ऐकोनि वृक्षा वेंघों जाये
ऐसे अभागी पामर । न कळे तयांसी विचार
म्हणोनि शरण जनार्दनीं । एका जनार्दनी एकपणीं

३५

वेद-वाणी देवें केली । येर काय चोरा पासूनि झाली
सकळ वाचा वदवी देव । कां वाढवा अहंभाव
ज्या ज्या वाणी स्तुति केली । ती ती देवासी पावली
एका जनार्दनी मातु । वाचा वाचक जगन्नाथु

३६

शतावर्तो श्रवण अधिक पैं झालें । तेणें अंगा आलें जाणपण
श्रवण तो लौकिक मनीं नाहीं विवेक । बुद्धीसी परिपाक कैसेनि होय
एका जनार्दनी साच न रिघे मन । तंववरी समाधान केंवि होय

३७

करितां हरिकथा श्रवण । स्वेद रोमांच न ये दारुण
रुका वेचितां प्राण । जाऊं पाहे
द्रव्य-दारा-लोभ अंतरीं । हरि-कथा वरी वरी
बीज अग्नी माझारीं । विरूढे कैसें
एका जनार्दनी । काम-क्रोध-लोभ तीन्ही
द्रव्य दारा त्यजुनी । नित्य तो मुक्त

३८

आरशा अंगीं लागतां मळ । मुख न दिसे चि निर्मळ
मळ तो झाडूनि पाहतां । मुख दिसे निर्मळता
पाहतां शुद्ध भाव रीती । परमार्थ हा चि चित्तीं
एका जनार्दनी हा विचार । आरशासारखा प्रकार

## अध्याय ६

### ३९

श्रुति सांगती परमार्था । हिंसा न करावी सर्वथा
संकल्प नाशी तो संन्यासी । तेथें कल्पना कायसी
वेद बोले सर्वा ठायीं । एका वांचुनि दुजें नाहीं
एका जनार्दनी बोधु । नाहीं तंव न कळे वेदु

### ४०

ब्रह्मांडाची दोरी । हालवी जो एक्या करीं
भूतीं परस्परें मैत्री । ती एके ठायीं असती वरी
पंच प्राणांचें जें स्थान । तये कमळीं अधिष्ठान
एका जनार्दनी सूत्र-धारी । बाहुली नाचवी नाना परी

### ४१

असत्याचा शद्ब नको माझे वाचे । आणिक हो कां ओझें भलतैसें
अणुमात्र रज डोळां न साहे । कैसा खुपताहे जन-दृष्टि
एका जनार्दनी असत्याची वाणी । तो चि पापखाणी दुष्ट-बुद्धि

### ४२

अर्थ नाहीं जयापाशीं । असत्य स्पर्शेना तयासी
अर्था पाशीं असत्य जाण । अर्था पाशीं दंभ पूर्ण
अर्था पोटीं नाहीं परमार्थ । अर्था पोटीं स्वार्थ घडतसे
अर्थ नको माझे मनीं । म्हणे एका जनार्दनी

४३

विषयाचे अभिलाषे सबळ भेद भासे । विषय-लेश तेथें मुक्ति केंवि वसे
विषय-तृष्णा सांडीं मग तूं साधन मांडीं । वैराग्याची गोडी गुरूसी पुसें
स्त्री-पुरुष-भावना भेद भासे मना । तेथें ब्रह्म-ज्ञाना गमन कैचें
कणु-भरित जो डोळा शरीरासी दे दु:ख । अणुमात्र विषय तो संसार-दायक
एका जनार्दनी निज-ज्ञान शक्ति । निर्विषय मन ते अभेद भक्ति

४४

हीं चि दोनी पैं साधनें । साधकें निरंतर साधणें
पर-द्रव्य पर-नारी । यांचा विटाळ मनें धरी
नको आणिक उपाय । सेवी सद्गुरूचे पाय
म्हणे एका जनार्दन । न लगे आन तें साधन

४५

कनक-कांता न ये चित्ता । तो चि परमार्थी पुरता
हें चि एक सत्य सार । वायां व्युत्पत्तीचा भार
वाचा सत्यत्वें सोवळी । येर कविता ओवळी
जन ते चि जनार्दन । एका जनार्दनी भजन

४६

रस सेविल्यासाठीं । भोगवी जन्माचिया कोटी
रसनें अधीन सर्वथा । रसना-द्वारें रस घेतां
जंव रसना नाहीं जिंतिली । तंव वाउगी च बोली
एका जनार्दनी शरण । रस रसना जनार्दन

४७

पक्षी अंगणीं उतरती । ते कां गुंतोनि राहती
तैसें असावें संसारीं । जोंवरी प्राचीनाची दोरी
वस्तीकर वस्ती आला । प्रातःकाळीं उठोनि गेला
शरण एका जनार्दन । ऐसें असतां भय कवण

## अध्याय ७

४८

अविश्वासा घरीं । विकल्प नांदे निरंतरीं
भरला अंगीं अविश्वास । परमार्थ तेथें भूस
सकळ दोषांचा राजा । अविश्वास तो सहजा
अविश्वास धरतां पोटीं । एका जनार्दनी नाहीं भेटी

४९

अविश्वासापुढें । परमार्थ कायसें बापुडें
अविश्वासाची राशि । अभिमान येतसे भेटीसी
सदा पोटीं जो अविश्वासी । तो चि देखे गुण-दोषांसी
सकळ दोषां मुकुट-मणि । अविश्वास तो चि जनीं
एका जनार्दनी विश्वास । नाहीं त्यास भय कांहीं

५०

एक नरदेह नेणोनि वायां गेले । एक न ठके म्हणोनि उपेक्षिले
एक ते गिळिले । ज्ञान-गर्वें

एक ते साधनीं ठकिले । एक ते करूं करूं म्हणतां चि गेले
करणें राहिलें— । से तैसें

ज्ञानें व्हावी ब्रह्म-प्राप्ति । तें ज्ञान वेंची विषयासक्ति
भांडवल नाहीं हातीं । मा मुक्ति कैंची

स्वप्नींचेनि धनें । जागृति नोहे धर्म
ब्रह्माहमस्मि समाधान । सोलीव भ्रम

अभिमानाचिया स्थिती । ब्रह्मादिकां पुनरावृत्ति
ऐसी वेद-श्रुति । निश्चयें बोले

एका जनार्दनी । एकपण अनादि
अहं आत्मा तेथें । समूळ उपाधि

## ५१

लोखंडाची बेडी तोडी । आवडी सोनियाची घडी
मी ब्रह्म म्हणतां अभिमान । तेथें शुद्ध नोहे ब्रह्म-ज्ञान
जैसी देखिली जळ-गार । शेवटीं जळ चि निर्धार
मुक्तपणें मोला चढलें । शेवटीं सोनियाचे फांसां पडिलें
एका जनार्दनी शरण । बद्ध-मुक्ता ऐसा शीण

## ५२

कलत्र पुत्र, बाधा अभिमानाची
ते हि त्यजिल्या शेखीं, त्यागी म्हणे निजाचीं

देहीं देहातीत, प्रतिपादिजे ज्ञान
तेणें चि ज्ञानें देहीं, येतसे अभिमान

ब्रह्म-ज्ञानें म्हणती, अभिमानाची तुटी
सोहं सोहं म्हणोनि, तेथें लागे पाठीं

द्वैत नाहीं जगीं, मी चि एकला एकु
येणें स्फुरणें आला, अभिमान घातकु
अति सूक्ष्म-अभिमान, कवणा न पडे ठायीं
देहातीत ज्ञानी, म्हणती जे विदेही
एका जनार्दनी, जगद्गुरु त्याहाळीं
गो-खुर वंदितां, अभिमानाची धुळी

## ५३

मी एक शुचि जग हें अपवित्र । कर्म चि विचित्र ओढवलें
देखत देखत घेत असे विख । अंतीं तें सुख केंवि होय
अल्प दोष ते अवघे चि टाळी । मुखें म्हणे सर्वोत्तम बळी
अभिमानें अशुचि झालासे पोटीं । एका जनार्दनी नव्हे चि भेटी

## ५४

ममता ठेवूनि घरीं दारीं । वायां कां जाशी बाहेरी
आधीं ममत्व सांडावें । पाठीं अभिमाना खंडावें
ममता सांडी वाडें कोडें । मोक्ष-सुख सहजीं घडे
एका जनार्दनी शरण । ममता टाकीं निर्दाळून

## ५५

मोह ममता ही समूळ नाशावी । तेव्हां चि पावावी चित्त-शुद्धि
चित्त-शुद्धि झालिया गुरु-चरण-सेवा । तेणें ज्ञान-ठेवा प्राप्त होय
एका जनार्दनी प्राप्त झाल्या ज्ञान । ब्रह्म परिपूर्ण अनुभवेल

## अध्याय ८

५६

मत्सर ज्ञानियातें न सोडी । मा इतर कायसीं बापुडीं
शिणताती मत्सर-वेधें । भोगिताती भोग विविधें
एका जनार्दनी मत्सर । तेणें परमार्थ पळे दूर

५७

लज्जा अभिमान टाकूनि परता । परमार्थ सरता करीं कां रे
वादक निंदक भेदक ऐसे त्रिविध । यांचा टाकूनि भेद भजन करीं
एका जनार्दनी त्रिविधा परता । होऊनि परमार्था हित करीं

५८

विवाद-वाद हें तो अधम लक्षण । भक्तीचें कारण न साधे येणें
मुख्य एक करीं एकविधपण । सम दरुशनें देख जगीं
नर अथवा नारी असो भलते याती । वंदावे विभूति म्हणोनियां
एका जनार्दनी बोध धरीं मना । होऊनियां साना सानाहूनि

५९

ब्रह्म एक परिपूर्ण । तेथें नाहीं दोष गुण
पराचा देखती जे दोष । ते चि दोषी महा-दोष
गुण दोष जे देखती । एका जनार्दनी नाडती

६०

देह-बुद्धि सांडीं कल्पना दंडीं । वासनेची शेंडी वाढवूं नको
तूं तें तूं चि पाहीं तूं तें तूं चि पाहीं । पाहूनियां राहीं जेथींचा तेथें
तूं तें तूं चि पाहीं जेथें देहो नाहीं । मीपणें कां वायां गुंतलासी
एका जनार्दनी मीपण तूंपण । नाहीं नाहीं मज तुझी च आण

## ६१

सर्वां भूतीं देव वसे । नीचा ठायीं काय नसे
नीच कोठोनि जन्मला । पंच भूतां वेगळा झाला
नीच म्हणोनि काय भुली । एका जनार्दनी देखिली

## ६२

थोर तो चि म्हणावा । नेणे भूतांचा जो हेवा
लहान तो चि म्हणावा । काया वाचा भजे देवा
एका जनार्दन म्हणे । देवावांचुनि कांहीं नेणे

## ६३

आम्ही ब्रह्मपुरीचे ब्राह्मण । याती कुळ नाहीं लहान
आम्हां सोंवळें ओंवळें नाहीं । विटाळ न देखों कवणे ठायीं
आम्हां सोयरे जे झाले । ते याति-कुळा वेगळे केले
एका जनार्दनी बोधु । याति-कुळाचा फिटला संबंधु

## ६४

काम क्रोध लोभ दंभ मद मत्सर
षड् वैरी तत्पर हे चि येथें

क्षुधा तृषा मोह शोक जरा मरण
षड् ऊर्मि पूर्ण देहीं हे चि

आशा मनीषा कल्पना इच्छा तृष्णा वासना
हे अठरा गुण जाणा देहामाजीं

एका जनार्दनी त्यजूनि अठरा
तो चि संसारा माजीं शुद्ध

## अध्याय ९

६५

बैसतां निश्चळ । मन करी तळमळ
ध्यान धारणा ते विधि । मनें न पावे चि सिद्धि
ऐशा मना काय करावें । कोठें निवांत बैसावें
एका जनार्दनी शरण । मन धावे सहजपणें

६६

शत्रु वसती दूर देशीं । येतां बहु दिवस लागती तयासी
बाह्य शत्रूंचें अल्प दुःख । मनःशत्रूचें वर्म अशेख
आसनीं शयनीं एकांतीं । जपीं अथवा ध्यान-स्थितीं
ऐशिया मनातें न जिंकितां । देवपण न ये हाता
देवपणाचे भुलले हांवे । एका जनार्दनी नेणती देव

६७

वैर करूनि मन मारावें । मना-अधीन न व्हावें
मना मागें जाऊं नये । मन आकळूनि पाहें
मन म्हणे तें न करावें । मनें मनासी बांधावें
मन म्हणेल तें सुख । परी पाहतां अवघें दुःख
एका जनार्दनी मन । दृढ ठेवावें आकळून

६८

माझ्या मनाचें तें मन । चरणीं ठेवावें बांधून
मग तें जाऊं न शके कोठें । राहे तुमच्या नेहटें
मनासी तें बळ । देवा तुमचें सकळ
एका जनार्दनी देवा । मन दृढ पायीं ठेवा

६९

आम्ही अलक्षपुरचे जोशी । शकुन सांगूं निश्चयेंसी
तेणें चुकती चौऱ्यांयशी । होरा ऐका दादांनो
नका जाऊं मना मागें । थोर थोर झाले दगे
मी बोलत नाहीं वाउगें । सावध रहा दादांनो
वासना वाईट ही बा थोर । पुरविले लहान थोर
फिरती चौऱ्यांयशी लक्ष घरें । पडाल फशीं दादांनो
एका जनार्दनी जोशी । सांगेन शकुन सर्वत्रांसी
राम-नाम वाचेसी । तेणें तरती विश्वासी दादांनो

## अध्याय १०

७०

सर्व भावें सुख असतां घेईं अनुताप । मग करीं संकल्प भजनाचा
ऐसा अनुताप घडतां मानसी । भजन तें मुखासी येत स्वभावें चि
एका जनार्दनी अनुतापें वीण । भजन प्रमाण नोहे देवा

७१

अनुतापा वांचूनि नाम न ये मुखा । वाउगा चि देखा शीण होय
मुख्य तो संकल्प अनुताप वाहे । मग चित्त होय शुद्ध तेणें
अनुताप झालिया सहज समाधि । तुटेल उपाधि सहज चि
एका जनार्दनी अनुतापें पाहे । मग देव आहे जवळी तया

७२

देहीं वाढे जों जों शांति । तों तों विरक्ति अंगीं बाणे
ऐसा आहे अनुभव । देहीं देव प्रकाशे
देहीं आत्मा परिपूर्ण । भरला संपूर्ण चौ देहीं
एका जनार्दनी रिता ठाव । नाहीं वाव पाहतां जगीं

७३

साधका सर्वदा पुसती । कोण बाधा चित्त-वृत्ती
एक चि गुण जैं पुरता जोडे । तैं एकविधा वृत्ति वाढे
एक चि न जोडे गुणावस्था । या लागीं नोहे एकविधता
एका जनार्दनी पूर्ण । चित्त चैतन्य संपूर्ण

७४

आंबेया पाडू लागला जाण । अंगीं असे आंबटपण
सेजे मुराल्याची गोडी । द्वैताविण ते चोखडी
अग्नी पोटीं निपजे अन्न । वाफ जिरतां परमान्न
एका जनार्दनी गोडी । तोडा लिगाडाची बेडी

७५

दारची गोंधण कां तोडा ना । मज रहाट करून कां द्या ना
माझ्या रहाटाकडे कां पहा ना

तुमचा बैल कां मारा ना । मज तांत करून कां द्या ना
माझ्या तांतीकडे कां पहा ना

तुमची तलवार कां मोडा ना । मज चात करून कां द्या ना
माझ्या चातीकडे कां पहा ना

तुमचा टाळ कां मोडा ना । मज भिंगरी करून कां द्या ना
माझ्या भिंगरीकडे कां पहा ना ।

तुमचीं वस्त्रें कां फाडा ना । मज पिंजून पिंजून कां द्या ना
माझ्या पिंजणाकडे कां पहा ना ।

पिंजून पिंजून केला पिळू । नव इंद्रियां खेळू
एका जनार्दनी पिळू

## प्रकरण दुसरें

# नामस्मरण आणि कीर्तन

## अध्याय ११

७६

उदार धीर-निधि । श्रीविठ्ठलनाम आधीं
पतित-पावन सिद्धि । श्रीविठ्ठलनाम आधीं
सुख-सागर-निधि । श्रीविठ्ठलनाम आधीं
एका जनार्दनी बुद्धि । श्रीविठ्ठलनाम आधीं

७७

आंबे केळीं द्राक्ष-घड्ड । नामा पुढें अवघे कडु
नाम गोड नाम गोड । हरि म्हणतां पुरे कोड
गूळ साखर कायसो निकी । अमृताची चवी झाली फिकी
एका जनार्दनी पडली मिठी । चवी घेतली ती कधीं च नुठी

७८

लौकिकापुरता नव्हे हा विभाग । साधलें अव्यंग सुख-सार
अवीट विटेना बैसलें वदनीं । नाम संजीवनीं ध्यानीं मनीं
एका जनार्दनी भाग्य तें चांगलें । म्हणोनि मुखा आलें रामनाम

७९

गुंतला भ्रमर कमळिणी-कोशीं । आदरें आमोदासी सेवितसे
तैसें रामनामीं लागतां ध्यान । मन उन्मन होय जाण
एका जनार्दनी राम परिपूर्ण । प्रपंच परमार्थ राम चि जाण

८०

भुक्ती मुक्तीचें कारण । नाहीं नाहीं आम्हां जाण
एक गाऊं तुमचें नाम । तेणें होय सर्व काम
धरलिया मूळ । सहज हातीं लागे फळ
बीजाची आवडी । एका जनार्दनी गोडी

## अध्याय १२

८१

सेवेचें कारण मुख्य तो सद्भाव
इतर ते वाव इंद्रिय-बाधा

साधन हें चि साधीं तोडीं तूं उपाधी
नको ऋद्धि-सिद्धि आणिक कांहीं

नामाचा उच्चार मुख्य हे चि भक्ति
एका जनार्दनी विरक्ति तेणें जोडे

८२

राम कृष्ण हरि । नित्य वदे जो वैखरी
तया पाशीं नुरे पाप । नासे त्रिविध हा ताप
नाम तें चि पर-ब्रह्म । जप-यज्ञ तो परम
एका जनार्दनी जपा । राम-कृष्ण मंत्र सोपा

८३

कृतांताचे माथां देऊनियां पाय । वाचे नाम गाय अहर्निशीं
उघडा रे मंत्र उघडा रे मंत्र । शिव जपे स्तोत्र राम-नाम
एका जनार्दनी न करीं आळस । चौऱ्यांशीचा लेश नको भोगूं

८४

देवासी तों प्रिय एक नाम आहे। म्हणोनि तूं गाये सदोदित
कळा हें कौशल्य अवघें विकळ। मंगळा मंगळ राम-नाम
एका जनार्दनी नाम मुखीं गातां। मुक्ति सायुज्यता पाठी लागे

८५

अबद्ध पढतां वेद बाधी निषिद्ध। अबद्ध नाम रडतां प्राणी होती शुद्ध
अबद्ध मंत्र जपतां जापक चळे। अबद्ध नाम जपतां जडमूढ उद्धरले
स्वधर्म कर्म करितां पडे व्यंग। विष्णु-स्मरणें तें समूळ होय सांग
एका जनार्दनी नाम निकटीं। ब्रह्मानंदें भरली सृष्टि

## अध्याय १३

८६

सर्वां मार्जीं सार नाम विठोबाचें। सर्व साधनांचें घर जें कां
शुकादिकीं नाम साधिलेंसे दृढ। प्रपंच-काबाड निरसिले
एका जनार्दनी जनीं ब्रह्म-नाम। तेणें नेम धर्म सर्व होय

८७

संसार-सागरीं बुडलिया प्राणी। करी सोडवणी कोण त्याची
अविद्यादि पंच क्लेश हे तरंग। बुडालें सर्वांग प्राणियाचें
एका जनार्दनी उच्चारील नाम। सुखाचा आराम प्राप्त होय

८८

ओखद घेतलिया पाठीं। जेंवी होय रोग-तुटी
तैसें घेतां राम-नाम। नुरे तेथें क्रोध-काम
घडतां अमृत-पान। होय जन्मांचें खंडन
एका जनार्दनी जैसा भाव। तैसा भेटे तया देव

८९

आपुलें कल्याण इच्छिणें जयासी । तेणें या नामासी विसंबूं नये
करील परिपूर्ण मनाचे हेत । ठेविलिया चित्त नामा पाशीं
भुक्ति आणि मुक्ति वोळंगती सिद्धि । होईल कीं वृद्धि आत्म-निष्ठे
एका जनार्दनी जपतां हें नाम । पुरवील काम जो जो हेतु

९०

नाहीं जया भाव पोटीं । तया चावटी वाटे नाम
परी येतां अनुभव । चुकवी हाव संसार
येरझारीं पडे चिरा । नाहीं थारा जन्माचा
एका जनार्दनी खंडे कर्म । सोपे वर्म हातां लागे

९१

विठ्ठल म्हणतां विठ्ठल चि होसी । संदेह ये विशीं धरूं नको
सागरीं उठती नाना पैं तरंग । सिंधु तो अभंग विठ्ठल एक
तैसें मन करीं द्वैत न धरीं । सर्व चराचरीं विठ्ठल एक
एका जनार्दनी विठ्ठला वांचूनि । दुजा नेणों कोणी स्वप्नीं आम्ही

९२

लोह परिसासी झगटे । मग काळिमा कैंची भेटे
तैसें विनटों रामनामा । पहिलेपण कैंचें आम्हां
गंगा मीनली सागरीं । परतेना ती ब्रह्म-गिरी
एका जनार्दनी भेटी । चौ देहांची सुटे गांठी

## अध्याय १४

९३

जनार्दनें मज सांगितला मंत्र । राम-नाम पवित्र जप करीं
सोडवील राम संसार-सांकडी । न पडे चि बेडी अरि-वर्गा
एका जनार्दनी टाकूनि संशय । नाम मुखीं राहो प्रेम पोटीं

९४

असंख्य वचनें असोनि नसती । कोण तया रीती चालतसे
हरि-नाम वचन एक चि प्रमाण । हें तों अप्रमाण करील कोण
जनार्दनाचे वचना द्यावें अनुमोदन । एका जनार्दनी प्रमाण तें चि

९५

जागृती स्वप्नीं सुषुप्ती माझारीं । जपें नाम हरी सर्व काळ
साधन आणिक न लगे सकळ । राम-नाम निखळ जपें आधीं
पापाचे पर्वत छेदी नाम-वज्र । हा चि पैं निर्धार ऋषीश्वर
एका जनार्दनी नाम निजधीर । पावन साचार राम नाम

९६

चिंतातुर मन नसावें कदा काळीं । हृदयीं नामावळी जप करीं
वारंवार चिंतावीं देवाचीं पाउलें । जेणें जन्म-जाळें उकलेल
एका जनार्दनी आलासे प्रत्यय । सर्व भावें गाय नाम त्याचें

९७

चिंतनें नासतसे चिंता । चिंतनें सर्व कार्य ये हातां
चिंतनें मोक्ष सायुज्यता । घर शोधीतसे

ऐसें चिंतनाचें महिमान । तारिले अधम खल जन
चिंतनें समाधान । प्राणिमात्रा होतसे

चिंतनें तुटे आधि-व्याधि । चिंतनें तुटतसे उपाधि
चिंतनें होय सर्व-सिद्धि । एका जनार्दनाचे चरणीं

९८

घालीं देवावरी भार । आणिक न करीं विचार
योगक्षेम निर्धार । चालवील तुझा

वाचे गाय नामावळी । वासुदेवीं वाहें टाळी
प्रेमाचे कल्लोळीं । नित्यानंदें सर्वदा

सोस घेईं का रे वाचे । राम-कृष्ण वदतां साचें
धरणें उठतें यमाचें । निःसंदेह

शरण एका जनार्दनी । करी राम-नाम-ध्वनि
कैवल्याचा दानी । रक्षील तुज

९९

पशु आणि पक्षी तरले स्मरणें । तो तुम्हां कारणें उपेक्षीना
धरूनि विश्वास आळवावें नाम । सद्‌गद तें प्रेम असों द्यावें
सुख-दुःख-कोटी येती आणि जाती । नामाविण विश्रांति नाहीं जगा
एका जनार्दनी नामाचा प्रताप । नुरे चि तेथें पाप ओखदासी

१००

कोणी कांहीं तरी म्हणो । आम्ही न जाणों त्या बोला
गाऊं सुखें नामावळी । सुख-कल्लोळीं सर्वदा
नाचूं संत-मेळा सदा । कीर्तनीं गोविंदा रंजवूं
एका जनार्दनी हा चि धंदा । वायां शब्दां न लागूं

## अध्याय १५

१०१

जग राम नाम म्हणे । तया कां न येती विमानें
नवल स्मरणाची ठेव । नामीं नाहीं अनुभव
नष्ट गणिका राम म्हणे । तिसी वैकुंठींचें पेणें
एका जनार्दनी ध्यात । राम पाहे ध्याना आंत

१०२

नाम घेतां हे वैखरी । चित्त धांवे विषया वरी
कैसें होताहे स्मरण । स्मरणा माजीं विस्मरण
नामरूपां नव्हता मेळ । नुसता वाचेचा गोंधळ
एका जनार्दनी छंद । बोला माजीं परमानंद

१०३

तोंडीं घास डोईं टोला । ऐसा भजनार्थ झाला
तो सर्वस्वीं नागवला । वैरी आपुला आपण चि
एका जनार्दनी मात । भजें भजें सद्‌गुरु-नाथ

१०४

भव-रोगासी ओखद । राम-नाम हें चि शुद्ध
येणें तुटे रोग-व्यथा । भुक्ति मुक्ति वंदिती माथां
न लगे आणिकाचें काम । वाचे वदे राम-नाम
पथ्य एक शुद्ध क्रिया । एका जनार्दनी लागे पाया

१०५

हरिनाम स्मरतों म्हणोनि आचरसी दोष
श्रवण स्मरण भक्ति तेणें पडली ओस ।

हरिनामाचेनि बळें करिसी अधर्म
देवाचेनि तुमचें शुद्ध नोहे कर्म ।

सत्यव्रती धर्म सद्-यज्ञ-निष्ठ
असत्य-वचनीं त्याचा पडला अंगुष्ठ ।

एका जनार्दनी संत-सोयीनें चाले
सद्‌गुरु-वचन सबाह्य शुद्ध झालें ।

१०६

व्यापक विठ्ठल नाम तेव्हां चि होईल । जेव्हां हें जाईल मी-तूंपण
आपुलें तें नाम जेव्हां ओळखील । व्यापक साधेल विठ्ठल तेणें
आपुलें ओळखी आपण सांपडे । सर्वत्र हि जोडे विठ्ठल-नाम
नामा विण जन पशूच्या समान । एका जनार्दनी जाण नाम-जप

## अध्याय १६

१०७

हरीचिया दासा हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक
हरि मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें
जन्म घेणें लागे वासनेच्या संगें । ते चि झाली अंगें हरिरूप
हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एका जनार्दनीं हरि बोला

१०८

हरि हरि बोला नाहीं तरी अबोला । व्यर्थ गलबला करूं नका
नको नको मान सांडीं अभिमान । सोडी मी-तूंपण तो चि सुखी
सुखी जेणें व्हावें जग निववावें । अज्ञानी लावावे सन्मार्गासी
मार्ग जया कळे भाव-भक्ति-बळें । जगाचिये मेळे न दिसती
दिसती जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं । एका जनार्दनी ओळखिले

१०९

ओळखिला हरि धन्य तो संसारीं । मोक्ष त्याचे घरीं सिद्धी सहित
सिद्धि लावी पिसें कोण तया पुसे । नेलें राजहंसें पाणी काई
काय तें करावें संदेहीं निर्गुण । ज्ञानानें सगुण ओस केलें
केलें कर्म झालें तें चि भोगा आलें । उपजले मेले ऐसे किती
एका जनार्दनी नाहीं यातायाती । सुखाची विश्रांति हरि संगें

११०

जें जें दृष्टी दिसे तें तें हरिरूप । पूजा ध्यान जप त्यासी नाहीं
वैकुंठ-कैलासीं तीर्थ-क्षेत्रीं देव । तया विण ठाव रिता कोठें
वैष्णवांचें गुह्य मोक्षाचा एकांत । अनंतासी अंत पाहतां नाहीं
आदि-मध्य-अंतीं अवघा हरि एक । एक चि अनेक एक हरि
एकाकार झाले जीव शिव दोन्ही । एका जनार्दनी ऐसें केलें

१११

सत्पद तें ब्रह्म चित्पद ते माया । आनंद-पद जया म्हणती हरि
सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुण-निर्गुण हरि-पायीं
तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी । गीते माजीं हरी बोलियलें
हरिपद-प्राप्ति भोळ्या भाविकांसी । अभिमानियांसी गर्भवास
अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तीन्ही । एका जनार्दनीं तें चि झालें

११२

हरि बोला देतां हरि बोला घेतां । हांसतां खेळतां हरि बोला
हरि बोला गातां हरि बोला खातां । सर्व कार्य करितां हरि बोला
हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं । देह-त्यागा अंतीं हरि बोला
हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां । उठतां बैसतां हरि बोला
हरि बोला जनीं हरि बोला विजनीं । एका जनार्दनी हरि बोला

११३

आवडीनें भावें हरि-नाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे
नको खेद धरूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे
सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं
जैसी स्थिति आहे तैशा परी राहें । कौतुक तूं पाहें संचिताचें
एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरि-कृपें त्याचा नाश झाला

## अध्याय १७

११४

आवडी करितां हरि-कीर्तन । हृदयीं प्रगटे जनार्दन
थोर कीर्तनाचें सुख । स्वयें तिष्ठे आपण देख
घात आलिया निवारी । चक्र गदा घेउनि करीं
कीर्तनीं होऊनि सादर । एका जनार्दनी तत्पर

११५

कीर्तनाची आवडी देवा । वैकुंठाहुनी घाली धांवा
नवल वैकुंठीं च नसे । तो कीर्तनीं नाचतसे
भाळ्या भोळ्या साठीं । धावे त्याच्या पाठोपाठीं
आपुलें सुख तया द्यावें । दुःख आपण भोगावें
दीन-नाथ पतित-पावना । एका जनार्दनी वचना

११६

नवल रोग-पडिपाडू । गोड परमार्थ झाला कडू
विषय व्याधीचा उफाडा । हरि-कथेचा घेईं काढा
ऐसा रोग देखोनी गाढा । एका जनार्दन धावे पुढा

११७

हरिकीर्तनें चित्त शुद्ध । जाय भेद निरसूनि
काम क्रोध पळती दुरी । होत भोंवरी महा-पापा
गजरें हरीचें कीर्तन । पशु पक्षी होती पावन
एका जनार्दनी उपाय । तरावया भव-नदीसी

११८

करितां कीर्तन-श्रवण । अंतर्मळाचें होत क्षालन
तुमचें कीर्तन पवित्र कथा । पावन होत श्रोता वक्ता
तुमचे कीर्तनीं आनंद । गातां तरले ध्रुव प्रह्लाद
एका जनार्दनी कीर्तन । तिन्ही देव वंदिती चरण

११९

तुमचे वर्णितां पोवाडे । कळिकाळ पायां पडे
तुमची वर्णितां बाळ-लीळा । ते तुज आवडे गोपाळा
तुमचें वर्णील हास्य-मुख । त्याचें छेदिसी संसार-दुःख
तुमचे दृष्टीचें दर्शन । एका जनार्दनी तें ध्यान

१२०

मागणें तें आम्ही मागूं देवा । देईं हेवा कीर्तनीं
दुजा हेत नाहीं मनीं । कीर्तनावांचूनि तुमचिया
प्रेमें हरिदास नाचत । कीर्तन होत गजरीं
एका जनार्दनी कीर्तन । पावन होती चराचर जाण

## अध्याय १८

१२१

नवल भजनाचा भावो । स्वतां भक्त चि होय देवो
वाचे करितां हरि-कीर्तन । उन्मनी मन निशीं-दिनीं
नाहीं प्रपंचाचें भान । वाचे सदा नारायण
एका जनार्दनी मुक्त । सबाह्य अभ्यंतरीं पुनीत

१२२

आजी नवल झालें वो माये । पाहण्या पाहणें दृष्टि धाये
ऐसा लाववी सुखकर मूर्ति । संत-संगें झाली मज विश्रांति
योगीश्वर जया चिंतिती । सनकादिक जया ध्याती
योग-साधनें नातुडे जो माये । एका जनार्दनी कीर्तनीं नाचतु आहे

१२३

जें पदीं निरूपण तें चि हृदयीं ध्यान तेथें सहजीं स्थिर राहे मन
कीर्तनासी तोषोनि कळिकाळ तुष्टला समाधीसी समाधान रे

कीर्तनीं सद्भाव अखंड अहर्निशीं पाप न रिघे त्याच्या देशीं
निज-नामें निष्पाप अंतर देखोनि देव तिष्ठे तयापाशीं रे

हरिनाम-कीर्तनें अभिमान सरे आणिक श्रेष्ठ आहे काज
सद्भावें कीर्तनीं गातां पैं नाचतां लोकेषणा सांडीं लाज रे

व्रत तपा तीर्थां न भेटे जो पाहतां तो कीर्तनीं सांपडे देवो
तनु मनु प्राणें कीर्तनीं विनटले भावा विकिला वासुदेवो रे

एका जनार्दनी कीर्तन भावें श्रोता वक्ता ऐसें लाहावें
गर्जत नामें निशाण लागूनि सकळिकां वैकुंठासी जावें रे

१२४

नित्य नवा कीर्तनीं कैसा ओढवला रंग
श्रोता आणि वक्ता स्वयें झाला श्रीरंग

आल्हादें वैष्णव करिती नामाचा घोष
हरिनाम गर्जतां गगनीं न माये हरुष

पदोपदीं कीर्तनीं निवताहे जग मन
आवडी भुकेली तिनें गिळिलें गगन

एका जनार्दनी गातां हरीचें नाम
निमालीं इंद्रियें विषय विसरलीं काम

## १२५

कीर्तनाची मर्यादा कैसी । देव सांगे उद्धवासी
गावें नाचावें साबडें । न घालावें कोडें त्या कांहीं
मिळेल तरी खावें अन्न । अथवा पर्णें तीं भक्षून
जाईल तरी जावो प्राण । परी न संडावें कीर्तन
किरकीर आणूं नये । बोलूं नये भलती गोष्टी
स्वयें उभा राहून । तेथें करीं मी कीर्तन
घात आलिया निवारीं । माता जैसी बाळावरी
बोले उद्धवासी गूज । एका जनार्दनी बीज

## १२६

सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं
सज्जन-वृंदें मनोभावें आधीं वंदावीं
संत-संगें अंतरंगें नाम बोलावें
कीर्तन-रंगीं देवा-संनिध सुखें डोलावें
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या
प्रेम-भरें वैराग्याच्या युक्ति विवराव्या
जेणें करुनी मूर्ति ठसावें अंतरीं श्रीहरिची
ऐशी कीर्तन-मर्यादा हे संतांचे घरची
अद्वय-भजनें अखंड-स्मरणें वाजवी कर-टाळी
एका जनार्दनी मुक्त होय तत्काळीं

१२७

धन्य तो चि जगीं एक हरि-रंगीं नाचे
राम कृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे

सुख दुःख समान सकळ जीवांचा कृपाळ
ज्ञानाचा उद्बोध भक्ति-प्रेमाचा कल्लोळ

विषयीं विरक्त जया नाहीं आप-पर
संतुष्ट सर्वदा स्वयें व्यापक निर्धार

जाणीव शाहणीव ओझें सांडूनियां दूरी
आपण वस्तीकर वर्ततसे संसारीं

एका जनार्दनी नित्य हरीचें कीर्तन
आसनीं शयनीं नित्य हरीचें चिंतन

## प्रकरण तिसरें

# सत्संगति आणि गुरु-भक्ति

## अध्याय १९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ....... ..........
क्रमांक ......१२८......... नों. दि: ..............

वैष्णवां घरीं देव सुखावला । बाहीर न वजे दवडोनि घातला
देव म्हणे माझें पुरतसे कोड । संगति या गोड वैष्णवांची
जरी देव नेऊनि घातला दूरी । परतोनि पाहे तंव घराभीतरीं
कीर्तनाची देवा आवडी मोठी । एका जनार्दनी पडली मिठी

१२९

संता अंकीं देव वसे । देवा अंकीं संत बैसे
ऐसी परस्परें मिळणी । समुद्र तरंग तैसे दोन्ही
हेम-अलंकारवत् । तैसे देव-भक्त भासत
पुष्पीं तो परिमळ असे । एका जनार्दनी देव दिसे

१३०

संत आधीं देव मग । हा चि उमग आणा मना
देव निर्गुण संत सगुण । म्हणोनि महिमान देवासी
मुळीं अलक्ष लक्षा नये । संतीं सोय दाविली
एका जनार्दनी संत थोर । देव निर्धार धाकुला

१३१

संतांचा महिमा देव चि जाणे । देवाची गोडी संतांसी पुसणें
ऐसी आवडी एकमेकां । परस्परें नोहे सुटिका
बहुत रंग उदक एक । यापरी देव संत दोन्ही देख
मागें पुढें नव्हे कोणी । शरण एका जनार्दनी

१३२

अभक्तां देव कंटाळती । परी सरते करिती संत त्यां
म्हणोनि महिमा त्यांचा जगीं । वागविती अंगीं सामर्थ्य
मंत्र-तंत्रा नोहे बळ । भक्ति प्रेमळ पाहिजे
आगम-निगमांचा पसारा । उगा चि भारा चिंध्यांचा
वेद-शास्त्रांची घोकणी । ती तों कहाणी जुनाट
एका जनार्दनी सोपा मार्ग । संत-संग चोखडा

१३३

संतांसी जो निंदी देवासी जो वंदी । तो नर आपदीं आपदा पावे
देवासी जो निंदी संतांसी जो वंदी । तो नर गोविंदीं सरता होय
कृष्णा कंस द्वेषी नारदा सन्मानी । सायुज्य-सदनीं पदवी पावे
एका जनार्दनी गूज सांगे कानीं । रहा अनुदिनीं संत-संगें

## अध्याय २०

१३४

मेघा परिस उदार संत । मनोरथ पुरविती
आलिया शरण मनें वाचा । चालविती त्याचा भार सर्व
लिगाड उपाधि तोडिती । सरते करिती आपणां मार्जीं
शरण एका जनार्दनी । तारिले जनीं मूढ सर्व

१३५

जया जैसा हेत । तैसा संत पुरविती
उदारपणें सम देणें । नाहीं उणें कोणासी
भलतिया भावें संत-सेवा । करितां देवा माने ते
एका जनार्दनी त्यांचा दास । पूर्ण वोरस कृपेचा

१३६

संतांचे ठायीं नाहीं द्वैत-भाव । रंक आणि राव सारिखा चि
संतांचें देणें अरि-मित्रां सम । कैवल्याचें धाम उघडें तें
संतांची थोरीव वैभव गौरव । न कळे अभिप्राय देवासी तो
एका जनार्दनी करी संत-सेवा । पर-ब्रह्म ठेवा प्राप्त झाला

१३७

संत माय-बाप म्हणतां । लाज वाटे बहु चित्ता
माय बाप जन्म देती । संत चुकविती जन्म-पंक्ति
माय बापा परिस थोर । वेद-शास्त्रीं हा निर्धार
शरण एका जनार्दनी । संत शोभती मुकुट-मणि

१३८

जयाचेनि चरणें तीर्थां तीर्थपण । तो हृदयीं केला सांठवण
नवल महिमा हरिदासाची । तीर्थें उपजती त्याचे कुशीं
काशी-मरणें होय मुक्ति । येथें वचनें न मरतां मुक्ति
एका जनार्दनाचे भेटी । सकल तीर्थें वोळंगती दिठी

१३९

संत केवळ घातकी पाहीं । परी तयांसी पातक नाहीं
निज-बोधाचे करुनी फांसे । दोघे गोसांवी मारिले कैसे
अति खाणोरिया कर्म करी । दिवसां जाळिले गांव चारी
एका जनार्दनी घातकी मोठे । त्यांसी अंतक केवीं भेटे

१४०

सर्वांगीं सुवास परि तो उगला न राहे
सभोंवते तरु चंदन करित चि जाये

वैरागर मणि पूर्ण तेजाचा होये
सभोंवते हरळ हिरे करित चि जाये

एका जनार्दनी पूर्ण झालासे निज
आपणासारिखें परी तें करितसे दुजें

## १४१

निवृत्ति शोभे मुकुटाकार । ज्ञान सोपान वटेश्वर
विठू पंढरीचे राणे । त्याले भक्तांचीं भूषणें
गळां शोभे वैजयंती । तिसी मुक्ताई म्हणती
अखंड शोभे माझ्या बापा । पदकीं तो नामा शिंपा
कासे कसिला पीतांबर । तो हा जाणावा कबीर
चरणीं वीट निर्मळ । तो हा झाला चोखामेळ
चरणां तळील ऊर्ध्व रेखा । झाला जनार्दन एका

## १४२

धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे
तैं आम्हां येणें घडे । संसार-स्थिती

आम्हां कां संसारा येणें । हरि-भक्ति नाम-स्मरणें
जड जीव उद्धरणें । नाम-स्मरणें करूनि

सर्व कर्म ब्रह्म-स्थिति । प्रतिपादाव्या वेदोक्ति
हें चि एक निश्चिती । करणें आम्हां

नाना मतें पाखंड । कर्मठता अति बंड
तयाचें ठेंचणें तोंड । हरि-भजनें

विश्वरूप सृष्टि । अर्जुना दाविली दृष्टी
भिन्न भेदाची गोष्टी । बोलूं नये

एका जनार्दनी । धरितां भेद मनीं
दुऱ्हावले येथुनी । निंदक जाण

## अध्याय २१

१४३

जें जें बोले तैसा चाले । तो चि वहिलें निवांत
अंगीं असोनि जाणपण । सदा सर्वदा तो लीन
निंदा अथवा वंदा । नाहीं विषम ती बाधा
शांतीचा मांदूस । भरला असे सदोदित
एका जनार्दनी धन्य । त्याचें दर्शन जग-मान्य

१४४

असोनि संसारी आपदा । वाचे वदे विठ्ठल सदा
नाहीं मानसीं तळमळ । सदा शांत गंगा-जळ
असोनिया अकिंचन । ज्याची वृत्ति समाधान
एका जनार्दनी ऐसे थोडे । लक्षांमधें एक निवडे

१४५

मज कोणीं न देखावें । मज कोणीं नोळखावें
मान देखोनियां दृष्टी । पळे देह-उपेक्षा पोटीं
मी एक लौकिकीं आहें । ऐसें कवणा ठावें नोहे
ऐसा निरपेक्ष सज्ञानी । एका शरण जनार्दनी

१४६

छळितां न येती रागा वरी । तदाकारीं वृत्ति मुराली
आप-पर नाहीं जेथें । भेद तेथें नसे चि
याती असो भलते परी । एक सरी जयासी
एका जनार्दनी भाव । अवघिया ठाव एक चि

92403

१४७

आपुली च दारा जरी टेके व्यभिचारा । क्रोधाचा थारा अंतरीं नये
आपुलें च धन तस्करें नेतां जाण । जयाचें मन उद्विग्न नव्हे
आपुला चि पुत्र वधोनि जाय शत्रु । परी मोहाचा पाझरू नेत्रीं न ये
आपुलें शरीर गांजितां पर-नरें । परी शांतीचें घर चळों नेदी
एका जनार्दनी जया पूर्ण बोधु । तो चि एक साधु जगा-मार्जीं

१४८

मुखीं नाहीं निंदा-स्तुति । साधु वर्ते आत्मस्थिती
राग-द्वेष समूळ गेले । द्वैताद्वैत हारपलें
घेणें देणें हा पसारा । नाहीं जयासी दुसरा
एका जनार्दनी संत । ज्याचे हृदयीं भगवंत

१४९

देही असोनि विदेही । चाले बोले सदा पाही
असे अखंड समाधि । नसे कांहीं आधि-व्याधि
उपाधीचे तोडोनि लाग । देहीं देहपणें भरलें जग
एका जनार्दनी संग । सदा समाधान सर्वांग

१५०

जो वस्तु झाला केवळ । त्याचें अंतर कोमळ
भूतमात्रीं दयाळ । सर्वां परी भजन
जेथें रज तम वसती । तेथें द्वेष लोभ नांदती
त्याचे संगें ज्ञान-ज्योति । विझोनि जाय
एका जनार्दनी शरण । जेथें शुद्ध सत्त्वाचें प्राधान्य
तो वस्तूसी जाय मिळोन । सहजीं सहज

१५१

ब्रह्म सर्व-गत सदा सम । जेथें आन नाहीं विषम
ऐसे जाणती ते अति दुर्गम । तयांची भेटी झालीया भाग्य परम

ऐसे कैसियानें भेटती ते साधु । ज्यांचा अतर्क्य तर्कवेना बोधु
ज्यांसी निजानंदी आनंदु । ज्यांचा परमानंदीं उद्‌बोधु

पवना घालवेल पालाण । पायीं चढवेल गगन
भूत भविष्य कळों येईल वर्तमान । परी त्या साधूंचें न कळे महिमान

चंद्रामृत सुखें सेववेल । रवि अस्ता जातां धरवेल
बाह्या हेळा सागर तरवेल । परी त्या साधूंची भेटी नव्हेल

जप तप करवेल अनुष्ठान । ध्येय ध्याता धरवेल ध्यान
ज्ञेय-ज्ञाता-विवर्जित ज्ञान । ज्ञाना-ध्यानाचें मूळ हे साधुजन

निजवृत्तीचा करवेल निरोधु । जीवा-शिवाचा भोगवेल आनंदु
एका जनार्दनी निज-साधु । त्यांच्या दर्शनें तुटे भव-बंधु

## अध्याय २२

१५२

आजी सुदिन आम्हांसी । संत-संग कैवल्य-राशी
हें चि आमुचें साधन । आणिक नको आम्हां पठन
वेद-श्रुति-पुराण-मत । संत-सेवा ते सांगत
जाणोनि विश्वासलों मनीं । शरण एका जनार्दनी

१५३

नव्हतां शुद्ध अंतःकरण । संत-सेवा न घडे जाण
शुद्ध संकल्पा वांचून । संत-सेवा न घडे जाण
काम क्रोध दुराचार । यांचा करूं नये अंगीकार
आशा-मनीषांचें जाळें । छेदुनि टाकी विवेक-बळें
एका जनार्दनी ध्यान । सहज तेणें संतपण

१५४

गोल्हाट उल्हाट कासया आटाआटी । घेतां संत-भेटी पुरे हें चि
ओहं कोहं यातायाती सोहं जाण । टाकुनि संत-चरण धरा आधीं
एका जनार्दनी मानावा विश्वास । होय देवदास आपोआप

१५५

संतासी आवडे तो देवाचा हि देव । कळिकाळाचे भेव पाया-तळीं
आणिकांची चाड नसे चि वासना । संतांच्या चरणां वांचूनियां
ऐसें ज्यांचें प्रेम ऐसी ज्यांची भक्ति । एका जनार्दनी युक्ति तेथें राबे

१५६

ऐसे जे धाले पूर्ण निमाले । ते नाहीं आले परतोनियां
घडीनें घडी चढतसे गोडी । अखंड आवडी संतांपायीं
एका जनार्दनी रंगले नामीं । तयां वंदूं आम्ही सर्व भावें

१५७

संतां वांचोनियां नाम नये हातां । साधनें साधितां कोटी जाणा
जैसें कांतेविण करणें संसार । साधन-विचार व्यर्थ ठेला
संत-समागम धरलिया वांचूनि । संसार-सांडणी नोहे बापा
एका जनार्दनी संतांसी शरण । रिघालिया जाण देव जोडे

## अध्याय २३

१५८

संतांचिये द्वारीं होईन द्वारपाळ । न सांगतां सकळ करीन काम
तेणें माझ्या जीवा होईल समाधान । या परतें साधन आणिक नाहीं
शेष उष्टावळी काढीन पत्रावळी । पूर्व कर्मा होळी सहज होय
एका जनार्दनी हें चि पैं मागत । नाहीं दुजा हेत सेवेविण

## १५९

संतांचिये घरीं होईन श्वान-याती । उच्छिष्ट तें प्रीती मिळेल मज
तेणें या देहाची होईल शुद्धता । भ्रम मोह ममता निवारेल
आशा-पाश सर्व जातील तुटोनी । जीव हा बंधनीं मुक्त होय
एका जनार्दनी भाकीन करुणा । श्री संत-चरणा वारंवार

## १६०

संतांचिये परिवारीं । लोळेन मी निर्धारीं
जीवा होईल महालाभ । ऐसा घडतां उद्योग
सांडोनियां थोरपण । शिव घाली लोटांगण
आपुलें महत्त्व । तेथें मिरवूं नये सत्य
शरण एका जनार्दनी । ओंवाळावा जीव चरणीं

## १६१

संत जाती हरिकीर्तना । त्यांच्या वाहीन मोचे वहाणा
हें चि भवसिंधूचें तारूं । तेणें उतरूं पैल पारु
जन्मोजन्मींचें भेषज । ते हे संत-चरण-रज
संत-चरणींच्या पादुका । झाला जनार्दन एका

## १६२

संत भलते याती असो । परी विठ्ठल मनीं वसो
तया घालीन लोळणी । घेईन मी पायवणी
भलते ज्ञातीचा । विठ्ठल उच्चारी वाचा
तेथें पावन देह चारी । एका जनार्दनी निर्धारी

१६३

तुम्ही संतजन । माझें ऐका हो वचन
करा कृपा मजवरी । एकदां दाखवा तो हरि
आहे तुमचे हातीं । म्हणोनि येतों काकुळती
एका जनार्दनी म्हणे थारा । संतीं द्यावा मज पामरा

## अध्याय २४

१६४

संत-संगतीनें झालें माझें काज । अंतरीं तें निज प्रगटलें
बरवा झाला समागम । अवघा निवारला श्रम
दैन्य दरिद्र दूर गेलें । संत पाउलें देखतां
एका जनार्दनी सेवा । करीन मी आपुल्या भावा

१६५

कैवल्य-निधान तुम्ही संत जन । काया वाचा मन जडलें पायीं
सर्व भावें दास अंकित अंकिला । पूर्णपणें झाला बोध देहीं
जें जें दृष्टी दिसे तें तें ब्रह्मरूप । एका जनार्दनी दीप प्रज्वळला

१६६

धन्य दिवस झाला । संत समुदाय भेटला
कोडें फिटलें जन्माचें । सार्थक झालें पैं साचें
आजि दिवाळी दसरा । संत-पाय आले घरा
एका जनार्दनी झाला । धन्य दिवस तो भला

१६७

केला संतीं उपकार । दिधलें घर दावनी
न ये ध्यानीं मनीं लक्षीं । तो प्रत्यक्षीं दाविला
संकल्पाचें तोडिलें मूळ । आलें समूळ प्रत्यया
एका जनार्दनी कृपावंत । होती संत सारखे

१६८

मोकळें तें मन ठेविलें बांधोनि । जनार्दन-चरणीं सर्व भावें
स्थिर मति झाली वार्ता ते हि गेली । द्वैताची फिटली सर्व सत्ता
एका जनार्दनी धन्य संत-सेवा । उगविला गोंवा गुंती सर्व

१६९

संत-द्वारीं कुतरा झालों । प्रेम-रसासी सोंकलों
भुंकत भुंकत द्वारा आलों । ज्ञान-थारोळचा बैसलों
कुतरा भुंकत आला हिता । संतीं हात ठेविला माथां
कुतऱ्या गळ्याची सांखळी । केली संतांनीं मोकळी
एका जनार्दनी कुतरा । दांत पाडूनि केला बोथरा

## अध्याय २५

१७०

मनोभाव जाणुनि माझा । सगुण रूप धरिलें वोजा
पाहुणा सद्गुरु-राजा । आला वो माये
प्रथम अंतःकरण जाण । चित्त शुद्ध आणि मन
चोखाळोनि आसन । स्वामीसी केलें

अनन्य आवडीचें जळ । प्रक्षाळिलें चरण-कमळ
वासना समूळ । चंदन लावी
अहं जाळियेला धूप । सद्भाव उजळिला दीप
पंच प्राण हे अमूप । नैवेद्य केला
एका जनार्दनी पूजा । देव भक्त नाहीं दुजा
अवघा चि सद्गुरु-राजा । होवोनि ठेला

१७१

श्रीगुरूचें नाम मात्र । तें चि आमुचें वेद-शास्त्र
श्रीगुरूचें चरण-रज । तेणें आमुचें झालें काज
श्रीगुरूची ध्यान-मुद्रा । ते चि आमुची योग-निद्रा
एका जनार्दनी मन । श्रीगुरु-चरणीं केलें लीन

१७२

गुरु परमात्मा परेशु । ऐसा ज्याचा दृढ विश्वासु
देव तयाचा अंकिला । स्वयें संचला त्याचे घरा
एका जनार्दनी गुरु देव । येथें नाहीं बा संशय

१७३

सेवेची आवडी । आराम नाहीं अर्ध घडी
नित्य करितां गुरु-सेवा । प्रेम पढिभर होत जीवा
आळस येवों चि सरला । आराणुकेचा ठावो गेला
तहान विसरली जीवन । भूक विसरली मिष्टान्न
ऐसें सेवे गुंतलें मन । एका जनार्दनी शरण

१७४

येवढें जया कृपेचें करणें । रंक राज्यपणें मिरवती
तो हा कल्पतरु गुरु जनार्दनु । छेदी देहाभिमानु भवकंदु
कृपेचें वोरसे धावे कामधेनु । तैसा माझा मनु वेधलासे
एका जनार्दनी तया वांचुनि कांहीं । दुजे पाहणें नाहीं मनामाजीं

१७५

साधावया परमार्था । साह्य नव्हती माता पिता
साह्य न होत व्याही जांवई । आपणा आपण साह्य पाहीं
साह्य सद्गुरु समर्थ । ते चि करिती स्वहित
एका जनार्दनी शरण । नोहे एकपणा वांचून

१७६

दासा दुःख झालें फार । वेगीं करा प्रतिकार
पुण्य-स्थान मी पावलों । गुरु-चरणीं विश्रामलों
कर जोडूनियां शिर । ठेवियेलें पायांवर
जन्म नाम जनार्दन । मुखीं गुरु-अभिधान

१७७

जन्मोजन्मींचें संचित । गुरु-पायीं जडलें चित्त
तें तो सोडिल्या न सुटे । प्रेम-तंतु तो न तुटे
दुःखें आदळली वरपडा । पाय न सोडा हा धडा
एका जनार्दनी निर्धार । तेथें प्रगटे विश्वंभर

१७८

जय जय वो जनार्दने विश्वव्यापक संपूर्ण वो
सगुण अगुण विगुण पूर्ण पूर्णानंदघन वो
ब्रह्मा विष्णु रुद्र निर्माण तुज पासोनी वो
गुण-त्रय उभय-पंचक तूं चि अंतःकरणीं वो
जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या उन्मनी हें स्थान वो
विश्व-तैजस प्राज्ञ प्रत्यगात्मा तूं संपूर्ण वो
त्वंपद तत्पद आणिक असिपद तें तूं एक वो
नसोनि एकपणीं एका एकीं जनार्दन वो

---

## प्रकरण चौथें

# भक्ति-योग

### अध्याय २६

१७९

सुंदर तें ध्यान मांडिये घेऊनि । कौसल्या जननी गीतीं गाये
सुंदर तें ध्यान नंदाचे अंगणीं । गोपाळ गौळणी खेळताती
सुंदर तें ध्यान चंद्रभागे तटीं । पुंडलिका पाठी उभें असे
सुंदर तें ध्यान एका जनार्दनी । जनीं वनीं मनीं भरलासे

१८०

वेद जया लागीं नित्य वाखाणिती । तो हा वेदमूर्ति पांडुरंग
रवि-शशी दीप्ति जेणें प्रकाशती । तो हा तेजोमूर्ति पांडुरंग
पांचां भूतांची जो करितो झाडणी । तो हा ज्ञान-खाणी पांडुरंग
राजा त्रैलोक्याचा गुरुराज स्वामी । वसे अंतर्यामीं पांडुरंग
प्रभा हे जयाची पसरली जनीं । चिद्रूपाची खाणी पांडुरंग
परोपकारा लागीं अवतार केला । आनंदाचा झेला पांडुरंग
नेई भक्तांसी जो आपुल्या समीप । तो हा मायबाप पांडुरंग
इतिकर्तव्यता हे चि दास लागीं । सेवावा हा जगीं पांडुरंग
एका जनार्दनी देह हारपला । होऊनी राहिला पांडुरंग

१८१

विश्व पाळिताहे हरि । दासा केवीं तो अव्हेरी
नव मास गर्भवास । नाहीं भागला आम्हांस
बाळपणीं वांचविलें । स्तनीं दुग्ध तें निर्मिलें
कीटक-पाषाणांत वसे । त्याचे मुखीं चारा असे
धरा धरा हा विश्वास । एका जनार्दनी त्याचा दास

१८२

चरणांची थोरी । जाणे गौतम-सुंदरी
हृदयाची थोरी । भक्त जाणती परोपरी
करांची ती थोरी । जाणे सुदामा निर्धारीं
सम-चरणींची शोभा । एका जनार्दन उभा

१८३

चरण वंदिती कां निंदिती । ते हि हरिपदा जाती
चरण वंदितां तरली शिळा । निंदितां तारिलें शिशुपाळा
ऐसें चरणांचें महिमान । एका जनार्दनी शरण

१८४

बहुतांचीं मतांतरें तीं टाकुनी । विठ्ठल-चरणीं बुडी दे कां
नव्हे तुज बाधा काळाची आपदा । ध्याईं तूं गोविंदा प्रेम-भरित
जनार्दनाचा एका लाहुनी चरणीं । बोलतसे वाणी करुणा-भरित

१८५

निवांत श्रीमुख पहावें डोळे भरी । तेणें नुरे अंतरीं इच्छा कांहीं
चरणीं ते मिठी घालावे दंडवत । तेणें पुरे आर्त सर्व मनींचें
हृदय-कमळीं पहावा तैसा ध्यावा । एका जनार्दनी विसांवा सहज चि

१८६

तुज सगुण जरी ध्याऊं तरी तूं परिमित होसी
तुज निर्गुण जरी ध्याऊं तरी तूं लक्षा न येसी
साच चि वेद-पुरुषा न कळसी श्रुति-अभ्यासेंसीं
तो तूं नभाचा जो साक्षी शब्दीं केंवि आतुडसी

जय राम रामा सच्चिदानंद रामा
भव-सिंधु-तारक जय मेघ-श्यामा
अनंत-कोटि-ब्रह्मांडाधीशा अनुपम्य महिमा
अहं सोहं ग्रासुनी हें तों मागतसें तुम्हां

अष्टांग-योगें शरीर दंडुनि वायूसी जुंझ घेऊं
तेथें बहुसाल अंतराय तयाचा येतसे भेऊ
कर्म चि जरी आचरूं दृढ धरूनियां बाहो
तेथें विधि-निषेधाचा मोठा अंगीं वाजतसे घावो

जनीं जनार्दन प्रत्यक्ष डोळां कां न दिसे यासी
ममताहंकृती योगी बुडविती साधन आश्रमासी
एका जनार्दनी सिद्ध साधन कां न करिसी
सांडी मांडी न लगे मग तूं अवघा राम चि होसी

## अध्याय २७

### १८७

राम हें माझें जीवींचें जीवन । पाहतां मन हें झालें उन्मन
साधन कांहीं नेणें मी अबला । श्याम हें बीज बैसलेंसे डोळां
लोपली चंद्र-सूर्याची कळा । तो माझा राम जीवींचा जिव्हाळा
प्रकाश दाटला दाही दिशा । पुढें हो मार्ग न दिसे आकाशा
खुंटली गति श्वासा-उच्छ्वासा । तो राम माझा भेटेल कैसा
यासी हो साच परिसा कारण । एका जनार्दनी शरण तरी च साधन

### १८८

कृष्णा धांव रे लवकरी । संकट पडलें भारी
हरि तूं आमुचा कैवारी । आलें विघ्न निवारीं

आजि कां निष्ठुर झालासी । होइल बा गति कैसी
अनाथ मी देवा परदेशीं । धाव तूं वेगेंसीं

आतां न लावीं उशीर । अनर्थ करील फार
एवढा करीं उपकार । दे दर्शन सत्वर

कंठ शोषला अनंता । प्राण जाइल आतां
पदर पसरितें अच्युता । पाव रुक्मिणी-कांता

ऐकुनि बहिणीची करुणा । आला यादव-राणा
द्रौपदी लोळत हरि-चरणा । एका जनार्दना

## १८९

तें मन निष्ठुर कां केलें । जें पूर्ण दयेनें भरलें
गजेंद्राचे हाके सरिसे । धांवुनियां आलें
प्रल्हादाच्या भावार्थासी । स्तंभीं गुरगुरलें
पांचाळीच्या करुणा-वचनें । कळवळुनी आलें
एका जनार्दनी पूर्ण-कृपेनें । निशिदिनीं पदीं रमलें

## १९०

भजन नाहीं मी अकर्मी वायां । अभिनव अवगति झाली देवराया
नीचा नीच मी चि एक । मजवरी उपरी वर्ते सकळ लोक
अंधा अंध अधोगत पाहीं । मजहूनि अंध कोणी नाहीं
एका जनार्दनी नीच हा नेला । मुंगियेचे पायीं सगळा सामावला

## १९१

कई तया मार्गें चरण चालती । ऐसी वाटे खंती दिन-राती
कईं या मनाची पुरेल वासना । कईं मिठी चरणा देईन जीवें
कईं हें भाळ ठेवीन चरणीं । कईं पायवणी घेईन सुखें
एका जनार्दनी कईं होईल कृपा-दान । कईं नारायण प्रेमें-भेटे

१९२

आनंदाचा भोग घालीन आसनीं । वैकुंठ-वासिनी तुझे नांवें
येईं वो विठ्ठले अनाथांचे नाथे । पंढरी-दैवते कुळ-देवी
आपुलें म्हणावें सनाथ करावें । एका जनार्दनी वंदावें संत-जना

१९३

मागणें हें चि माझें देवा । दुजेपण दुरी ठेवा
मी तूं ऐसी नको उरी । जनार्दना कृपा करीं
रंक मी एक दीन । माझें करावें स्मरण
नीच सेवा मज द्यावी । एका जनार्दनी आस पुरवावी

१९४

जेथें जेथें मन जाईल वासना । फिरवावें नारायणा हें चि देईं
वारंवार द्यावा नामाचा आठव । कुबुद्धीचा ठाव पुसा सर्व
भेदाची भावना तोडावी कल्पना । छेदावी वासना स-मूळ कंद
एका जनार्दनी नको दुजा छंद । राम कृष्ण गोविंद आठवावा

१९५

सर्वां भूतीं तुझें रूप । हृदयीं सिद्ध चि स्वरूप
इतुलें देईं अधोक्षजा । नाहीं तरी घोट भरीन तुझा
सकळांहूनि करीं सान । सकळिकां सम समान
निःशेष दवडोनियां स्वार्थ । अवघा करीं परमार्थ
एका जनार्दनी मागे । नाहीं तरी घाला घालीन अंगें

१९६

जय गोविंदा परमानंदा ऐक माझे बोल
निर्गुणरूपें असतां तुझें कांहीं च नव्हे मोल
मग तूं माया धरूनि अति झालासी सबळ
नसतें देवपण अंगीं आणुनि चाळविसी केवळ

नसतां तुज मज भेद देवा लटिकें जीवपण देसी
आपुले ठाईं थोरपण आणुनी आमुची सेवा घेसी
नसती अविद्या पाठीं लावुनि संसारीं गोंविसी
नाना कर्में केलीं म्हणुनि आम्हां कां दंडिसी

आपुली महिमा वाढो म्हणुनी आकस आरंभिलें
तुज मज देवा वैर ऐसें करितां नव्हे भलें

ऐसें तुज मज वैर म्हणुनी गुरुसी शरण गेलों
देव-भक्तपण कोण्या कर्में मग पुसों लागलों
सद्गुरु म्हणती सर्व हि मायिक निश्चयें बोलिलों
देव आणि भक्त एक चि गोष्टीसी पावलों

आतां सद्गुरु-वचनें तुझें गिळीन देवपण
तुझिया नेणों भक्तावरी घालीन पाषाण
जीव शिव दोन्ही मिळोनि मग मी सुखें राहीन
तुज मज रूप ना रेखा त्यातें निर्धारीन

ऐसे भक्तबोल ऐकुनी देवा थोर उपजली चिंता
विवेक-बळें करुनी माझें देवपण उडवील आतां
या लागीं भिणें भक्त-जनांसी ऐक्य करुनी तत्त्वतां
एका जनार्दनी दर्शन द्यावें लागेल त्वरितां

## अध्याय २८

१९७

आम्हांसी तों पुरे विठ्ठल चि एक । वाउगा चि देव दुजा न मनीं
ध्यान धरूं विठ्ठल करूं त्याचें कीर्तन । आणिक चिंतन नाहीं दूजें
ध्येय ध्याता ध्यान खुंटला पैं शब्द। विठ्ठल उद्बोध सुख आम्हां
एका जनार्दनी विठ्ठल भरला । रिता ठाव उरला कोठें सांगा

१९८

गातों एका ध्यातों एका । अंतर्बाहीं पाहतों एका
अगुणी एका सगुणी एका । गुणातीत पाहतों एका
जनीं एका वनीं एका । निरंजनी देखों एका
संतजना पढिये एका । जनार्दना कडिये एका

१९९

गाऊं तरी एक विठ्ठल चि गाऊं । ध्याऊं तरी एक विठ्ठल चि
पाहूं तरी एक विठ्ठल चि पाहूं । आणिका न गोवूं वासना ही
आठवूं तो एक विठ्ठल आठवूं । आणिक न साठवूं हृदया माजीं
एका जनार्दनी जडला जिव्हारीं । विठ्ठल चराचरीं व्यापुनि ठेला

२००

तुमचें नाम-संकीर्तन । हें चि माझें संध्या-स्नान
तुमच्या पायाचें वंदन । हें चि माझें अनुष्ठान
तुमच्या पायाचा साक्षेप । हा चि माझा काळक्षेप
तुमच्या प्रेमें आली निद्रा । ही च माझी ध्यान-मुद्रा
एका जनार्दनी सार । ब्रह्म-रूप हा संसार

२०१

चरणाची सेवा आवडी करीन । काया वाचा मन धरुनी जीवीं
या परतें साधन न करीं तुझी आण । हा चि परिपूर्ण नेम माझा
एका जनार्दनी एकत्वें पाहीन । हृदयीं ध्याईन जनार्दन

२०२

जगदात्मा श्रीहरि आनंदें पूजीन । अंतरीं करीन महोत्सव
द्वैत विसरूनि करीन पाद-पूजा । तेणें गरुड-ध्वजा पंचामृत
शुद्धोदक-स्नान घालीन मानसीं । ज्ञानें स्वरूपासी परिमार्जन
सत्त्व क्षीरोदक देवा नेसवीन । राजस प्रावरण पीतांबर
दिव्य अलंकार तोडर सोज्ज्वळ । सहज-स्थिति लेईल स्वामी माझा
भक्ति नव-विधा घालुनि सिंहासन । एका जनार्दन पूजा करी

अध्याय २९

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............... विः ...............
क्रमांक ........२०३........ नोंः दिः ..............

अवघें चि त्रैलोक्य आनंदाचें आतां । चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें
माय जगन्नाथ बाप जगन्नाथ । अनाथांचा नाथ जनार्दन
एका जनार्दनी एकपणें उभा । चैतन्याची शोभा शोभलीसे

२०४

चंद्राहूनि शीतळ रवीहूनि सोज्ज्वळ । तेणें मज केवळ वेधिलें बाई
अमृताहूनि स्वादु गगनाहुनी मृदु । रूपेंविण आनंदु देखिला बाई
एका जनार्दनी आनंदु परिपूर्ण । काया वाचा मन वेधिलें बाई

२०५

आनंद अद्वय नित्य निरामय । सांवळा भासताहे मज लागीं
वेधु तयाचा माझिया जीवा । काया वाचा मनोभावा लागलासे
वेधलेंसे मन झालें उन्मन । देखतां चरण गोड वाटे
पाहतां पावतां पारुषला जीव । एका जनार्दनी देव कळों आला

२०६

जगाचें जीवन मनाचें मोहन। योगियांचें ध्यान विठ्ठल माझा
द्वैताद्वैताहूनि वेगळा। विठ्ठल कळा पूर्णिमेची
न कळे आगमा नेणवे चि दुर्गमा। एका जनार्दनी आम्हां सांपडला

२०७

आजींचा सुदिनु आम्हां झाला आनंदु। सकळा स्वरूपीं स्वयें देखें गोविंदु
पाहिला गे माये आतां सांगूं मी कैसें। जेथें पाहें तेथें गोविंदु दिसे
पाहतां पाहणें तटस्थ ठेलें। सबाह्य अभ्यंतरीं पुरुषोत्तमें कोंदलें
या परी पाहतां हरुष होतसे मना। एका जनार्दनी धणी न पुरे मना

२०८

चतुर्भुज श्याम-मूर्ति। शंख चक्र ते शोभती
पीतांबर वैजयंती। रुळती गळां

देव देखिला देखिला। तेणें संसाराचा ठावो पुशिला
विदेही तो भेटला। भक्त तयातें

दोघां होतां चि मिळणी। नुरे देव-भक्तपणीं
फिटली आयणी। सर्व कोड कठिण

छंद पाहिजे नामाचा। निश्चयो काया मनें वाचा
एका जनार्दनी त्याचा। देव होय अंकित

२०९

अवघा व्यापक दाविला। माझा संदेह फिटला
मन होतें गुंडाळलें। आपुले चरणीं पैं ठेविलें
नाहीं पहावया दृष्टि। अवघा जनार्दन सृष्टि
दुजा हेत हारपला। एका जनार्दनी एकला

२१०

जन्म-मरणाचें तुटलें सांकडें । कैवल्य रोकडें उभें असे
डोळियाचा डोळा उघड दाविला । संदेह फिटला उरी नुरे
एका जनार्दनी संशय चि नाहीं । जन्म-मरण देहीं पुन्हां न ये

२११

सायासाचें बळ । तें आजि झालें अनुकूळ
धन्य झालें धन्य झालें । देवा देखिलें हृदयीं
एका जनार्दनी संशय फिटला । देव तो देखिला चतुर्भुज

२१२

आजी देखिलीं पाउलें । तेणें डोळे धन्य झाले
मागील शीण भारु । पाहतां न दिसे निर्धारु
जन्माचें तें फळ । आजि झालें सुफळ
एका जनार्दनी डोळां । विठ्ठल देखिला सांवळा

२१३

इच्छा केली तें पावलों । देखतां चि धन्य झालों
होतें सुकृत पदरीं । तुमचे चरण देखिले हरि
गेलें भय आणि चिंता । कृतकृत्य झालों आतां
आजि पुरला नवस । एका जनार्दनी झालों दास

## अध्याय ३०

२१४

भगवद्भावो सर्वां भूतीं । हें चि ज्ञान हे चि भक्ति
विवेक विरक्ति । या चि नांं

हें सांडूनि विषय-ध्यान । तें चि मुख्यत्वें अज्ञान
जीवीं जीवा बंधन । येणें चि दृढ

आठव तो परब्रह्म । नाठव तो भव-भ्रम
दोहींचें निज-वर्म । जाण बापा

आठव विसर चित्तीं । जेणें जाणिजेती
तें चि एक निश्चितीं । निजरूप

एका जनार्दनीं । सहज निज-बोधनीं
सबाह्य अभ्यंतरीं । पूर्ण परमानंदु

२१५

भक्तीचे उदरीं जन्मलें ज्ञान । भक्तीनें ज्ञानासी दिधलें महिमान
भक्ति तें मूळ ज्ञान तें फळ । वैराग्य केवळ तेथींचें फूल
फूल फळ दोन्ही येर येरा पाठीं। ज्ञान वैराग्य तेंवी भक्तीचे पोटीं
भक्तीविण ज्ञान गिवसिती वेडे । मूळ नाहीं तेथें फळ केंवी जोडे
एका जनार्दनी शुद्ध भक्ति क्रिया । ब्रह्म-ज्ञान त्याच्या लागतसे पायां

२१६

भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा । अभिमान नित्य नवा तयामाजीं
प्रेम-सुख देईं प्रेम-सुख देईं । प्रेमें विण नाहीं समाधान
एका जनार्दनी प्रेम अति गोड । अनुभवी सुरवाड जाणतील

२१७

भक्तीच्या पोटीं मुक्ति पैं आली । भक्तीनें मुक्तीतें वाढविलें
भक्ति ते माता मुक्ति ते दुहिता । जाणोनि तत्वतां भजन करीं
भक्ति सोडूनि मुक्ति वांछिती वेडीं । गूळ सोडोनी कैसी ते गोडी
एका जनार्दनी एक भाव खरा । भक्ति मुक्ति दाटूनि आलिया घरा

२१८

अभेदावांचून । न कळे भक्तीचें महिमान
साधितां साधन । विठ्ठलरूप न कळे

मूळ पाहिजे विश्वास । दृढता आणि त्रास
मोक्षाचा सायास । येथें कांहीं नको चि

आशा मनीषा सांडा परते । काम-क्रोध मारा लातें
तेणें चि सरते । तुम्ही व्हाल लोकीं

दृढ धरा एक भाव । तेणें चरणीं असे ठाव
एका जनार्दनी भेव । नाहीं मग काळाचें

२१९

अभाग्य न भजती भगवंतीं । त्यांस पृथ्वी असे जडत्व देती
जळें दिधली त्यां अधोगति । तेजें दिधली संताप-वृत्ति

वायूनें दिधलें त्यां चंचलत्व । नभें दिधलें भाव-शून्यत्व
महत्तत्त्वें हरिलें निज-सत्त्व । मायें दिधलें त्या महत्त्व

सभाग्य भावें भजती भगवंतीं । त्यांस पृथ्वी देतसे निज शांति
जळें दिधली मधुर रस-वृत्ति । तेजें दिधली निज-तेज-प्रभा-दीप्ति

वायु उपरमें दे निश्चलत्व । नभें दिधलें त्यां अलिप्तत्व
महत्तत्त्वें दिधलें शोधित-सत्त्व । मायें दिधलें सद्विद्या परम-तत्त्व
एका जनार्दनी निज-भक्ति । तें अलभ्य लाभ होय प्राप्ति
भूतें महाभूतें प्रसन्न होती । तेणें न भंगे ब्रह्म-स्थिति

२२०

देव प्रसन्न झाला माग म्हणे वहिला। भक्त घरोघरीं विचार पुसों गेला
भाव कीं भ्रांति आळस कीं भक्ति । विचारूनि व्यक्ति ठायीं ठेवा
अरे हें गुह्य गोप्य कुडें करूं नये उघडें । तरी द्वारोद्वार पुसों जाय वेडें
एका जनार्दनी शीतल भाव । आळसें चि देव दुऱ्हावला

२२१

मी वासुदेव नामें फोडितों नित्य टाहो
देखिले पाय आतां मागतों दान द्या हो
सांवळें रूप माझ्या मानसीं नित्य राहो
पावन संत-वृंदें सादरें दृष्टि पाहो

सांडोनि सर्व चिंता संत-पदीं लक्ष लागो
मुक्त मी सर्व संगीं सर्वदा वृत्ति जागो
भाविक प्रेमळांच्या संगती चित्त लागो

अद्वैत-वृत्ति चालो अक्षयीं भक्ति-योग
स्वप्नीं हि मानसातें नातळो द्वैत-संग
अद्वयानंद-वेधें नावडो अन्य भोग
अक्रियत्व चि वाहो सक्रियारूप बोध

पाहतां विश्व मातें निजरूप दाखवीं
सत्कथा-श्रवण कर्णीं पीयूष चाखवीं
रसने नाम-मंत्र सर्वदा प्रेम देईं
तोषला देवराणा म्हणे बा रे घेईं

हें दान पावलें सद्‌गुरू शांति-लिंगा
हें दान पावलें आत्मया पांडुरंगा
हें दान पावलें व्यापका अंतरंगा
हें दान पावलें एका जनार्दनी दोष जाती भंगा

## २२२

काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल । नांदतो केवळ पांडुरंग
भाव-भक्ति भीमा उदक तें वाहे । बरवा शोभताहे पांडुरंग
दया क्षमा शांति हें चि वाळुवंट । मिळालासे थाट वैष्णवांचा
देखिली पंढरी देहीं जनीं वनीं । एका जनार्दनी वारी करी

## २२३

नवविधा भक्ति नव आचरती । त्यांची नाम-कीर्ति सांगू आतां
एक एक नाम घेतां प्रातःकाळीं । पापा होय होळी क्षण-मात्रें
श्रवणें परीक्षिति तरला भूपति । सातां दिवसां मुक्ति झाली तया
श्रीशुक आपण करूनि कीर्तन । उद्धरिला जाण परीक्षिति
हरिनाम घोषें गर्जे तो प्रल्हाद । स्वानंदें प्रबोध झाला त्यासी
पायांचा महिमा स्वयें जाणें रमा । प्रिय पुरुषोत्तमा झाली तेणें
पृथुराया बाणलें देवाचें अर्चन । तेणें समाधान पावला तो
गाईचिया मागें श्रीकृष्ण-पाउलें । अक्रूरें घातलें दंडवत
दास्यत्व मारुती अर्चे देह-स्थिती । सीता-शुद्ध कीर्ति केली तेणें

सख्यत्व स्वजाति सोयरा श्रीपति । सर्व भावें प्रीति अर्जुनासी
आत्मनिवेदन करूनियां बळी । झाला वनमाळी द्वारपाळ

नवविधा भक्ति नव जणें केली । पूर्ण प्राप्ति झाली तया लागीं
एका जनार्दनी आत्म-निवेदन । भक्ति दुजेपण उरलें नाहीं

## अध्याय ३१

### २२४

भजन भावातें निपजवी । भाव देवातें उपजवी
ऐसा भजनें देव केला । भक्त वडील देव धाकुला
भक्ता कारणें संकल्प । भक्त देवाचा हि बाप
देव भक्ताचे पोटीं । झाला म्हणोनि आवड मोठी
एका जनार्दनी नवलावो । कैसा भक्त चि झाला देवो

### २२५

आधीं देव पाठीं भक्त । ऐसें मार्गें आलें चालत
हें हि बोलणें चि वाव । भक्ता आधीं कैंचा देव
भक्त शिरोमणि भावाचा । देव लंपट झाला साचा
भक्ता साठीं अवतार । ऐसा आहे निर्धार
वडील भक्त धाकुला देव । एका जनार्दनी नाहीं संदेह

### २२६

भक्तपणा सान नव्हे रे भाई । भक्ताचे पाय देवाचे हृदयीं
भक्त तो चि देव भक्त तो चि देव । जाणती हा भाव अनुभवी
दान-सर्वस्वें उदार बळी । त्याचें द्वार राखे सदा वनमाळी
एका जनार्दनी मिती नाहीं भावा । देव चि करितो भक्ताची सेवा

## २२७

भक्तालागीं अणुमात्र व्यथा । ते न साहवे भगवंता
करूनि सर्वांगाचा ओढा । निवारीतसे भक्त-पीडा
होउनी भक्ताचा अंकित । सारथीपण तो करीत
ऐसा अंकित चक्रपाणि । एका शरण जनार्दनी

## २२८

मिठी घालुनीयां भक्तां । म्हणे शिणलेती आतां
धांवे चुरावया चरण । ऐसा लाघवी आपण
योगियासी भेटी नाहीं । तो आवडीनें कवळी बाही
एका जनार्दनी भोळा । भक्तां आलिंगी सांवळा

## २२९

साचपणें देवा शरण पैं जाती । तया वैकुंठपति विसरेना
जैसी कन्या दूर-देशीं एकटी । रात्रंदिवस संकटीं घोकी मायबाप
पति-व्रतेचें सर्व मन पति-पायीं । तैसा देव ठायीं तिष्ठतसे
एका जनार्दनी मज हा अनुभव । जनार्दनीं देव दाखविला

## २३०

देव धावे मागें न करी आळस । सांडितां भव-पाश माया-जाळ
सर्व भावें जे कां शरण रिघती । तयांचें ओझें श्रीपति अंगें वाहे
नको भुक्ति मुक्ति सदा नामीं हेत । देव तो अंकित होय त्यांचा
एका जनार्दनी ऐसा ज्यांचा भाव । तयां घरीं देव पाणी वाहे

## २३१

एका घरीं द्वारपाळ । एका घरीं होय बाळ
एका घरीं करी चोरी । एका घरीं होय भिकारी
एका घरीं युद्ध करी । एका घरीं पूजा बरी
एका घरीं खाय फळें । एका घरीं लोणी बळें
एका एकपणें एकला । एका जनार्दनी प्रकाशला

## २३२

खुर्पूं लागे सांवत्यासी । न पाहे यातीसी कारण
घडी मडकें कुंभाराचें । चोख्यामेळ्याचीं ढोरें ओढी
सजन कसायाचें विकी मांस । दामाजीचा दास स्वयें होय
एका जनार्दनी जनीसंगें । दळूं कांडूं लागे आपण

## २३३

तुम्ही कृपाळु जी देवा । केली सेवा आवडी
करूनि सडा संमार्जन । पाळिलें वचन प्रमाण
उगाळुनी गंध पुरविलें । सोहळे केले दासाचे
ऐसा अपराधी पतित । एका जनार्दनी म्हणत

## २३४

देवो विसरे देवपण । अर्पी वासना भक्तांसी
भक्त देहीं सदा वसे । धर्म अर्थ अर्पीतसे
जे जे भक्ताची वासना । पुरवी आपण त्या चि क्षणा
एका जनार्दनी अंकित । उभा तेथें चि तिष्ठत

२३५

अभेद भजनाचा हरिख । देव भक्त झाले एक
कोठें न दिसे भेद-वाणी । अवघी काहाणी बुडाली
हरपलें देव-भक्तपण । जनीं झाला जनार्दन
एका जनार्दनी देव । पुढें उभा स्वयमेव

## अध्याय ३२

२३६

देव म्हणे भक्तांसी आवडी । मी झालों तुमचा गडी
सांगाल तें करीन काम । मज वरी ठेवा तुमचें प्रेम
भाव मज द्यावा । आणिक मज नाहीं हेवा
आवडीनें देव बोले । भक्तांमाजीं स्वयें खेळे
खेळतां गोपाळीं । एका जनार्दनी गोकुळीं

२३७

बहु बोलाचें नाहीं कारण । मी देह भक्त आत्मा जाण
माझा देह शरीर जाण । भक्त आंत पंच प्राण
नांदे सहज भक्त आंत । मी देह भक्त देहातीत
एका जनार्दनी भक्त । देवपणा मी भक्तांकित

२३८

तुमचे अप्रमाण होतां बोल । मग फोल जीवित्व माझें
कासया वागवूं सुदर्शन । नाहीं कारण गदेचें
तुमचा बोल व्हावा निका । हें चि देखा मज प्रिय
मज यावें उणेपण । तुमचें थोरपण प्रकाशूं द्या
एका जनार्दनी देव । स्वयमेव बोलती

२३९

मज जे अनुसरले काया वाचा मनें । त्यांचें चालवणें सर्व मज
ऋणवई त्यांचा अनंत जन्मांचा । जे गाती वाचा कीर्ति माझी
तयांचिया द्वारीं लक्ष्मी सहित । उभा मी तिष्ठत याचकपणें
सर्व जड भारी जाणें योगक्षेम । एका जनार्दनी नेम जाण माझा

२४०

मजसी जेणें विकिलें शरीर । जाणें मी निर्धार अंकित त्याचा
त्याचें सर्व काम करीन मी अंगें । पडों नेदी व्यंगें सहसा कोठें
एका जनार्दनी त्याचा मी अंकित । राहे पैं तिष्ठत त्याचे द्वारीं

२४१

माझा शरणागत न दिसे केविलवाणा । ही तो लाज जाणा माझी मज
एकविध भावें आलिया शरण । कर्म धर्म जाण पूर्ण त्याचे
समर्थाचे मुला काय खावयाची चिंता । तैसें मी त्या तत्त्वतां न विसंबे
एका जनार्दनी हा माझा नेम । आणिक नाहीं वर्म भावें विण

२४२

सर्व कर्म मदर्पण । करितां मन होय शुद्ध
न्यून तें चढतें जाण । करी संपूर्ण मी एक
मन ठेवुनी माझ्या पायीं । वसो कोठें भलते ठायीं
एका जनार्दनी मन । करा मज चि अर्पण

२४३

ऐकें उद्धवा प्रेमळा । सांगतों जीवींचा जिव्हाळा
तूं भक्त-राज निर्मळा । सुचित ऐकें
मी बैसोनि आसनीं । पूजा करितों निशिदिनीं
ते पूज्य मूर्ति तुज लागुनी । नाहीं ठाउकी उद्धवा

माझें आराध्य दैवत । तें कोण म्हणसी सत्य
भक्त माझे जीवींचे हेत । जाणती ते

माझें विश्रांतीचें स्थान । माझे भक्त सुख-निधान
काया वाचा मन । मी विकिलों तयांसी

ते हे भक्त परियेसीं । उद्धवा सांगे हृषीकेशी
एका जनार्दनी सर्वांसी । तें चि वदतसे

---

## प्रकरण पांचवें

## आत्म-दर्शन

### अध्याय ३३

२४४

सगुण गुण-माया । आली कोल्हाटीण खेळाया

प्रपंचाचा रोविला वेळू । चहूं शून्यांचा मांडिला खेळु
ब्रह्मा विष्णु जयेचे बाळु । लागती पायां

आला गडे निर्गुणाचा कोल्हाटी । सोहं-शब्दें ढोलगें पिटी
चैतन्याची उघडुनि दृष्टि । जाऊं पाहाया

कोल्हाटीण बैसली असे डोळां । जाणे गुरु-पुत्र विरळा
एका जनार्दनी लीळा । जाती वर्णाया

२४५

एका देहा माजीं दोघे पैं वसती । एकासी बंधन एका मुक्त गति
पहा हो समर्थ करी तैसें होय । कोण त्यासी पाहे वक्र-दृष्टी
पाप पुण्य दोन्ही भोगवी एका हातीं । ऐसी आहे गति अतर्क्य ते
एका जनार्दनी जनीं जनार्दन । तयासी नमन सर्व भावें

२४६

सात्त्विका भरणें रोमांसी दाटणें । स्वेदाचें जीवन येऊं लागे
कांपे तो थरारी स्वरूप देखे नेत्रीं । अश्रु त्या भीतरीं वाहताती
आनंद होय पोटीं स्तब्ध झाला कंठीं । मौन वाक्-पुटीं धरुनी राहे
टाकी श्वासोच्छ्वास अश्रुभाव देखा । जिरवुनी एका स्वरूप होय
एका जनार्दनी ऐसे अष्ट भाव । उत्पन्न होतां देव कृपा करी

२४७

सहज सहज ऐसा करिताती गोष्टी
परि सहजाची भेटी विरळा जाणे

सहजाची आवडी विद्या अविद्या तोडी
जाणीव-नेणीवेचा राहूं नेदी बेडी

जाणीवा जाणपण नेणीवा नेणपण
दोहींच्या विदानें सहजाचें दर्शन

एका जनार्दनी जाणीव ना नेणीव
सहज चैतन्यासी देउनि ठेला खेंव

२४८

मी तूं ऐसी परी । जैसे तरंग सागरी
दोहीं माजीं एक जाणा । कृष्ण द्वारावती-राणा
तंतु वस्त्र दोन्ही एक । तैसें जगासी व्यापक
देव भक्त ऐसी बोली । भ्रांति निरसेनासी झाली
एका जनार्दनी कृपा । भ्रांति कैसी जगीं पाहा पां

२४९

चक्षु-दर्पणीं जग हें पाहा । जगज्जीवनीं मुरुनी राहा
तुर्या-कालिंदी-तीर्थीं नाहा । पाप-पुण्यासी तिळांजळि वाहा

तिन्ही अवस्था सांडूनि मागें । अर्ध-चंद्राच्या चांदण्यांत वागे
चांदणें ग्रासूनि त्या ठायीं जागे । गड उन्मनी झडकरी वेगें

एवढें ब्रह्मांड-फळ ज्या देठीं । तें आटलें देखण्याचे पोटीं
त्यासी पाहतां पाठी ना पोटी । मी-तूंपणाची पडली तुटी

चार सहा दहा बारा सोळा । ह्या आटल्या देखण्याच्या कळा
कळातीत स्वयंभ निराळा । एका जनार्दनी सर्वांग डोळा

## अध्याय ३४

२५०

वर्म जाणे तो विरळा । त्याचीं लक्षणें पैं सोळा
देहीं देव पाहे डोळा । तो चि ब्रह्म-ज्ञानी

जन निंदो अथवा वंदो । जया नाहीं भेदाभेद
विधि-निषेधांचे शब्द । अंगीं न बाणती

कार्य कारण कर्तव्यता । हें पिसें नाहीं सर्वथा
उन्मनी समाधि अवस्था । न मोडे जयाची

कर्म-अकर्माचा ताठा । न बाणें चि अंगीं वोखटा
वाउग्या त्या चेष्टा । करी ना कांहीं

शरण एका जनार्दनी । तो चि एक ब्रह्म-ज्ञानी
तयाचे दर्शनीं । प्राणियांसि उद्धार

२५१

निरपेक्ष निर्द्वंद्व तो चि ब्रह्म-ज्ञानी
नायके चि कानीं परापवाद

सर्वदा सबाह्य अंतरीं शुचित्व
न देखे न दावी महत्व जगीं वायां

एका जनार्दनी पूर्णपणें धाला
शेजेचा मुराला रसीं उतरे

२५२

जागा परी निजला दिसे । कर्म करी स्फुरण नसे
सकळ शरीराचा गोळा । होय आळसाचा मोदळा
संकल्प-विकल्पाची ख्याति । उपजे चि ना कदा चित्तीं
या परी जनीं असोनि वेगळा । एका जनार्दनी पाहे डोळां

२५३

दृष्टी देखे पर-ब्रह्म । श्रवणीं ऐके पर-ब्रह्म
रसना सेवी ब्रह्म-रस । सदा आनंद उल्हास
गुरु-कृपेचें हें वर्म । जग देखे पर-ब्रह्म
एका जनार्दनी चराचर । अवघें ज्यासी परात्पर

२५४

ब्रह्म-स्थितीचें हें वर्म । तुज दावितों सुगम
सर्वां भूतीं भगवद्भाव । अभेदत्वें आपण चि देव
संसार ब्रह्म-स्फूर्ति । सांडोनियां अहंकृति
शरण एका जनार्दन । कृपे पावला परिपूर्ण

## अध्याय ३५

२५५

जनार्दनें मज केला उपकार । पाडिला विसर प्रपंचाचा
प्रपंच पारखा झाला दुराचारी । केलीसे बोहरी काम-क्रोधा
आशा तृष्णा ह्यांचें तोडियेलें जाळें । कामनेचें काळें केलें तोंड
एका जनार्दनी तोडिलें लिगाड । परमार्थ गोड दाखविला

२५६

सर्व भावें दास झालों मी उदास । तोडिला माया-पाश जनार्दनें
माझें मज दाविलें माझें मज दाविलें । उघडें अनुभवलें पर-ब्रह्म
रविबिंबा परी प्रकाश तो केला । अंधार पळविला काम क्रोध
एका जनार्दनी उघडा बोध दिला । तो चि ठसावला हृदया माजीं

२५७

अभिनव गुरूनें दाखविलें । ओहं सोहं माझें गिळिलें
प्रपंचाचें उगवोनि जाळें । केलें षड्वैरियांचें तोंड काळें
उदो-अस्ताविण प्रकाश । स्वयें देहीं दाविला भास
मीपण नाहीं उरलें । एका जनार्दनी मन रमलें

२५८

अभिनव सांगतां विस्मयो दाटला । देहीं च भासला देव माझ्या
नवल कृपेचें विंदान कैसें । जनार्दनें सरसें केलें मज
साधनाची आटी न करितां गोष्टी । हृदय-संपुटीं दाविला देव
एका जनार्दनी एकपणें शरण । न कळे महिमान कांहीं मज

२५९

पीक पिकलें प्रेमाचें । सांठवितां गगन टांचें
भूमि शोधोनि पेरिलें बीज । सद्‌गुरु-कृपें उगवलें सहज
कामक्रोधाच्या उपटोनी पेंडी । कल्पनेच्या काशा काढी
एका जनार्दनी निजभाव । विश्वंभरित पिकला देव

२६०

भुक्ति आणि मुक्ति फुकाचें ठेवणें । गुरु जनार्दनें तुच्छ केलें
साधन अष्टांग यज्ञ तप दान । तीर्थीं तीर्थाटण शीण वायां
एका जनार्दनी दाविला आरिसा । शुद्ध त्या सरिसा सहज झालों

२६१

गुरु-कृपांजन पायो मेरे भाई । राम बिना कछु जानत नाहीं
अंतर राम बाहिर राम । जहं देखौं तहं राम हि राम
जागत राम सोवत राम । सपनेमें देखौं राजा राम
एका जनार्दनी भाव ही नीका । जो देखौं सो राम सरिखा

२६२

वेणुनादाचिया किळा । पान्हा फुटला निराळा
आर्तभूत जीव तिन्ही । चातक निवाले जीवनीं
स्वानुभवाचे सरिते । जेंवि जीवना दाटे भरतें
एका एक गर्जे घनीं । पूर आला जनार्दनी

२६३

ओहं कोहं सोहं सर्व आटलें । दृश्य द्रष्टृत्व सर्व फिटलें
ऐसी कृपेची साउली । माझी जनार्दन माउली
द्वैत-अद्वैताचें जाळें । उगविलें कृपा-बळें
शरण एका जनार्दनी । एकपणें भरला अवनीं

[illegible], ठाणे. [illegible]
अनुक्रम ........ विः ..................
क्रमांक .................. नोंः दिः ..................

अध्याय ३६

२६४

चित्त चैतन्या पडली गांठी । न सुटे मिठी
संचित कर्माची झाली आटी । उफराटी दृष्टि
कैचा आठव दृश्याचा खुंटली वाचा । उदय झाला सुखाचा
देह विदेह वाढले मीतूंपणें । एका जनार्दनी सहज एकपणें

२६५

जाणती हे कळा हारपोनि गेली । वृत्ति मावळली तया माजीं
पाहतां पाहणें हारपोनि गेलें । मी माझें सरलें तयामाजीं
अंतरीं बाहेरीं पाहतां शेजारीं । शून्याची वोवरी ग्रासियेली
ग्रासियेले तेणें चंद्र सूर्य दोन्ही । एका जनार्दनी आनंद झाला

२६६

सत्व रज तम गेले निरसोनि । दृश्याची लावणी कैशी झाली
गेलिया माघारीं पाहतां न दिसे । स्वतां तो प्रकाशे सदोदित
अंतरीं बाहेरीं पाहतां शेजारीं । प्रकाश अंतरीं लखलख
एका जनार्दनी प्रकाश संपूर्ण । सर्व नारायण बिंबलासे

२६७

त्रिभुवनींचा दीप प्रकाश देखिला । हृदयस्थ पाहिला जनार्दन
दीपाची ती वाती वातीचा प्रकाश । कळिकामय दीप देहीं दिसे
चिन्मय प्रकाश स्वयं आत्म-ज्योति । एका जनार्दनी भ्रांति निरसली

२६८

काना वाटे मी नयनासी आलों । शेखीं नयनाचा नयन मी झालों
दृष्टि द्वारा मी पाहें सृष्टि । सृष्टि हरपली माझे पोटीं
ऐसें जनार्दनें मज केलें । माझे चित्ताचें जीवपण नेलें
एका जनार्दनी जाणोनि भोळा । माझा सर्वांग झाला डोळा

२६९

उपाधीच्या नांवें घातियेलें शून्य । आणिका दैन्यवाणें काय बोलूं
टाकूनिया संग धरियेला देव । आतां तो उपाय दुजा नाहीं
सर्व वैभव सत्ता जयाचे पदरीं । झालों अधिकारी आम्ही बळें
एका जनार्दनी तोडियेला संग । झालों आम्ही निःसंग हरि-भजनें

२७०

माझें मीपण देहीं चि मुरालें । प्रत्यक्ष देखिलें पर-ब्रह्म
पर-ब्रह्म सुखाचा सोहळा । पाहिलासे डोळा भरूनियां
ब्रह्म-ज्ञानाची ते उघडली पेटी । झालों असें पोटीं शीतळ जाणा
एका जनार्दनी ज्ञानाचें तें ज्ञान । उघड समाधान झालें जीवा

२७१

मन रामीं रंगलें अवघें मन चि राम झालें
सबाह्य अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें

चित्त चि हारपलें अवघें चैतन्य चि झालें
देखतां देखतां अवघें विश्व मावळलें
पाहतां पाहतां अवघें सर्वस्व ठकलें

आत्मया रामाचें ध्यान लागलें मज कैसें
क्रिया कर्म धर्म अवघें येणें चि प्रकाशें
सत्य मिथ्या प्रकृति पर राम चि अवघा भासे

भक्ति अथवा ज्ञान शांति आणिक योग-स्थिति
निर्धारितां न कळे राम-स्वरूपीं जडली प्रीति
एका जनार्दनी अवघा राम चि आदी अंतीं

## अध्याय ३७

२७२

देव जन देव विजन । देवीं जडलें तन मन
देव घरीं देव दारीं । देव दिसे व्यवहारीं
देव मागें देव पुढें । दृष्टि चैतन्य उघडें
एका जनार्दनी देव । सहज चैतन्य स्वयमेव

२७३

पाहो गेलों देवालागीं । देवरूप झालों अंगीं
आतां मी-तूंपणा ठाव । उरला नाहीं अवघा देव
सुवर्णाचीं झालीं लेणीं । देव झाला जगपणीं
घटीं मृत्तिका वर्तन । जगीं देव तैसा व्याप्त
एकानेक जनार्दन । एका जडला एकपणें

२७४

देव झाला पाठीं पोटीं । तया नाहीं आटाआटी
जेथें जाय तेथें देव । नाहीं भेव सर्वथा
संसारासी मारुनि लाथा । केला तत्त्वतां देशोधडी
विषयाचें ठेचिलें तोंड । मोडिलें बंड पांचांचें
जनार्दनाचा एका म्हणे । देवा पाहणें पाठीं पोटीं

२७५

अष्ट हि दिशा पूर्ण भरला देव । मा पूर्व-पश्चिम-भाव तेथें कैंचा
पाहे तिकडे देव व्यापुनी भरला । रिता ठाव उरला कोठें नाहीं
समाधि समाधान मनाचें उन्मन । मा देवा भिन्नपण नाहीं नाहीं
एका जनार्दनी एकपणा साठीं । देव पाठीं पोटीं भक्ता मागें

२७६

साकर दिसे परी गोडी न दिसे । ती काय त्या वेगळी असे
तैसा जनीं आहे जनार्दन । तयातें पहावया सांडीं अभिमान
कापुरा अंगीं परिमळु गाढा । पाहतां उघडा केवीं दिसे
पाठ पोट जैसें नाहीं चि सुवर्णा । एका जनार्दनी यापरी जाणा

२७७

मागें पुढें विठ्ठल भरला । रिता ठाव नाहीं उरला
जिकडे पहावें तिकडे आहे । दिशा-द्रुम भरला पाहे
एका जनार्दनी सर्व देशीं । विठ्ठल व्यापक निश्चयेंसीं

२७८

पहा कैसा देवाचा नवलाव । पाहे तिकडे अवघा देव
पाहणें पातलें देवें नवल केलें । सर्व हि व्यापिलें काय पाहों
पहाणेयाचा ठाव समूळ फिटला । अवघा देहीं दाटला देव माझ्या
एका जनार्दनी कैसें नवल झालें । दिशा-द्रुम दाटले देहें सहजीं

२७९

देवासी कांहीं नेसणें नसे । जेथें तेथें देव उघडा चि दिसे
देव निलाजरा देव निलाजरा । देव निलाजरा पहा तुम्ही
लाजेसी जेथें नाहीं ठाव । पांढरा डुकर झाला देव
एका जनार्दनी एकल्या काज । भक्ति तेणें चि नेली लाज

२८०

एक धरलिया भाव । आपण चि होय देव
नको आणिक सायास । जाय तिकडे देव भास
ध्यानीं मनीं शयनीं । देव पाहे जनीं वनीं
अवलोकी जिकडे । एका जनार्दना देव तिकडे

२८१

मज करूं दिली नाहीं सेवा । दाविलें देवा देहीं च
जग व्यापक जनार्दन । सदा वसे परिपूर्ण
भिन्न भिन्न नाहीं मनीं । भरलासे जनीं वनीं
एका जनार्दनी शरण । सर्वा ठायीं व्यापक जाण

## अध्याय ३८

२८२

पाहलें रे मना पाहलें रे । बुद्धि-बोधें इंद्रियां सम जालें रे
नयनीं पाहतां न दिसे बिंब । अवघा प्रकाश स्वयंभ
एका जनार्दनी पहाट । जनीं वनीं अवनी लखलखाट

२८३

जळ स्पर्शों जातां स्नानीं । तंव चिन्मात्र भासे जीवनीं
कैसी वाहताहे गंगा । स्नानें हरपलें अंग
अंगत्व मुकलें अंगा । स्नानीं सोवळी झाली गंगा
एका जनार्दनी मज्जन । सकळ तीर्थें झालीं पावन

२८४

स्वयं प्रकाशा माजीं केलें असे स्नान । द्वैतार्थ त्यागून निर्मळ झालों
सुविद्येचें वस्त्र गुंडोनि बैसलों । भूतदया ल्यालों विभूति अंगीं
चोविसां परतें एक ओळखिलें । तें चि उच्चारिलें मूळारंभीं
एका भावें नमन भूतां एकपणीं । एका जनार्दनी संध्या झाली

२८५

झाली संध्या संदेह माझा गेला । आत्माराम हृदयीं प्रगटला
गुरु-कृपा निर्मळ भागीरथी । शांति क्षमा यमुना सरस्वती
ऐसीं पदें एकत्र जेथें होती । स्वानुभव स्नान हे मुक्त-स्थिति
सद्बुद्धीचें घालुनि शुद्धासन । वरी गुरूची दया परिपूर्ण
शम-दम त्रिभूति चर्चुनि जाण । वाचे उच्चारी केशव नारायण
सहज कर्में झालीं तीं ब्रह्मार्पण । जन नोहे अवघा हा जनार्दन
आइकतां निवती साधुजन । एका जनार्दनी बाणली निजखूण

२८६

बोधभानु तया नाहीं मध्याह्नु । सायं-प्रातर् नाहीं तेथें कैंचा अस्तमानु
कर्म चि खुंटलें करणें चि हारपलें । अस्तमान गेलें अस्तमाना
जिकडे पाहे तिकडे उदयो चि दिसे । पूर्व पश्चिम तेथें कैंची भासे
एका जनार्दनी नित्य काशा । कर्माकर्म झालें दिवसां चंद्र जैसा

२८७

कृष्ण-चंदन आणिलें । सकळ वेधिलें परिमळें
तेणें फुटती अंकुर । अंगीं भावाचें तरुवर
खैर धामोडे चंदन । कृष्ण-वेधें वेधिलें मन
एकाएक हरिख मनीं । वसंत दाटे जनार्दनी

२८८

आतां कैसेनि पूजूं देवा । माझी मज घडे सेवा
तोडूं गेलों तुळसी-पान । तेथें पाहतां मधुसूदन
अन्न गंध धूप दीप । तें हि माझें चि स्वरूप
एका जनार्दनी पूजा । पूज्य पूजक नाहीं दुजा

२८९

मी चि देवो मी चि भक्त । पूजा उपचार मी समस्त
ही चि उपासना भक्ति । धर्म अर्थ सर्व पुरती
मी चि गंध मी चि अक्षता । मी चि वाहे मी चि पुरता
मी चि धूप मी चि दीप । मी माझें देख स्वरूप
मी चि माझी करीं पूजा । एका जनार्दनी नाहीं दुजा

## अध्याय ३९

२९०

मी तों स्वयें परब्रह्म । मी चि स्वयें आत्माराम
मी तों असें निरुपाधि । मज नाहीं आधि-व्याधि
मी तों एकट एकला । द्वैत-भाव मावळला
मज विण नाहीं कोणी । एका शरण जनार्दनी

२९१

घर सोडोनि जावें परदेशा । मज सवें देव सरिसा
कडे कपाटें सीवरी । जिकडे पाहे तिकडे हरि
आतां कोणीकडे जावें । जिकडे पाहे तिकडे देव
एका बैसला निरंजनीं । न जाइजे जनीं वनीं

२९२

जिकडे जावें तिकडे देव चि सांगातें । ऐसें केलें नाथें पंढरीच्या
शब्द तेथें झाला समूळ चि वाव । गेला देह-भाव हारपोनि
अंतरीं बाहेरीं एकमय झालें । अवघें कोंदाटलें परब्रह्म
एका जनार्दनी ऐसी झाली वृत्ति । वृत्तीची निवृत्ति चिदानंदीं

२९३

येणें जाणें खुंटलें क्रिया-कर्म ठेलें । मज माझें भेटलें आत्मरूप
त्यागूं तें काय भोगूं तें काय । सर्व ब्रह्मरूप पाहें कोंदाटलें
क्रिया कर्म धर्म निखिल परब्रह्म । त्यागूं भोगूं तेथें केवळ भ्रम
एका जनार्दनी सहजीं सहज एक । एकी एक पाहतां कैंचे अनेक

२९४

नीर मंथूनि मंथन पैं केलें । सार असार तें चवीस आलें
ताक तें हि गोड दूध तें हि गोड । रसनेची चाड पारुषली
एका जनार्दनी अवघें चि सार । मानस मंथूनि पावलों पार

२९५

सकळ गोडिये जें गोड आहे । तें रसना चि झाली स्वयें
आतां चाखावें तें काये । जिह्वा अमृता वाकुल्या वाये
तया गोडपणाच्या लोभा । कैशा सर्वांगीं निघती जिभा
एका जनार्दनी गोडी । तया क्षण एक रसना न सोडी

२९६

तळीं हारपली धरा । वरी ठावो नाहीं अंबरा
ऐसा सहजीं सहज निजे । एका एकपणें विण शेजे
दिवस निशी हारपली दोन्ही । एका निजिजे जनार्दनी

२९७

देह जाईल तरी जावो राहील तरी राहो
दोराचिया सर्पा जिणें मरणें ना वावो

आम्ही जितां चि मेलों जितां चि मेलों
मरोनियां झालों जीवें विण,

मृगजळाचें जळ भरलें असतां नाहीं
आटलिया तेथें कोरडें होईल काई

एका जनार्दनी जग चि जनार्दन
जिणें मरणें तेथें सहज चैतन्य-घन

२९८

पाणियाचा मासा झाला । नाम रूपा नाहीं आला
जंव पारधी घाली जाळें । तंव त्याचें चि तोंड काळें
एका जनार्दनीं सर्व चि पाणी । माशियाची कैंची खाणी

२९९

हरिखाची गुढी बोधावा आला
अहंकार गर्जतु अविवेक मारिला

संतोषें विवेक आप आपणेया विसरला
लाजुनि महाहरुष आनंदासी गेला

मारविला क्रोध ममता सती निघाली
तुटला मत्सर शांति सुखें सुखावली

एका जनार्दनी पाहतां सहजीं पैं सहजें
स्वराज्य सांग तेथें नाहीं पैं दुजें

## अध्याय ४०

३००

जयदेव जयदेव जय जनार्दना
परामार्थें आरती, भावार्थें आरती, अभिन्न भावना ॥ ध्रु० ॥

अवलोकितां जन दिसे जनार्दन । भिन्न भिन्न तेथें दावी अ-भिन्न
अनेक एकत्वें दिसे परिपूर्ण । ठकली बुद्धि कैंचा गुण अवगुण

ज्योतीचिया ज्योती उजळूनि दीप्ति । तेणें तेजें केली सतेज आरती
पाहतां पाहतेपण पहावया स्थिति । नुरचि वेगळेपण देहभाव-स्फूर्ति

पाठ ना पोट अवघा निघोट । सर्वांगीं देखणा सर्वां वरिष्ठ
इष्ट नाऽनिष्ट गुप्त ना प्रगट । ओहं सोहं सगट भरिघेला घोट

सर्वदा दिसे परी नाकळे मना । जें जें दिसे तें तें दर्शन जाणा
अभावनेसी गिळिली भावना । अभिनव आरती एका जनार्दना

# भजनांची सूचि

[ अंक भजनांचे आहेत ]



| भजन | अंक | भजन | अंक |
|---|---|---|---|
| अधर्मे अदृष्टाचें | १० | आतां कैसेंनि | २८८ |
| अनुतापा वांचूनि | ७१ | आधीं घेई | १५ |
| अबद्ध पढतां | ८५ | आधीं देव पाठीं | २२५ |
| अभक्तां देव | १३२ | आनंद अद्वय | २०५ |
| अभाग्य न भजती | २१९ | आनंदाचा भोग | १९२ |
| अभिनव गुरुनें | २५७ | आपुलीच दारा | १४७ |
| अभिनव सांगतां | २५८ | आपुली पूजा | ३२ |
| अभेद भजनाचा | २३५ | आपुलें कल्याण | ८९ |
| अभेदा वांचून | २१८ | आंबे केळीं द्राक्ष | ७७ |
| अर्थ नाहीं जया | ४२ | आंबेया पाडू लागला | ७४ |
| अवघा व्यापक | २०९ | आम्हांसीं तों पुरे | १९७ |
| अवघेंचि त्रैलोक्य | २०३ | आम्ही अलक्षपुरचे | ६९ |
| अविश्वासा घरीं | ४८ | आम्ही ब्रह्मपुरीचे | ६३ |
| अविश्वासापुढें | ४९ | आरशा अंगीं लागतां | ३८ |
| अशाश्वतासाठीं | ३ | आवडी करितां | ११४ |
| अष्ट हि दिशा | २७५ | आवडीनें भावें | ११३ |
| असंख्य वचनें | ९४ | आशाबद्ध करिती | १६ |
| असत्याचा शब्द | ४१ | इच्छा केली तें | २१३ |
| असोनि ससारी | १४४ | उत्तम पुरुषाचें | २२ |
| आजींचा सुदिनु | २०७ | उदार धीर-निधि | ७६ |
| आजीं देखिलीं | २१२ | उपाधीच्या नांवें | २६९ |
| आजी नवल | १२२ | एक धरिलिया | २८० |
| आजी सुदिन | १५२ | एक नरदेह | ५० |

| भजन | अंक |
| --- | --- |
| एका घरीं द्वारपाळ | २३१ |
| एका देहा माजीं | २४५ |
| ऐकें उद्धवा | २४३ |
| ऐसे जे घाले | १५६ |
| ओखद घेतलिया | ८८ |
| ओहम् कोहम् सोहम् | २६३ |
| ओळखिला हरि | १०९ |
| कईं तया मार्गें | १९१ |
| कनक कांता न ये | ४५ |
| करितां कीर्तन श्रवण | ११८ |
| करितां हरिकथा-श्रवण | ३७ |
| कर्म करिसी | १८ |
| कलत्र पुत्र बाधा | ५२ |
| काना वाटे मी | २६८ |
| काम क्रोध लोभ | ६४ |
| काया ही पंढरी | २२२ |
| कीर्तनाची आवडी | ११५ |
| कीर्तनाची मर्यादा | १२५ |
| कृतांताचे माथां | ८३ |
| कृष्ण-चंदन | २८७ |
| कृष्णा धांव रे | १८८ |
| केला संतीं उपकार | १६७ |
| केलें तुवां काय | २८ |
| कैवल्य निधान | १६५ |
| कोणी कांहीं तरी | १०० |
| खुपूं लागे | २३२ |
| गाऊं तरी एक | १९९ |
| गातों एका घ्यातों | १९८ |

| भजन | अंक |
| --- | --- |
| गुंतला भ्रमर | ७९ |
| गुरु-कृपांजन | २६१ |
| गुरु परमात्मा | १७२ |
| गोल्हाट उल्हाट | १५४ |
| घर सोडोनि | २९१ |
| घालीं देवावरी | ९८ |
| चक्षुदर्पणीं | २४९ |
| चतुर्भुज श्याममूर्ति | २०८ |
| चंद्राहूनि शीतळ | २०४ |
| चरण वंदिती | १८३ |
| चरणांची थोरी | १८२ |
| चरणांची सेवा | २०१ |
| चित्त चैतन्या | २६४ |
| चिंतनें नासतसे | ९७ |
| चिंतातुर मन | ९६ |
| छळितां न येती | १४६ |
| जगदात्मा श्रीहरी | २०२ |
| जग राम-नाम | १०१ |
| जगाचिये नेत्रीं | २१ |
| जगाचें जीवन | २०६ |
| जनार्दनें मज केला | २५५ |
| जनार्दनें मज सांगितला | ९३ |
| जन्म मरणाचें तुटलें | २१० |
| जन्मोजन्मींचें संचित | १७७ |
| जय गोविंदा | १९६ |
| जय जय वो | १७८ |
| जय देव जय देव | ३०० |
| जया करणें आत्महित | ११ |

| भजन | अंक |
|---|---|
| जयाचेनि चरणें | १३८ |
| जया जैसा हेत | १३५ |
| जळ स्पर्शो | २८३ |
| जागा परी निजला | २५३ |
| जागृती स्वप्नीं | ९५ |
| जाणती हे कळा | २६५ |
| जिकडे जावें | २९२ |
| जीवाचें जीवन | ३१ |
| जें जें दिसे तें तें | २ |
| जें जें दृष्टि | ११० |
| जें जें बोले तैसा चाले | १४३ |
| जेथें जेथें मन | १९४ |
| जें पदी निरूपण | १२३ |
| जो वस्तु झाला | १५० |
| ज्यासी करणें चित्त | १२ |
| झाली संध्या | २८५ |
| तळीं हारपली धरा | २९६ |
| तुज सगुण जरी | १८६ |
| तुमचें अप्रमाण | २३८ |
| तुमचें नामसंकीर्तन | २०० |
| तुमचे वर्णितां | ११९ |
| तुम्ही कृपाळू | २३३ |
| तुम्ही संतजन | १६३ |
| तें मन निष्ठुर | १८९ |
| तोंडीं घास डोई | १०३ |
| त्रिभुवनींचा दीप | २६७ |
| थोर तो चि म्हणावा | ६२ |
| दारचि गोधण | ७५ |
| दासा दुःख झालें | १७६ |
| दृष्टि देखे | २५३ |
| देव जन देव | २७२ |
| देव झाला पाठी | २७४ |
| देव दगडाचा | २५ |
| देव देव म्हणोनि | ३० |
| देव धावे मागें | २३० |
| देव प्रसन्न झाला | २२० |
| देव म्हणे भक्तां | २३६ |
| देवासी कांहीं | २७९ |
| देवासी तों प्रिय | ८४ |
| देवो विसरे | २३४ |
| देह जाईल | २९७ |
| देह बुद्धि सांडी | ६० |
| देह सांडावा ना | ७ |
| देह हा काळाचा | ४ |
| देहीं असोनि | १४९ |
| देहीं वाढे जो जो | ७२ |
| धन्य तोचि | १२७ |
| धन्य दिवस | १६६ |
| धर्माची वाट | १४२ |
| धावूं नको सैरा | १९ |
| नर-देहीं येउनी | ६ |
| नवल भजनाचा | १२१ |
| नवल रोग-पडिपाडू | ११६ |
| नवविधा भक्ति | २२३ |
| नव्हतां शुद्ध | १५३ |
| नाम घेतां हें | १०२ |

| भजन | अंक | भजन | अंक |
|---|---|---|---|
| नाहीं जया भाव | ९० | ब्रह्म सर्व-गत | १५१ |
| नित्य नवा | १२४ | ब्रह्मांडाची | ४० |
| नित्य-नैमित्तिक | १३ | भक्तपणा सान | २२६ |
| निरपेक्ष निर्द्वंद्व | २५१ | भक्तालागीं | २२७ |
| निवांत श्रीमुख | १८५ | भक्ति-प्रेमा विण | २१६ |
| निवृत्ति शोभे | १४१ | भक्तीचे उदरीं | २१५ |
| नीचाचे नि स्पर्शे | २६ | भक्तीच्या पोटीं | २१७ |
| नीर मंथूनि | २९४ | भगवद्‌भावो सर्वां | २१४ |
| पक्षी अंगणीं | ४७ | भजन नाहीं | १९० |
| परब्रह्म-प्राप्ती | १४ | भजन भावातें | २२४ |
| परमार्थाचे वचना | ८ | भव-रोगासी | १०४ |
| पशु आणि पक्षी | ९९ | भुक्ति आणि मुक्ति | २६० |
| पहा कैसा देवा | २७८ | भुक्ति-मुक्ती | ८० |
| पाणियाचा मासा | २९८ | मज करूं दिली | २८१ |
| पाहलें रे मना | २८२ | मज कोणीं न | १४५ |
| पाहों गेलों देवा | २७३ | मज जे अनुसरले | २३९ |
| पिंपळा वरुनी | ३४ | मजसी जेणें | २४० |
| पीक पिकलें | २५९ | मत्सर ज्ञानिया तें | ५६ |
| प्रतिमा चि देवो | २७ | मन रामीं रंगलें | २७१ |
| प्रतिमेचा देव | २४ | मनोभाव जाणोनि | १७० |
| प्रपंच परमार्थ | २० | ममता ठेवुनी | ५४ |
| फूल झडे तंव | १ | मागणें तें आम्ही | १२० |
| बहुतांचीं मतांतरें | १८४ | मागणें हें चि | १९३ |
| बहु बोलाचें | २३७ | मागें पुढें विठ्ठल | २७७ |
| बैसतां निश्चळ | ६५ | मागें बहुतांसी | ५ |
| बोध-भानु तया | २८६ | माझा शरणागत | २४१ |
| ब्रह्म एक परिपूर्ण | ५९ | माझें मी पण | २७० |
| ब्रह्म-स्थितीचें | २५४ | माझ्या मनाचें तें | ६८ |

| भजन | अंक |
|---|---|
| मिठी घालुनीयां | २२८ |
| मी एक शुचि जग | ५३ |
| मीच देवो मीच | २८९ |
| मी तूं ऐसी परी | २४८ |
| मी तों स्वयें | २९० |
| मी वासुदेव-नामें | २२१ |
| मुखीं नाहीं निंदा | १४८ |
| मेघ वर्षे | ९ |
| मेघा परिस | १३४ |
| मोकळें तें मन | १६८ |
| मोह ममता ही | ५५ |
| येणें-जाणें खुंटलें | २९३ |
| येवढें जया कृपेचें | १७४ |
| रस सेविल्या साठीं | ४६ |
| रामकृष्ण हरि | ८२ |
| राम हें माझें | १८७ |
| लज्जा अभिमान | ५७ |
| लोखंडाची बेडी | ५१ |
| लोह परिसासी | ९२ |
| लौकिका पुरता | ७८ |
| वर्म जाणे तो | २५० |
| विठ्ठल म्हणतां | ९१ |
| विवाद-वाद हें | ५८ |
| विश्व पाळिताहे | १८१ |
| विषयाचे अभिलाषे | ४३ |
| वेणु-नादाचिया | २६२ |
| वेद जया लागीं | १०८ |
| वेद-युक्त मंत्र | १७ |

| भजन | अंक |
|---|---|
| वेद-वाणी देवें | ३५ |
| वेदां माजीं ओंकार | ३३ |
| वैर करूनि मन | ६७ |
| वैष्णवां घरीं | १२८ |
| व्यापक विठ्ठल | १०६ |
| शतावर्ती | ३६ |
| शत्रु वसती | ६६ |
| श्रीगुरूचें नाम | १७१ |
| श्रुति सांगती | ३९ |
| सकळ गोडियें | २९५ |
| सगुण गुण-माया | २४४ |
| सगुण चरित्रें | १२६ |
| सत्त्व रज | २६६ |
| सत्पद तें | १११ |
| संत आधीं देव | १३० |
| संत केवळ घातकी | १३९ |
| संत जाती हरि-कीर्तना | १६१ |
| संत-द्वारीं कुतरा | १६९ |
| संत भलते याती | १६२ |
| संत माय-बाप | १३७ |
| संत-संगतीनें | १६४ |
| संता-अंकीं देव | १२९ |
| संतांचा महिमा | १३१ |
| संतांचिये घरीं | १५९ |
| संतांचिये द्वारीं | १५८ |
| संतांचिये परिवारीं | १६० |
| संतांचे ठाईं | १३६ |
| संतांवांचोनियां | १५७ |

| भजन | अंक | भजन | अंक |
|---|---|---|---|
| संतासी आवडे | १५५ | साधावया परमार्था | १७५ |
| संतांसी जो निंदी | १३३ | सायासाचें बळ | २११ |
| समुद्र क्षोभे | २३ | सुंदर तें ध्यान | १७९ |
| सर्व कर्म | २४२ | सेवेची आवडी | १७३ |
| सर्व भावें दास | २५६ | सेवेचें कारण | ८१ |
| सर्व भावें सुख | ७० | संसार-सागरीं बुडालिया | ८७ |
| सर्वांगीं सुवास | १४० | स्वयंप्रकाशा | २८४ |
| सर्वभूतीं तुझें | १९५ | हरि-कीर्तनें | ११७ |
| सर्वभूतीं देव | ६१ | हरिखाची गुढी | २९९ |
| सर्वां माजीं सार | ८६ | हरिनाम स्मरतो | १०५ |
| सहज सहज ऐशा | २४७ | हरि बोला देतां | ११२ |
| साकर दिसे परी | २७६ | हरि हरि बोला | १०८ |
| साचपणें देवा शरण | २२९ | हरीचिया दासा | १०७ |
| सात्त्विका भरणें | २४६ | हीं चि दोन्ही पें | ४४ |
| साधका सर्वदा | ७३ | हृदयस्थ असोनी | [illegible] |


92030

REFBK-0012730

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ........................ विः ....................

क्रमांक ........................ नोंः दिः ..................